## प्रकरण ४

## नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील ग्रामीणता व प्रादेशिकता


**4.1 प्रास्ताविक........................................................................................................ 252**

**4.2 ग्रामीणता व प्रादेशिकता: संकल्पना ................................................................ 252**

**4.2.1 ग्रामीण साहित्य व प्रादेशिक साहित्य: फरक – भेद.............................................258**

**4.3 नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतील ग्रामीण जीवनाचे चित्रण ..................................... 259**

**4.3.1 नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतील कृषी संस्कृतीचे व निगडीत प्रश्नांचे चित्रण..............260**

**4.3.2 ग्रामीण समाजव्यवस्था व ग्रामीण वास्तवाचे चित्रण .............................................267**

**4.3.3 ग्रामीण समजुती व ग्रामजीवनातील लोकांच्या मानसिकतेचे चित्रण........................271**

**4.3.4 ग्रामजीवनातील बदलांचे चित्रण...........................................................................282**

**4.3.5 ग्रामीण स्त्रीजीवनाचे चित्रण .................................................................................287**

**4.4 नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतून आविष्कृत होणारी प्रादेशिकता ......................................... 291**

**4.5 समारोप ................................................................................................................ 304**

**संदर्भ......................................................................................................................... 304**

# प्रकरण ४

# नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील ग्रामीणता व प्रादेशिकता

## 4.1 प्रास्ताविक

ग्रामीणता ही प्रादेशिकतेच्या पोटात समावणारी संकल्पना असल्याचे डॉ. आनंद यादव नोंदवतात. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी ‘प्रादेशिकता’ आणि ‘ग्रामीणता’ या दोन वेगवेगळ्या संकल्पना कल्पिलेल्या आहेत. या दोहोंमध्ये पुसट अशा सीमारेषा आखण्याचा प्रयत्न अभ्यासकांनी केलेला आहे. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील दिसून येणाऱ्या ग्रामीणतेचे व प्रादेशिकतेचे स्वरूप पडताळून पाहताना ‘ग्रामीणता’ व ‘प्रादेशिकता’ या संकल्पनांच्या ठळक वैशिष्ट्यांचा आढावा घेत या दोहोंमधील साम्य भेदाची पडताळणी करणे महत्त्वाची ठरते. तसेच नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतून दिसून येणाऱ्या गोव्यातील ग्रामीण समाजजीवन, येथील कृषिप्रधानता, ग्रामीण समाजवास्तव, ग्रामीण समाजव्यवस्था, ग्रामीण स्त्री जीवन यांचा आढावा घेत नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील ग्रामीण जीवनावर विवेचन करणे गरचेचे ठरते. गोवा या प्रदेशातील चालीरीती, रूढी परंपरा, समजुती, सण-उत्सव यांचे नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेत होणाऱ्या प्रदेशनिष्ठ स्वरूपाच्या चित्रणाबरोबर नव्वदोत्तरी गोव्याशी बांधिलकी दर्शविणाऱ्या प्रदेशनिष्ठ स्वरूपाच्या प्रश्नांचा आढावा घेत कथेतून दर्शविले गेलेल्या बदलत्या प्रादेशिकतेच्या स्वरूपाचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

## 4.2 ग्रामीणता व प्रादेशिकता: संकल्पना

ग्रामीण जीवनातून, ग्रामीण वास्तवापासून ग्रामीण साहित्य आकारास येते. श्रीयुत बाबा पाटील यांनी संपादिलेल्या ‘तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा’ या पुस्तकावरील मलपृष्ठावर नोंदविलेल्या मजकुरात ‘ग्रामीण’ या संकल्पनेची व्याप्ती वाढवलेली आहे. त्यांच्यानुसार, “ग्रामीण विभागात जे नवे प्रबोधन होऊ घातले आहे, त्याचे प्रतिबिंब धारण करणारी ही कथा आहे. सर्वच जातीतील सर्वच धर्मातील, सर्वच जमातीतील पददलितांची मराठी संवेदना तिला सारख्याच मोलाची वाटते. आर्थिकदृष्ट्या समाजाच्या सर्वात खालच्या थरात असलेल्या आणि स्वत:ला समाजाच्या समपातळीवर आणण्यासाठी धडपडू पाहणाऱ्यांच्या व्यथा – वेदनांचे ते साहित्य आहे. जे जे अनुभव या देशीच्या लोकजीवनाच्या खास संवेदना घेऊन उमटणाऱ्या आहेत; त्या सर्वांना हे अधुनिक ग्रामीण साहित्य सामोरे जाऊ इच्छिते.”[1]

गो. म. कुलकर्णी, 'ग्रामीण' या संकल्पनेचे स्पष्टीकरण देताना लिहितात, 'ग्रामीण साहित्य' म्हणजे खेडेगावातील कृषीवर निर्वाह असलेल्या स्पृश्य शेतमजुरांच्या जीवनावर आधारलेले साहित्य; असे समीकरण दीर्घकाळ दृढमूल झालेले आहे." असे मान्य करून ते पुढे लिहितात, "भारतीय ग्रामजीवन हे प्राधान्याने कृषियुक्त असले तरी त्यात कृषिनिष्ठ नसलेलेही बरेच घटक वास्तव्य करतात. या गोष्टीकडे ग्रामीण साहित्याचे दुर्लक्षच झाले आहे. हे साहित्य खेडेगावातील कृषिसंबद्ध घटकाचे एकदेशीपणे (अज्ञान आणि दारिद्रय) दीर्घकाळापासून वितरण करीत आलेले आहे; आणि त्यातही पुन्हा एक साचेबंदपणा डोकावतो. यात दारिद्रयाच्या किंवा अज्ञानाचा निरनिराळ्या दृष्टिकोणातून वेध घेण्याचा प्रयत्न नाही."[2]

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या मते, 'ग्रामीणता' साकार होण्यामध्ये कृषिनिष्ठ संस्कृती, निसर्गसन्मुखता, त्यातून निर्माण झालेले लोकमानस हे घटक महत्त्वाचे ठरतात. त्यातून जगण्याची एक रीत साकार होत जातेच. या रीतीचे चित्रण ज्या साहित्यात आढळते ते ग्रामीण साहित्य म्हणता येईल." 'ग्रामीण' या संकल्पनेला लाभणाऱ्या व्यापक स्वरूपाविषयी कोत्तापल्ले लिहितात, "ग्रामीणतेला एक मूल्याधिष्ठीत आणि समानतेच्या पायावर उभे असणारे जग अपेक्षित आहे. म्हणूनच 'ग्रामीणता' ही संकल्पना व्यापक तर होत जातेच, पण ती सर्वसमावेशकही होत जाते. सर्वप्रकारच्या शोषणाविरुद्ध उभ्या राहणाऱ्या साहित्य प्रवाहांची ती सहकारी होईल किंवा अशा प्रवाहांना पोटात घेऊन एक मोठे रूप तरी धारण करील. कारण ती तेथील 'देशी' लोकांच्या जगण्यातील रीत प्रस्थापित करू पाहते. म्हणून देशीयतेची संकल्पना मांडायची असेल तर ती ग्रामीणतेच्या अंगांनीच मांडवी लागेल, कारण सध्या देशीयतेची भोंगळ मीमांसाच चालू आहे!" [3]

'एकोणिसशे साठ नंतरची मराठी कादंबरी' या लेखात 'ग्रामीणत्वाची' चर्चा करत असताना रत्नाकर बापूराव मंचरकर लिहितात, "साहित्यातून व्यक्त झालेल्या अनुभवाचा भौगोलिक परिसर आणि त्याचे सामाजिक स्वरूप लक्षात घेऊन साहित्याचे अभिव्यक्त आशयाचे वर्णनात्मक विशेषण आहे. अशा साहित्याचा अविभाज्य घटक म्हणून ग्रामीणत्वाकडे पाहणे योग्य ठरेल. मराठी साहित्यात वास्तववादाचे अवतरण घडविणारा आणि सामाजिक स्थित्यंतरांशी संवाद राखणारा असा हा ग्रामीण साहित्याचा प्रवाह आहे." [4]

वरील अभ्यासकांच्या व्याख्यांचा समग्रपणे विचार केल्यास 'ग्रामीणता' या संकल्पनेतील वैशिष्ट्यांना अनुसरून 'ग्रामीणता' या संकल्पनेचे विस्तृतपणे विवेचन करता येते. ग्रामीण साहित्य ग्रामजीवनाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण वास्तवाचा वेध घेते. ग्रामीण जीवनातील भिन्न स्तरावरील प्रामुख्याने खालच्या स्तरावरील माणसांच्या

दुःख वेदनेचे, अज्ञानी वृत्ती, दारिद्रयाचे चित्रण महत्त्वाचे ठरते. ग्रामीण साहित्याच्या केंद्रस्थानी असलेली कृषीप्रधानता हे ग्रामीण साहित्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते. ग्रामीण साहित्याचा समग्रपणे विचार करत असताना कृषीकेंद्रित संस्कृतीतून निर्माण होणारे दारिद्रय, अज्ञान, निसर्ग आणि मातीशी असलेले प्रेम, जातिव्यवस्था, बलुतेदारी पद्धतीशी व एकूण ग्रामजीवनाशी निगडीत रूढी पद्धती, पारंपारिक सामाजिक निष्ठा, समजुती इत्यादींचे चित्रण दिसून येते. कृषिसंस्कृतीचा चालक असलेल्या शेतकऱ्याच्या जीवनजाणिवा या 'ग्रामीणते'चा एक भाग म्हणाव्या लागतील.

ग्रामजीवनाचा अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे कृषिप्रधान संस्कृती. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले ग्रामीण साहित्याची व्याख्या करताना लिहितात, "ग्रामीण साहित्य हे व्यक्तिकेंद्रित तर असतेच, पण त्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीस कृषिकेंद्री संस्कृती, या संस्कृतीने निर्माण केलेले लोकमानस, या संस्कृतीतून निर्माण झालेला गावगाडा (किंवा तत्सम कृषि उपयोगी समाजरचना) इत्यादी घटक सहज ध्वनित होत जातात, त्यातूनच ग्रामीण साहित्य आकार घेत असते."[5] 'ग्रामीणता' या संकल्पनेचा विचार करताना डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे वरील मतही अत्यंत महत्त्वाचे ठरते. यात 'ग्रामीणते'चे कृषीसंस्कृतीशी व ग्रामजीवनाशी असलेले नाते ते अधोरेखित करतात. तसेच व्यक्तिकेंद्रीततेतून, व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीतून निर्देशित होणारी कृषिसंस्कृती, लोकमानसिकता व एकूण गावगाडा म्हणत व्यक्तिपासून समष्टीचे चित्र ग्रामीण साहित्यातून मांडलेले दिसते. या संकल्पनेला अधिक व्यापक बनवत, सर्व प्रकारच्या शोषणातून निर्माण झालेल्या प्रवाहांना आपल्यात सामावून घेण्याचे सामर्थ्य 'ग्रामीणते'त असल्याचे ते विशद करतात. त्यांच्या मते 'देशीयता' ही संकल्पनाही 'ग्रामीणते'च्या अनुषंगाने मांडणे गरजेचे ठरते. डॉ. कोत्तापल्ले अशा पद्धतीने 'ग्रामीणते'च्या व्यापक स्वरुपाची नवी दिशा आपल्या विवेचनातून निर्देशित करतात. 'ग्रामीणते'त अंतर्भूत असलेला वास्तववाद सामाजिक स्थित्यंतरांचा, बदलांचा स्वीकार करत असल्याने, स्थित्यंतरांशी संवाद साधणारा असा ग्रामीण साहित्याचा प्रवाह असल्याचे अभ्यासक र. बा. मंचरकर यांचे मत रास्त ठरते.

'प्रादेशिकता' या संकल्पनेचे स्वरूप अभ्यासकांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. अ. रा. तोरो यांनी आपल्या पीएच. डी. प्राप्त 'आधुनिक मराठी ललित वाङ्मयातील प्रादेशिकता : उद्गम आणि विकास' (१९७३) या आपल्या प्रबंधात प्रादेशिकतेची संकल्पना मांडण्याचा प्रयत्न केला. १९२५ पासून ललित वाङ्मयात 'ग्रामीण' व 'प्रादेशिक' हे नवे वर्गीकरण मानण्यात येऊ लागल्याचे ते लिहितात. "प्रदेश म्हणजे भूभाग, एका भूभागाचे

जीवन म्हणजे प्रादेशिकता, आणि हे जीवन ज्यात चित्रित झालेले आहे ते प्रादेशिक साहित्य. व्यवहारातील प्रदेश हा भौगोलिक आणि राजनैतिक क्षेत्राने व्यापलेला एक घटक आहे; तर साहित्यातील प्रदेश हा प्रामुख्याने सामाजिक व सांस्कृतिक धाग्यांनी विणलेला घटक आहे." डॉ. तोरो यांच्या मते, "प्रादेशिक वाङ्मयनिर्मितीमागेही सांस्कृतिक पुनरूज्जीवनाची प्रेरणा निःसंशय आहे. प्रादेशिक साहित्य हे प्रादेशिक संस्कृतीच्या इतिहासाचे साहित्य आहे." [6]

डॉ. भाऊ मांडवकरांच्या मते, " एखाद्या विशिष्ट भू – भागाचे वास्तव व वेगळे चित्रण करण्यात येऊ लागल्यामुळे अशा चित्रणाच्या लिखाणाला प्रादेशिक हे नाव सर्रास रूढ झाले...उपेक्षित व विशिष्ट भू – भागाचे ठसे उमटविणाऱ्या कादंबऱ्या तयार होताच ग्रामीण कादंबरी प्रादेशिक ठरली." [7]

'प्रादेशिकता' ही नैसर्गिक व सांस्कृतिक वातावरणाला महत्त्वाची ठरते. येथे घडणाऱ्या आर्थिक, सामाजिक ज्वलंत समस्या, त्यांच्यातील अंतर्विरोध, तेथे घडणारे आर्थिक सामाजिक व राजकीय बदल, मनुष्य – मनुष्याचे जुळणारे तुटणारे संबंध, नीतिमूल्ये, भौगोलिक व नैसर्गिक स्थितीवर जनमानसावर होणारा परिणाम, तेथील मागासलेपण आणि अर्धमागासलेपण यातून ही 'प्रादेशिकता' आविष्कृत होते. याशिवाय तेथील बोलीभाषेचे प्रतिबिंब साहित्यात उमटल्याने प्रादेशिकतेचे तत्त्व निर्माण होते. साहित्याच्या संदर्भात 'प्रादेशिकता' हा शब्द जेव्हा वापरला जातो, तेव्हा नागर प्रदेशांना त्यातून वगळले असते. थोडक्यात – विशिष्ट प्रदेशातील संस्कृती, भाषा, समस्या, निसर्ग व समाजजीवन इत्यादी मूल्यवैशिष्ट्यांचे मूल्यमापन करून त्यावर साहित्यात जोर देण्याची प्रवृत्ती म्हणजे प्रादेशिकता होय. अशा साहित्यातून प्रदेश लोकमानस व संस्कृतीचे दर्शन घडविले जाते. प्रादेशिकता म्हणजे वाङ्मयीन जाणिवेची एक अवस्था होय." [8] 'प्रादेशिकता' या संकल्पनेचे विस्तृत असे विवेचन डॉ. रेखा जगनाळे मांडताना दिसून येतात.

डॉ. द. ता. भोसले यांनी 'ग्रामीण साहित्य – एक चिंतन' या ग्रंथातील 'साहित्यातील प्रादेशिकता – सामाजिक दृष्टीकोनातून विचार' या लेखात ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्याचे वेगळेपण दाखविले आहे. "प्रादेशिक साहित्यात विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, परंपरा, शेती, समूहभावना आणि विशिष्ट प्रदेशातील निसर्ग या सर्वांतून निर्माण झालेले प्रश्न आणि जीवननाट्य याचे दर्शन घडविण्यावर भर दिलेला आढळतो. प्रादेशिक साहित्य हे ग्रामीण साहित्याप्रमाणे वास्तव असले तरी ते काहीसे प्रातिनिधिक पातळीवरचे असते. थोडक्यात, प्रादेशिक साहित्य म्हणजे प्रदेशाचे चैतन्यरूप आणि त्या प्रदेशातून साकार झालेल्या

समाजमनाचे चैतन्य जिथे एकात्म स्वरुपात व्यक्त झाले आहे ते साहित्य. विशिष्ट प्रदेश, समाजमन, पात्रांच्या वृत्ती – प्रवृत्तींवरील प्रदेशाचे संस्कार, समाजजीवन. प्रदेश केवळ पार्श्वभूमी नसतो तर साहित्यानुभावांशी तो एकरूप असतो. संस्कृती समूहमनाचा अविष्कार, निसर्ग याशिवाय प्रादेशिकता अपूर्ण राहते. 'नागर' जीवन वगळूनच 'प्रादेशिकता' ही संकल्पना स्वीकारावी लागते. कारण प्रादेशिकतेचा संवेदनशीलतेवर परिणाम होत असल्याने कलावंत आपल्या कलाकृतीतील पात्रांना त्याविशिष्ट प्रदेशाचे, निसर्गाचे रंग बहाल करीत असतो." [9]

द. ता. भोसले प्रादेशिकतेची पुढील व्याख्या करताना लिहितात, "जे चित्रण आपणाला त्या विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, सणसोहळे, जीवनधारणा, तेथील लोकांचे रीतिरिवाज, त्यांचे निसर्गस्थित आयुष्य, कपडेलत्ते, भाषा, इत्यादी बाबींचा जिवंत, स्वाभाविक, वास्तव आणि कलात्मक स्वरूपाचा प्रत्यय आणून देते आणि तदनंतर या वास्तवाच्या पलीकडे झेप घेऊन मानवी मनाची मुलभूत स्पंदने आणि गाभा गाठण्याचा प्रयत्न करते, ती प्रादेशिकता अस्सल प्रादेशिकता मानता येईल. व्यापक, सनातन आणि मुलभूत असे मानवी संबंध सूचित करणारी प्रादेशिकता, ही खरीखुरी प्रादेशिकता मानता येईल."[10]

डॉ. मदन कुलकर्णी 'मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरूप' ह्या ग्रंथात प्रादेशिकतेची चर्चा करताना लिहितात, "प्रदेश म्हणजे विशिष्ट भू – भाग. प्रदेशास नैसर्गिक वैशिष्ट्ये असतात. नद्या, पर्वत, वातावरण, भू – पृष्ठ, खनिजपदार्थ, अरण्य, अन्नधान्य यामुळे ही वैशिष्ट्ये प्राप्त होऊ शकतात. आर्थिक, सांस्कृतिक, प्राकृतिक अशा काही वैशिष्ट्यांनुसार प्रदेश विभागाला जाऊ शकतो. संयोगी व पूरक अभिरुचीतूनही प्रदेशाला पाहता येते. एखाद्या प्रदेशातील प्रांतभाग 'प्रदेश' म्हणून संबोधला जाऊ शकतो. हे प्रदेश विशिष्ट दृष्टीने पूर्णपणे स्वतंत्र घटक मानता येतात. पुष्कळदा असे प्रदेश उपेक्षित राहिलेले असतात. या प्रदेशाचे नाविन्यपूर्ण सौंदर्य, तेथील लोकसंस्कृती, भाषा, प्रश्न इत्यादी गोष्टींचे दर्शन जेव्हा साहित्यिक घडवू लागतात, तेव्हा त्या साहित्याला प्रादेशिक हे विशेषण लावले जात असते. प्रादेशिक साहित्य चित्रण लेखकाच्या कलात्मक प्रवृत्तीचा आविष्कारच मानवा लागतो. 'जनपद' व 'ग्रामीण' संज्ञांचा विषय 'प्रादेशिक' या संज्ञेत करावा." असे मत ते मांडताना दिसतात."[11]

डॉ. रवींद्र ठाकूर यांनी 'र. वा. दिघे यांच्या कादंबरीचा चिकित्सक अभ्यास' या प्रबंधिकेतून 'प्रादेशिक साहित्य' या संकल्पनेचा विचार मांडताना लिहितात, "प्रादेशिकता म्हणजे विशिष्ट भौगोलिक परिस्थितीत नियत झालेल्या ग्रामीण परिसरांची अनेकांगांनी युक्त अशी अनन्यसाधारण विशेषता होय. ही विशेषता जेव्हा

लोकजीवन व काही तत्त्वांच्या रूपाने अस्तित्वात असते अशा प्रदेशाचे जीवन जेव्हा एखाद्या साहित्यकृतीत साक्षात होत असेल तेव्हा त्या साहित्यकृतीस प्रादेशिक म्हणता येईल." [12]

डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर यांनी प्रादेशिकतेसंबंधी सांगताना, "प्रादेशिकता म्हणजे प्रामुख्याने काही भौगोलिक वैशिष्ट्यांनी निर्देशित करता येणारी ग्रामपरिसर संबद्धता, तेथील जीवनाला लाभलेला अनेक वैशिष्ट्यांनी युक्त असा स्वतःचा खास वेगळेपणा, तेथील लोकजीवनाची सामुहिकाता, तेथील निसर्ग आणि जीवन यांच्यातील अन्योन्यता आणि मुख्य म्हणजे त्या परिसराची नागर जीवनसापेक्ष दूरता होय...प्रादेशिकता म्हणजे 'परिवेशप्रधानता' होय." [13]

एनसायक्लोपिडिया अमेरिका क्र. XVII यात, "वातावरणाचा मनुष्याच्या भाग्यनिर्मितीवर प्रभाव होतो असे मानणाऱ्या आणि विशिष्ट स्थानाचा प्राकृतिक आणि सांस्कृतिक इतिहास त्या स्थान निवासीमध्ये जे गुण निर्माण करतो त्या विशिष्ट गुणांना सत्य स्वरूपातच प्रगट करण्याचा प्रयत्न करणाऱ्या, विविध प्रकारच्या साहित्यिक वृत्तींना व साहित्यिक आंदोलनांना प्रादेशिक साहित्य ही संज्ञा दिली जाते." [14]

प्रादेशिकतेचे स्वरूप स्पष्ट करताना रा. रं. बोराडे लिहितात, "माणसाची कातडी बाजूला ठेवून त्या प्रदेशातील व्यक्तींचा विचार करू शकत नाही. तसाच तो विशिष्ट प्रदेश बाजूला ठेऊन त्या प्रदेशातील व्यक्तींचा विचार करता येत नाही. ज्या प्रदेशात ते जन्म घेतात, वाढतात, त्या प्रदेशातला निसर्ग, तेथील लोकांचे आचारविचार, सामाजिक संकेत, सर्वांचा संस्कार होऊनच त्यांचे जीवन घडत असते. तिथल्या मातीनेच त्या व्यक्तिमनाला जन्म दिलेला असतो. त्यांच्या नसानसातूनच ते पाणी मुरलेले असते."[15]

प्रादेशिक साहित्यात उत्कटपणे व्यक्ती आणि मातीचे संबंध जीवंत प्रदेश चित्रणातून व्यक्त होतात. प्रादेशिक साहित्यात निसर्गसिद्ध प्रदेशात बहरणाऱ्या सर्वसामान्य माणसाचे चित्रण होते. या सर्वसामन्यांच्या जीवनाला निसर्ग आकार देत असतो. लोकाचार, श्रद्धा – समजुती, सण – उत्सव, राग – द्वेषातून आकार घेणारी विशिष्ट प्रदेशातील लोकांची मनोरचना 'प्रादेशिकते'तून व्यक्त होते. असे एकूण डॉ. तोरो आपल्या विवेचनातून मांडण्याचा प्रयत्न करतात. निसर्गसौंदर्य व एकूण नैसर्गिक स्थितीचा मानवी जीवनावर होणारा परिणाम याचे जीवंत चित्रण प्रादेशिक साहित्यातून होते अशी भूमिका ते आपल्या विवेचनातून मांडतात. समाज व सांस्कृतिक जीवनाला आकार देणारा हा निसर्ग या संकल्पनेअंतर्गत महत्त्वाचा ठरतो. निसर्ग व सांस्कृतिक जीवनाला

केंद्रस्थानी ठेवणारी 'प्रादेशिकता' ही संकल्पना ठरते. विशिष्ट भूप्रदेशातील प्रामुख्याने नागर प्रदेश वगळत, त्या प्रदेशातील आर्थिक, सामाजिक समस्यांचे चित्रण या संकल्पनेअंतर्गत विचारात घ्यावे लागते. प्रादेशिक साहित्यात समूहजीवनाबरोबर प्रदेश हाही साहित्यकृतीचा विषय म्हणून येऊ शकतो.

### 4.2.1 ग्रामीण साहित्य व प्रादेशिक साहित्य: फरक – भेद

'प्रादेशिक' आणि 'ग्रामीण' या दोन संकल्पना मराठी साहित्य समीक्षेत मानल्या जातात. या दोन्ही संकल्पनांमध्ये बऱ्याच प्रमाणात साम्य असल्याने यातील व्यापक पातळीवर येणारी 'प्रादेशिक' ही संज्ञा स्वीकारावी असे अनेक अभ्यासकांचे मत दिसते. त्याचबरोबर 'ग्रामीण' या संकल्पनेची स्वायत्तता लक्षात घेत 'ग्रामीण' व 'प्रादेशिक' यामध्ये साम्य असले तरी असलेला भेद स्पष्ट करण्याचा प्रयत्न अभ्यासक करताना दिसून येतात. 'ग्रामीण' व 'प्रादेशिक' साहित्याच्या प्रेरणा विचारात घेताना गांधीवाद, शाहू महाराजांच्या चळवळी, सत्यशोधक समाज, महात्मा फुले यांचे कार्य या समान प्रेरणा दिसून येतात.

साहित्यात प्रदेशाच्या निसर्गाचे चित्रण होते, तिथला समाज, चालीरीती, रूढी, परंपरा, बोली, इतिहास इ. द्वारे एक प्रादेशिक तत्त्व निर्माण होत असते. प्रादेशिकतेचा संबंध ग्रामीणतेशी जोडलेला दिसतो. प्रादेशिकतेत 'समूहदर्शन' व ग्रामीणतेत 'व्यक्तीनिष्ठ' जीवन चित्रण अशा पद्धतीने भेदही मांडण्याचा प्रयत्न केला जातो. या संदर्भात 'ग्रामीण कथा' या पुस्तकाचे संपादक अंबादास माडगूळकर व सुर्यकांत खांडेकर यांच्या मते, "प्रादेशिक समजली जाणारी सर्व चित्रणे ग्रामविषयक चित्रणेच असतात. म्हणून प्रादेशिकतेचा अर्थ ग्रामीण 'भू – प्रदेश' असाच घेणे योग्य ठरते."[16] ग्रामजीवन हे प्रदेशजीवनाचेच एक अंग असल्याने व प्रादेशिकतेची वैशिष्ट्ये ग्रामीणता या संकल्पनेतही अंतर्भूत असल्याने या दोन्हींमध्ये भेद मांडणे क्लिष्ट ठरते. डॉ. आनंद यादव यांनी ग्रामीण व प्रादेशिक ही विशेषणे परस्पर विरोधी नसल्याचे सांगत, ग्रामीणतेतील स्थलनिष्ठा आणि प्रादेशिकतेतील परिसर प्राधान्यता हा थोडाफार असलेला फरक नोंदविलेला आहे.

प्रादेशिकतेला ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी लाभलेली दिसून येते. प्रादेशिकता ही ग्रामीणतेतच अन्युसूत असते. ग्रामीण समाजजीवन, बोली भाषा, रूढी, परंपरा, निसर्ग, समाजजीवनातील बदल टिपणे हे प्रादेशिकतेबरोबर ग्रामीण साहित्याचीही वैशिष्ट्ये ठरतात. पण ज्या वेळी हे समाजजीवनचित्रण, निसर्गचित्रण, बोली भाषा, रूढी, परंपरा, समाजजीवनातील बदलांचे चित्र एका विशिष्ट अशा ग्रामीण प्रदेशावर केंद्रीत असते

त्यावेळी ती ग्रामीण कलाकृती प्रादेशिक ठरते असे म्हणावे लागेल. प्रादेशिकतेतील प्रदेशनिष्ठेचा विचार करत असताना साहित्यकृतीतून व्यक्त होणारा निसर्ग हा साहित्यकृतीला प्रादेशिकतेची संज्ञा बहाल करण्यासाठी एक महत्त्वाचा निकष मानवा लागतो.

'प्रादेशिकता' ही संकल्पना समजून घेत असताना श्री. ना. पेंडसेच्या 'गारंबीचा बापू' या अत्यंत गाजलेल्या प्रादेशिक कादंबरीचा विचार करावा लागेल. कुठलीही द्विधा मनस्थिती न ठेवता 'गारंबीचा बापू' ही पेंडसेंची कलाकृती प्रादेशिक असल्याचे अनेक अभ्यासकांनी नोंदविलेले दिसते. श्री. ना. पेंडसेंनी हर्णे, मुरुड, आंजर्ले, मुर्डी या बंदरपट्ट्यांच्या गावांवर व दापोली प्रदेशावर हाडामांसाच्या माणसांसारखे प्रेम केले. कोंकणाच्या मातीचे त्यांच्या वयाच्या पहिल्या अकराव्या वर्षापर्यंत संस्कार रुजले जे त्यांच्या साहित्यातून बहरले व अवघ्या मराठी साहित्यविश्वाला वळण देणारे ठरले. प्रादेशिकतेची दिशा, पेंडसेंनी दिलेल्या वळणाचा विचार केल्यास सुस्पष्ट होते असे म्हणावे लागते. पेंडसेंच्या लेखनात ज्यापद्धतीने हर्णे, मुरुड, आंजर्ले, मुर्डी या प्रदेशातील वास्तवाचा, माणसांचा, निसर्गाचा अंगाप्रत्यांगासह वेध घेण्याचा प्रयत्न होतो असाच प्रयत्न एखाद्या साहित्यिकाच्या साहित्यास प्रादेशिक ठरविण्यास समर्थ ठरते व ग्रामीण व प्रादेशिकतेमध्ये असलेल्या सीमारेषा स्पष्ट होतात. एखाद्या कलाकृतीला प्रादेशिक ठरविण्यासाठी, साहित्यात लेखकाच्या अनुभवविश्वाचा भाग बनलेल्या प्रत्यक्षातला प्रदेश साहित्यकृतीतून प्रकटणे हा प्रादेशिकतेचा महत्त्वाचा निकष ठरतो व ग्रामीण व प्रादेशिकतेमधील अंतर अधोरेखित करणारा ठरतो.

### 4.3 नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतील ग्रामीण जीवनाचे चित्रण

गोमंतकीय कथाकारांमधील ग्रामजीवनाच्या अनुभवविश्वाने ज्यांचे जीवन व्यापले अशा कथाकारांपैकी विठ्ठल गांवस, दयाराम पाडलोस्कर, उदय नाईक अशी काही नावे घ्यावी लागतात. या कथाकारांनी अस्सल असे गोमंतकीय ग्रामीण विश्व, ग्रामीण वास्तव, समाज, सांस्कृतिक जीवन, रूढी परंपरा इत्यादींचा परामर्श आपल्या कथांमधून घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेत उमटलेल्या ग्रामीण साहित्याच्या वैशिष्ट्यांचा विचार करणे गरजेचे ठरते.

### 4.3.1 नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतील कृषी संस्कृतीचे व निगडीत प्रश्नांचे चित्रण

ग्रामजीवनाचा अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे कृषिप्रधान संस्कृती. नव्वदोत्तरी कालखंडात लिहिणारे गोमंतकीय कथाकार विठ्ठल गांवसांच्या कथेतून कृषीकेंद्रीतता ही गोमंतक प्रदेशाच्या परिवेशात वावरते. गोमंतकातील वेगवेगळ्या शेतीपद्धतींच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या व्यथा मांडण्याचा प्रयत्न लेखक करतात. गोमंतकात धान्य पिकवणारा एक शेतकरी तसेच भाट कुळागरातून वावरणारा, भाटकरांच्या कुळांवर पोसलेला कुळ मुंडकार किंवा कुळवाडी हा सुद्धा कृषीजीवनाचाच एक महत्त्वाचा घटक असल्याने कुळ मुंडकरांच्या व्यथा विठ्ठल गावसांच्या कथेत केंद्रस्थानी असलेल्या आपल्याला दिसून येते. इथल्या सांस्कृतिक जीवनातून निर्माण झालेल्या गावगाड्याचे चित्रण ही कथा करते. शेतकरी समाजात जन्माला आलेले, खेड्यात जीवन घालविलेले विठ्ठल गांवस यांच्या कथेमध्ये ग्रामीण समाजजीवनाचे चित्रण केलेले दिसून येते. शहराच्या वाढत्या आकर्षणामुळे शेतीपासून दूरावलेल्या सर्वसामान्य मध्यमवर्गीय शेती अधिकाऱ्याची पुन्हा शेतीकडे वळण्याची तळमळ 'हाक' या कथेमध्ये दिसून येते. विठ्ठल गांवसांच्या 'लवण' या कथासंग्रहातील 'लवण' ही पहिलीच कथा. या कथेत दादू या मीठ उत्पादक शेतकऱ्याच्या दारूण अवस्थेचे चित्रण करण्यात आलेले आहे. मीठागरात पिकवलेले मीठ खाल्ल्यास गळा मोठा होऊन रोग होतो, त्यामुळे मीठ उत्पादनावर लादलेली बंदी व त्याविरुद्धचा दादूचा लढा याचे चित्रण लेखक करतात. या कथेत सरकारविरुद्ध संघर्ष आहेच त्याचबरोबर दोन पिढ्यांचा संघर्षही आहे. दादू पारंपारिक शेती टिकविण्याच्या प्रयत्नात आहे तर त्याचा मुलगा मीठ उत्पादनाला घाण म्हणणाऱ्यांपैकी आहे. तो शिपायाची नोकरी मिळवतो व तुटपुंज्या पगारावर समाधानी आहे पण त्याला शेती करायची नाही. सरकारच्या विरुद्ध जाणाऱ्या दादूला जेव्हा पोलीस पकडून नेतात तेव्हा दादूचा मुलगा त्याला सोडवतो, पण वडिलांना फसवून त्यांची सही मिळवतो व मिठाची शेती बंद पाडणार या अटीवर सरकारकडून पैसेही घेतो. आपली फसणूक झाली तरीही आपल्या मुलापुढे न झुकणारा दादू पुन्हा शेतात जातो पण शेवटी दादुच्या शेतात बांद फुटल्याने समुद्राचे पाणी शिरते व केलेली शेती नष्ट होते. ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी साकारत रघुनाथ या भाबड्या शेतकऱ्याची स्थिती 'वादळ' या कथेतून लेखक चित्रित करतात. ही कथा एक सर्वसामान्य शेतकऱ्याची व्यथा असल्याचे आपल्याला दिसून येते. या कथेतील शेतकऱ्याचे वादळामुळे घराचे छप्पर उडालेले असते. सरकारकडून दिलेली देणगी सरपंचाच्या मध्यस्थीने कशी गटवली जाते हे ग्रामीण स्तरावली भ्रष्टाचाराचे चित्रण लेखक करतात. या कथेत पेरणीसाठी, गुरांना झाडपाला देण्यासाठी चाललेली रघुनाथची धडपड इत्यादींचे चित्रण येते. शेवटी सत्तेपुढ्यात भाबड्या मनाच्या शेतकऱ्यांना नमते घ्यावे लागते याचे चित्रण

'लवण' 'वादळ' या कथांमध्ये लेखक विठ्ठल गांवस करतात. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेत ग्रामजीवनातील अर्थव्यवस्थेचा तारणहार असलेल्या शेतकऱ्याचा संघर्ष चित्रित झालेला आहे. कधी हा संघर्ष शेतकरी शेतीपासून दुरावल्याने आहे तर कधी दोन पिढींमधील निर्माण झालेल्या अंतरामुळे, ज्यात पहिल्या पिढीचा प्रयत्न कृषिकेंद्रित संस्कृती टिकवण्याचा आहे. राजकारणामुळे आज शेतकरी अनेक सुविधांपासून वंचित होत आहे याचे चित्रण नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेत येते.

विठ्ठल गांवस यांच्या 'सौदा' या कथेमध्ये 'मीर्ग' म्हणजेच मृगाचा पाऊस येण्याआधी नागरणीची तयारी करण्यास जोतासाठी एक बैल शोधणाऱ्या शेतकरी समाजाची धडपड लेखक मांडतात. ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर बैलांवर मुलांसारखे प्रेम करणाऱ्या धाकू या शेतकऱ्याची 'सौदा' ही कथा आहे. पावसाळ्याचे दिवस जवळ आल्याने सतत आपल्या बायकोकडून बोलणी ऐकावी लागत असल्याने शेवटी स्वस्तात बैलाचे जोत मिळवून आपला एक बैल विकण्याची पाळी धाकूवर येते. मुलासारखा असलेला धाकूचा बैल दुसऱ्याच्या हवाली जाताना भावूक होतो. शेवटी आपण आपला बैल कत्तलखान्यात दिल्याचे धाकूला समजताच धाकू कोलमडतो अशी 'सौदा' ही कथा येते. ग्रामीण कृषीजीवनातील प्रश्नास लाभलेली एक भावनिक किनार 'सौदा' या कथेतून लेखक मांडत, धाकू या शेतकऱ्याच्या संघर्षाचे चित्रण लेखक करतात. 'नांगरणी' ही गोमंतकीय ग्रामीण पार्श्वभूमीवर आधारित कथा कृषीजीवनाशी संबंधित कथेत शेतकरी आणि त्यांच्या गुरा वासरांमध्ये असलेले भावबंध चितारण्याचा प्रयत्न लेखक करतात. अंतू शेतकरी आपल्या बैलांना नांगरणीसाठी जुंपून आपल्याला काम मिळेल या आशेने थांबलेला असतो. नांगरणीचे काम मिळाले तर आपले जीवन सुखकर होईल, बैलांना पाडव्याच्या सणाला सजविता येईल, कुटुंबीयांना कपडेलत्ते घेता येईल असे संकल्प अंतू करतो. आंतोन भाटकाराच्या शेतात प्रतिदिन दहा रुपये या दराने त्याला नांगरणीचे काम मिळते. पण नांगरणीच्या वेळी कधीही न बसणारा बैल त्या दिवशी बसतो. अंतू त्याला काठीने बडवत उठवण्याचा प्रयत्न करतो पण या सगळ्यात त्याचा अख्खा दिवस संपतो. मुबलक काम न झाल्याने दहा रुपयाचा दिसवडा देऊन भाटकर त्याला दुसऱ्या दिवसापासून कामात येण्यात मनाई करतो. अंतूचे सर्व मनोरथ उधळले जातात. त्यात बैलावर त्याने मारलेल्या काठीचे वळ उमटलेले पाहून तो दु:खी होतो. पश्चातापाने त्याला झोप येत नाही. बैल आजारी असल्यामुळे नांगरणीचे काम करण्याऐवजी वारंवार बसत होता याची जाणीव त्याला होते. तो घाईघाईने त्याला औषध देण्यास गोठ्यात जातो, गोठ्याचे कवाड उघडतो तर तिथे बैल चारही पाय ताठ करून आडवा पडलेला असतो. शेतकऱ्याचे गुरावासरांवर अवलंबून असलेले जीवन व त्यांच्याविषयी वाटणारी आत्मियता अंतू या

पात्राद्वारे व्यक्त होताना दिसून येते. गोमंतकीय ग्रामीण सांस्कृतिक जीवनाचा, कृषीजीवनाचा मोठा पट विठ्ठल गांवस यांची कथा मांडताना दिसून येते. ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी लाभलेली, आशयदृष्ट्या वेगळया धाटणीची कथा म्हणून या कथेचा विचार करावा लागतो. गोमंतकीय ग्रामीण राहणीमानातले संदर्भ देत ग्रामीण वातावरण चित्रित करण्याचा प्रयत्न लेखक करतात. उदा. 'चंवर' या कथेत शेतात तरवा लावणारी शेवतें तिच्यासोबत काम करणाऱ्या अन्य बायकांची मनोवृत्ती इत्यादींचे चित्रण करत ग्रामीण कृषीसंस्कृती मांडण्याचा प्रयत्न विठ्ठल गांवस करतात. पात्रांच्या माध्यमातून भाबड्या अशा ग्रामीण मनोवृत्तीचे चित्रण गांवसांच्या कथेतून होताना दिसते.

ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर उदय नाईक यांची 'शागोती' ही कथा येते. खाण व्यवसायामुळे डोंगर पोखरल्याने, माणसांच्या जंगलावरील अतिक्रमणामुळे जंगली जनावरे जंगले गमवून लोकवस्तीकडे वळताना दिसून येतात. 'शोगोती' या कथेतही वाघूट म्हणजे वाघ चवताळल्याने धष्टपुष्ट असा सोमूचा बैल मारला जातो. आपली चानू ही गाय न परतल्याने भिवा तिला शोधत  कासावीस होतो. सकाळी सोडलेली त्याची दुभती गाय संध्याकाळपर्यंत परत आलेली नसते. वाघाचा उपद्रव शांत करण्यासाठी कर्पानास या ग्रामदैवताला तो विडा ठेवतो. दुरून वाघाचा आवाज आल्याने तो घाबरतो तर झाडीतून चानू घरी परतते. चानू व्याल्यानंतर दोन तीन घरात दूध विकून आपले बाकी असलेले थकीत पैसे फेडणार असल्याचे मोठा भाटकार व दुकानदार असलेल्या शणै पसरकारास भिवा सांगतो. चानू व्यायल्यानंतर बऱ्याच जणांना पैसे देण्याचे आश्वासन देतो. एके दिवशी डुक्करांचे भिरे सरसरत पळत असल्याचे त्याला दिसते व बॉम्ब घालून डुक्करांना मारण्यासाठी उत्तरप्रदेशातून लोक आल्याचे त्याला लकमुच्या माध्यमातून समजते. डुक्कर मिळाला तर आपल्याला चविष्ट शागोती मिळेल या आशेने भिवा बॉम्ब लावण्यासाठी डुक्करांची ये जा होत असलेली जाग लकमूला दाखवतो. शागोतीच्या नादात माळावरील लुवणीचे व भाटकाराचे नारळ पाडण्याचे काम बाकी असल्याने काम न केल्यास शिव्यांची लाखोली वाहिली जाईल या भितीने तो निघतो. कापलेले गवताचे ओझे डोक्यावर घेऊन फिरताना भिवाच्या डोक्यात, डुक्कर मिळाला तर चविष्ट शागोती खायला मिळणार याचाच विचार घुमत असतो. भाटकाराचे काम करून तो घरी परततो. रात्री झोपण्याचा प्रयत्न करतो पण डुक्कर त्याच्या डोळयांपुढ्यात येऊ लागतो. इतक्यात बॉम्ब फुटल्याच्या आवाजाने तो शेतात जातो. शेतात मोठा डुक्करच बॉम्ब फुटून घायाळ होऊन तडफडतो या विचाराने आनंदी होतो. पण तिथे त्याची चानू गाय रक्ताच्या थारोळयात वेदनेने फडफडताना त्याला दिसते. चानू रात्री दावं तोडून शेतात गेलेली असते व खाद्य समजून तिने बॉम्ब तोंडात घेतल्याने त्याचा स्फोट होऊन ती तडफडत मरण पावते. चानूला हाक मारणारा भिवा गर्भगळीत होतो अशी एकूण शोकांतिका 'शागोती' या कथेत

येते. शेतीभाटात काम करणारा, ग्रामीण जीवनातील कृषीसंस्कृतीशी बांधील असलेला, आपल्या गाईवर संसाराची भिस्त ठेऊन जगणारा सर्वसामान्य भिवा, शागोतीच्या लालसेने आपल्या गाईला गमावून बसतो अशी ‘शागोती’ ही कथा येते. ग्रामजीवनात कृषिधिष्टीत संस्कृती व ग्रामीण माणसाचे गुरा वासारांशी जुळलेले भावबंध, कृषिजीवनाचा महत्त्वाचा भाग असलेल्या मुक्या प्राण्यांचा आज कशापद्धतीने नाहक बळी दिला जातो याचे चित्रण विठ्ठल गांवस तसेच उदय नाईक यांच्या कथेतून दिसून येते.

कृषिजीवनाशी निगडीत प्रश्नांची मांडणी करणाऱ्या नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथांना कृषिजीवन व कृषी संस्कृतीची पार्श्वभूमी लाभलेली दिसून येते. मिलिंद म्हामल यांच्या ‘आलकाण्याचो डोंगर’ या कथेत डोंगराच्या उतरणीवर पावसाळ्यात नाचणी, उडीद, कुळीथ या पिकाची लागवण करणाऱ्या कष्टकरी, कृषी व्यवसायात असलेल्या समाजाची पार्श्वभूमी लेखक मांडतात. गजानन देसाई यांच्या ‘कुळागर’ या कथासंग्रहातील ‘कुळागर’ या कथेत गाव वसणाऱ्या नदीकाठी आपले छोटेसे खोपटे बांधून पोफळींच्या बागा फुलवणारा हरिभट या येतो. आपल्या कुळागरांना जीवापाड जपणाऱ्या हरिभटाला गावातील पोरे ‘कुळागारातला देवचार’ म्हणत चेष्टा करतात. आयुष्यभर कुळागरांची देखभाल करणाऱ्या अविवाहित असलेल्या हरिभटाला साठीकडे झुकताना अख्खे आयुष्य एकांतवासात घालविल्याने उतारवयात तीर्थाटनास जायची इच्छा होते. आपल्या बागायतेची राखण कोण करणार? आपल्या चांदणी या लाडक्या शेळीची काळजी कोण घेणार या सर्व गोष्टींचा विचार करता करता शेवटी आपला गावात एकमेव विश्वासू असलेल्या रामू वाण्याकडे तो जातो. उतारवयात तीर्थाटनास जाणारा हरिभट परतेल की नाही याची शाश्वती नसल्याने हरिभटाचे वैभव आपणास भोगत येईल या विचाराने रामा वाणी सहजपणे हरिभटाची इच्छा स्वीकारतो. रामा वाणी आपला कारभार मुलांकडे देत हरिभटाच्या कुळागरात बायकोसहित वास्तव्यासाठी येतो. महिने उलटतात हरिभट परतत नसल्याने कुळागरांवर आपला हक्क बजावू पाहतो. सरपंचाच्या मदतीने अंधश्रद्धाळू गावकरांना फसवून कुळागर हस्तगत करतो. ठरल्याप्रमाणे सरपंचासही आपल्या कुळागरातून येणाऱ्या मिळकतीचा हिस्सा देण्याचे ठरवतो. अन् तब्बल दीड वर्षांनी आपल्या लाडक्या चांदणीला पुकारत एका वीस – पंचवीस वर्षाच्या स्त्रीशी विवाह करून एका गोंडस बाळाला घेऊन हरिभट परततो. कुळागराची निष्ठेने जपणूक करणाऱ्या हरिभट व त्याच्या कुटुंबाच्या स्वागतास कुळागराच सज्ज झालेले असते. आपल्या कुळागरांशी निष्ठावान असलेला, ग्राम जीवनातील संस्कारांनी पोसलेल्या, ग्रामीण कृषीजीवनाशी नाळ जोडून जगणाऱ्या हरिभटाचे चित्रण लेखक करतात.

गजानन रायकर यांच्या शेतीपद्धतींचे वर्णन करत गोमंतकीय ग्रामीण जीवन, राहणीमान, गावगाड्यातील जातीव्यवस्था इ. चित्रण 'रोव' या कथेत येते. लाडक्याच्या घरात रांयगिणीत शेतात 'रोव' लावायचे असल्याने घरात धावपळ सुरू होते. 'रोव' या कथेत ग्रामीण लोकजीवनाचे चित्रण लेखक करतात. 'रोव' घालण्यास बिजाला मोड आणण्याच्या पद्धतीचे चित्रण येते. वाण्याच्या दुकानातून घाटी बियांचे दोन साक आणले जातात. या बियांचे चार भाग करून साकाच्या पिशवी व्हाळाच्या पाण्यात बुडविल्या जातात, त्याच्यावर दगड ठेवले जाते व त्या बिजाला नंतर मोड येते. गोमंतकीय वायंगण शेतीपद्धतीचे चित्रण या कथेत करताना लेखक लिहितात, "शेळीचे दिवस असले म्हणजे शेतकऱ्यांना फारसे कष्ट पडत नाही. पावसाळ्याचा अंदाज घेऊन नांगरणी केली. मेरा तासल्या की बी पेरून मोकळे. वायंगणाचे तसे नव्हते. त्यासाठी आधी व्हाळावर बांध घालून पाणी अडवायचे. सबंध शेतातून जवळ खणून त्या पाटांतून ते पाणी खेळवायचे आणि मगच त्याची नांगरणी करायची."[17] शेतातल्या कामांत पुढाकार घेणारा लाडका या कथेत येतो. रांयगिणीत त्याचेच शेत मोठे असते. ग्रामीण रूढी परंपरेनुसार पेरणी सुखरूप होण्यासाठी तो शेतातल्या गोळीवरच्या देवचाराला सोरो म्हणजेच दारू व 'रोंट'(तांदळाची भाकरी) घालतो. शेतात कीड पडू नये म्हणून औषध आणून शेतात घालतो. दसवंत व रामा शेतातील मेऱ्या पुसून काढतात. बैल माणसांच्या बरोबरीने राबतात, लाडक्याचे आपल्या बैलांवर विलक्षण प्रेम असते. दुसऱ्या दिवशी 'रोव' म्हणजेच पेरणीसाठी लाडका सर्व गावकऱ्यांना मदतीसाठी बोलावतो. मालकुम म्हणजेच लाडक्याची बायको. सगुणे, माणकू या शेजारी बायांच्या मदतीने 'रोव' साठी जमलेल्या सर्वासाठी जेवणाची उत्तम तयारी करण्यात येते. ग्रामजीवनातील एकमेकांस सहाय्य करण्याच्या प्रवृत्तीचे चित्रण अशा पद्धतीने लेखक करतात. शेतातल्या देवचाराला सांगणे करून कामाची सुरूवात होते. पुढील शेतातील कामाच्या स्वरूपाचे चित्रण करताना लेखक लिहितात, "लहान मुले व बायका कुणग्यांत उभी राहून शेण शिंपडू लागली. त्यांनी चिखल व शेणाचे चांगले मिश्रण केले. मुले तर चिखलात शेण शिंपडताना एकमेकांवर मारून खेळू लागली. त्यांची शरीरे चिखलाने माखून निघाली. सारे शिंपण्याचे काम शांतू व तिच्या जावेने आपणाकडे घेतले. कुणग्याच्या प्रत्येक भागात, कोपऱ्यात सारे पडायला पाहिजे याची त्या दक्षता घेत होत्या. दसवंताने बैल नांगराला जुंपले व शेण सारे शिंपडलेल्या कुणग्याची परत एकदा नांगरणी करायला सुरूवात केली. दादी, नानू, भाऊ, भिकारो वगैरे शेजारी आपापल्या परीने, मेरा लिंपणे, बियाण्याच्या टोपल्या मेरेवर आणून ठेवणे, गोबोर शिंपणे वगैरे कामे करीतच होते. कुणी कुणाला काय काम करावे हे सांगतच नव्हते. जो तो आपण होऊन पडेल ते काम करीत होता. सूर्य कासराभर वर आला. पेजेचा बुडकुला माथ्यावर घेऊन मालकुम बांधावर आली. तिच्या बरोबर

शेजारची माणकू एका टोपलीत ताटल्या व तोंडी लावणे घेऊन आली होती.”[18] पेजेबरोबर ‘भाजलेले सुके’(खारवलेले मासे) व खळातल्या आंबल्या (खारवलेल्या कैऱ्या) खाण्याच्या पद्धतींचे चित्रण कथेत येते. दुपारच्या वेळी शेतात काम करणाऱ्यांसाठी पेज पाठवली जायची. गोमंतकीय खाद्यसंस्कृती व ग्रामीण लोकजीवनाचा हा महत्त्वाचा भाग ठरतो. अत्यंत आनंदाने शेतात राबणाऱ्या गावाचे चित्रण कथेत येते. ‘रोव’ शिंपडणारा लाडका, बीजाची पेरेणी आनंदाने करत असे. पेरणी पार पडल्यानंतर देवाचाराचे आभार मानले जात असे. दारातल्या तुळशीला दिवा लावून देवाला फुल वाहून शेतात राबलेल्या सर्वांच्या कपाळावर गंधाचा टिळा लावला जात असे व हात जोडून घरात जे शिजलेले आहे ते गोड मानून जेवण्याची नम्र विनंती करत गावातील लोकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली जात असे. ग्रामसंस्कृतीचे अनेक पैलू ही कथा उलगडते. तृप्त होऊन सगळा गाव आपआपल्या घरी परतल्यानंतर शेवटी येसू म्हारीणीचे टोपली घेऊन लाडक्याच्या अंगणात येणे, भरपूर भात व बनविलेले जिन्नस तिला वाढण्यात येणे व लाडक्याला आशीर्वाद देऊन तिचे तृप्त होऊन परतणे इत्यादींचे चित्रण करत, शेतात ‘रोव’ घालणे सणासारखे ग्रामजीवनात साजरा केले जाते. गावातील लोकांमध्ये दुजाभाव न ठेवता सर्वांना तृप्त केले जाते असे एकूण चित्रण कथेत येते.

ग्रामीण कृषीजीवनाच्या पार्श्वभूमीवर दयाराम पडलोस्कर यांच्या ‘गुपित’, ‘तायडी’ या कथा आलेल्या आहेत. ग्रामजीवनाच्या पार्श्वभूमीवर ‘तायडी’ ही कथा आलेली दिसते. ग्रामीण पार्श्वभूमी उभारताना दिवस रात्र वायंगण शेतीत नांगरणी करणारे निवेदकाचे बाबा, शेतात ‘तरवो’ लावण्याच्या घाईगडबडीत असलेले निवेदकाचे कुटुंब असे एकूण चित्रण येते. पाडलोस्कर शेतकऱ्याची व्यथा मांडण्याचा प्रयत्न ‘लुवणी’ या कथेमध्ये उत्तम पद्धतीने  करतात. वैशाखाच्या उंबरठ्यावर म्हणजेच भात कापण्याच्या हंगामाच्या पार्श्वभूमीवर ‘लुवणी’ ही कथा येते. आकाशात काळे ढग साचू लागल्याने सकू आपल्या पती सुभल्याला, कामेरी मिळत नसल्याने स्वत:च लुवणीला सुरूवात करत असल्याचे सांगत मोठा धीर देते. विळया (कोयत्या) घेऊन लुवणीला जायची त्यांची तयारी असते. त्यात उमी व मन्या या दोन्ही मुलांमध्ये भांडण होते. ते निस्तरायला गेलेला सुभल्या उमेला काठीने मारतो. उमी बेशुद्ध पडल्याने बवाळ माजतो. सकू निपचित पडलेल्या आपल्या मुलीला पाहून हंबरडा फोडते. नाग्याच्या सह्याने उमीला हॉस्पिटलमध्ये नेले जाते. दुसरीकडे गावात पाऊस आल्याने एकच धावपळ उडते. कोण भाताच्या ‘उडव्यांवर’ प्लास्टीक घालायला धावतो तर कोण अंगणात सुकत असलेले भात गोळा करतो. पाऊस धो धो कोसळतो. उमीच्या आजारामुळे लुवणी काम खोळंबल्याने पाऊस आल्यानंतर घरी असलेल्या सकूला शेतातील परिस्थिती आवाक्यात आणता येत नाही.  काही दिवस हॉस्पिटलमध्ये गेल्याने

'लुवणी' चुकते. पावसाने शेताची नासधूस होते. उमीची तब्येत सुधारते. आपल्याच काठीने मारल्यामुळे आपल्या मुलीवर ही पाळी आल्याने सुभल्या कोसळलेला असतो. लुवणीचे नुकसान झाल्याचे सकू व सुभाल्याला येणारे गावकरी सांगत असतात. मुलीच्या पुनर्जन्मापुढे दुसरे काहीच महत्त्वाचे नसल्याचे त्यांना वाटते. पण सगळे स्थिरस्थावर झाल्यानंतर सुभल्या लुवणी करण्यास शेतात जातो. पण अख्खे शेत जमिनीवर झोपल्याचे पाहून त्याला धक्का बसतो. पावसामुळे आडव्या पडलेल्या भाताच्या कणसांना कोंब फुटतात, रुजलेल्या दाण्यांकडे पाहून तो रडतो. उमी बरी होते पण पोटाच्या भुकेचा प्रश्न मात्र संपत नाही. सुभल्याच्या माध्यमातून संसारिक दु:खापेक्षा शेती नष्ट झाल्याचे शेतकऱ्याचे दुखणे हे थेट पोटाच्या भुकेशी जुळलेले असते याचे चित्रण 'लुवणी' या कथेत लेखक करतात.

उदय नाईक यांच्या 'अवसर' या कथेत ग्रामजीवनाशी इथल्या चालीरीतींशी जुळलेल्या पावटूची कथा येते. शिरू या पावटूच्या मुलाला आलेला ताप मस्तकात भिनल्याने त्याला वेडाचे झटके येत असतात. पावटू त्या दु:खावर मात करीत शेतात राबत असतो. शेतीव्यवसाय करणाऱ्या पावटूचा खाणव्यवसायाला विरोध असतो. खाण व्यवसायामुळे गावाची एकी दुभंगली जाते. डोंगर विकला गेल्याने खाणव्यावसायिकांनी डोंगर आडवा तिडवा चिरलेला असतो. धुवाधार पावसामुळे खाणीतील माती शेतात उतरलेली असते. खाणीमुळे आपली शेती बर्बाद झाल्याने खाण व्यावसायिकांना शिव्या हासडतच पावटू डोंगराखालच्या पायवाटेवरून जाताना डोंगराचा वरचा भाग फुटतो. दगड मातीचा लोंढा खाली येऊ लागतो. खालून जाणाऱ्या पावटूला स्वत:चे संरक्षण करण्यासही वेळ मिळत नाही व तो मातीच्या ताड्याखाली फेकला जातो. पावटू बचावतो पण जांघेपासून पाय तुटल्याने त्याच्या नशिबी कुबड्या येतात. खाण व्यवसायामुळे होणारे अपघात व निर्माण झालेल्या शेतकऱ्याच्या शोकांतिकेचे चित्रण या कथेत येते. एकूण नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेत शेतकऱ्यांचा कृषीसंस्कृती टिकविण्याचा संघर्ष, गुरां वासरांवर असलेले प्रेम, खाण व्यवसायामुळे उद्‌ध्वस्त झालेली शेती इ. चित्रण येते. नव्वदोत्तरी कृषिसंस्कृतीचा पाया असलेल्या शेतकऱ्याची एक पिढी निष्ठावान आहे, कृषिजीवनाच्या असतेपणाची तारणहार ठरलेली आहे व एक नवीन पिढी आहे जी जागतिकीकरणाच्या पडसादांना स्वीकारत कृषिजीवनावर हावी होत असल्याचे या कथालेखनातून दिसून येते. गोव्यातील वैशिष्ट्यपूर्ण अशा कृषिजीवनासंबंधीत भिन्न शेती पद्धतींचा आलेख पार्श्वभूमीस्वरूप नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा लेखनातून आलेला दिसतो.

### 4.3.2 ग्रामीण समाजव्यवस्था व ग्रामीण वास्तवाचे चित्रण

ग्रामव्यवस्थेत जातीयतेला दिले जाणारे महत्त्व आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या ग्रामीण वास्तवावर भाष्य करण्याचा प्रयत्न कथेतून दिसतो. सर्वसामान्य मास्तराच्या मुलाशी संबंध ठेवून गरोदर असलेल्या सुलूच्या लग्नास नाना भाटकार विरोध करतो व त्यांची मुलगी सुलू आत्महत्या करते. मुलीच्या मृत्युनंतर नाना व नानाची बायको सुभद्रा यांची झालेली अवस्था लेखक विठ्ठल गांवस चित्रित करतात. ‘बांध’ या कथेत ग्रामीण समाजव्यवस्थेला छेद देत, जातीची सर्व आवरणे बाजूला सारत सुलूनंतर आपल्या मानलेल्या विमल या मुलीच्या सुखासाठी नाना भाटकार, गावडा समाजातील मुलाशी थाटामाटात लग्न लाऊन देण्याचे ठरवतो. लेखक विठ्ठल गांवस समाजव्यवस्थेला चिमटे काढत जातीव्यवस्थेतील फोलपणा स्पष्ट करत, उच्च नीचतेच्या प्रश्नावर, माणसामाणसांमधील भेदावर ‘बांध’ या कथेतून भाष्य करताना दिसून येतात. ग्रामीण रूढी - परंपरा, श्रद्धा – अंधश्रद्धेच्या नावाखाली ग्रामव्यवस्थेत दरिद्री जीवन जगणाऱ्या महार समाजाचे चित्रण गांवस करतात. महाराकडून नवरीची दृष्ट काढण्याची प्रथा गावागावात आहे. विणलेल्या टोपल्या, सुपे, यांची विक्री न झाल्याने आपल्या पोटाची सोय करण्यास नवरीची दृष्ट काढू गेलेल्या महाराची कथा लेखक लिहितात. महार समाज व या समाजांतर्गत असलेल्या चालीरीती, ग्रामीण व्यवस्थेने नेमलेला व्यवसाय, दारिद्रय याचे चित्रण विठ्ठल गांवसांच्या ‘दृष्ट’ या कथेमध्ये दिसून येते. दयाराम पाडलोस्करांच्या ‘तायडी’ या कथेत शेतीकामासाठी कामेरी मिळत नसल्याने ‘अडला हरी गाडवाचे पाय धरी’ म्हणत म्हद्ग्या महाराच्या बायकोला कामासाठी बोलाविण्यात येते. ‘दृष्ट’, ‘तायडी’ या कथांमधून ग्रामीण समाजजीवनातील अस्पृश्यतेचा उल्लेख येतो.

प्रदेशनिष्ठा जपत गोमंतकातील बदलांचा वेध घेणारे कथाकार ज्ञानेश्वर कोलवेकरांना पूर्णतः ग्रामीण कथाकार म्हणणे योग्य ठरत नाही. त्यांच्या एकूण कथा लेखनात आलेल्या ग्रामजीवनाला केंद्रस्थानी ठेवलेल्या कथेचा विचार करायचा झाल्यास ग्रामीण जीवनाचा संदर्भ देत कुळ मुंडकारांची व्यथा मांडणारी ‘झोपडी’ ही कथा येते. ग्रामीण समाजव्यवस्थेतील वास्तव चित्रण या कथेत येते. ग्रामीण जीवनातील भाटकाराच्या प्रवृत्ती या कथेमधून लेखक चित्रित करतात. दारूवर उधळपट्टी करणारा, मृत्युशय्येवर असलेल्या, आपल्यासाठी राबणाऱ्या कुळांना वेळप्रसंगी झिडकरणारा, कुणब्यांच्या मुलीवर बलात्कार करणाऱ्या भाटकाराच्या प्रवृत्तीचे चित्रण लेखक करतात. गोमंतकातील पिढ्यान पिढ्या जागेवर पोसलेल्या कुळांची जागा बळकावण्याचा प्रयत्न कशापद्धतीने केला जातो याचे वास्तव चित्र ही कथा मांडते. गजानन रायकरांची गोव्यातील मुंडकार व्यवस्थेवर भाष्य करणारी

'मुंडकार' ही कथा येते. टिचभर जमिनीच्या तुकड्यावर हिरूचा बाप झोपडी बांधून राहतो आणि त्याच्या पुढील सर्व पिढ्यांनी त्या भाटकाराची हमाली करावी असे ठरते. कुळांसाठी केलेल्या व्यवस्थेनुसार मुंडकार शेता भाटांत राबतो व पिकाचा मोठा भाग खंड म्हणून भाटकारस देणे त्याच्यासाठी सक्तीचे असते. ग्रामीण कृषिसंस्कृतीचा महत्त्वाचा भाग असलेल्या मुंडकाराची ग्रामीण समाजव्यवस्थेत कशा पद्धतीने गळचेपी केली जाते याचे प्रत्ययकारी चित्रण लेखक करतात.

कुळवाड्यांचे प्रश्न नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेमध्ये ठिकठिकाणी विखुरलेले दिसतात. दयाराम पाडलोस्कर यांची 'विस्कटलेल्या काजूबीया' ही कथा कुळवाड्यांच्या व्यथेच्या पार्श्वभूमीवर आकार घेताना दिसून येते. कुळवाडी असलेल्या कांताने नारायण रावळ या गृहस्थांचे काजू रान खंडाला घेतल्याने परंपरागत चालत आलेल्या भाईभटांच्या घरातील कामांकडे दुर्लक्ष होते. गोव्यात भाटकारांच्या जागांवर पोसलेल्या कुळ मुंडकार वा कुळवाड्यांच्या पिढ्यांनी भाटकाराकडून मिळालेल्या जागेच्या बदलात त्यांच्या घरची मोफत चाकरी करावी अशी पद्धत होती. कांताने खंडाने जागा घेत आपल्याकडे पाठ फिरविल्याने कुळं शेवटी घात करतात असे भाईभटांचे मत बनते. आपल्या आईवडिलांनी मुकाट्याने भाईभटाची बरीचशी कामे करून त्यांच्यावर उपकार केल्याचे कांता सांगतो. दोहोंमध्ये वाद निर्माण होतो व शेवटी आपण लाकूड फोडून देणार असल्याचे कांता कबूल करतो. भाईभट मात्र कांता आपले उपकार विसरल्याचे गावभर सांगत फिरतो. वास्तविक भाईभटाचे वडील बाबाभटाला कांताच्या वडिलांनीच म्हणजेच नानांनी केळबाय देवळाचा पुजारी म्हणून ठेवण्यास मंजुरी मिळविलेली असते. नाना हळू हळू बाबाभटांचा शब्द न् शब्द पाळू लागल्याने बाबाभटाने त्याचा फायदा घेत सगळीच जागा बळकावलेली असते. शेवटी आपणच हा मान बाबाभटासारख्या अयोग्य माणसास दिल्याने नाना खंती होतो. कांताच्या आईच्या निधनानंतर दुसऱ्या लग्नासाठी स्थळ पाहण्यास नाना खूप फिरतात. लग्न जुळल्यावर मदतीच्या अपेक्षेने बाबाभटांकडे जातात पण नानांचा अपेक्षाभंग होतो. गतआठवणीत रमत शेवटी कांता लाकडे फोडण्यास भाईभटाकडे जातो. तिथे असलेला बाबाभट त्याला हिणवत लाकूड फोडण्याची आज्ञा देतो. भाईभटाच्या घरात भरपूर लाकडे मोफत फोडून देत आपण पिढ्यानपिढ्यांचे ऋण फेडल्याचे कांताला वाटते. कांता परत आपल्या काजू रानात स्वत:स गुंतवून घेतो. एके दिवशी अचानक भाईभट माफी मागण्यास कांताच्या घरी येतो. आपल्या काकीच्या मुलीच्या लग्नसोहळ्यास पुण्याला जाणार म्हणून लाकडे फोडून घेतल्याचे सांगत कामाचा योग्य मोबदला देत राग विसरून जाण्यास सांगतो. पण बाबाभटाच्या घरावर भयंकर संकट कोसळते. पुण्यात गेलेले बाबाभटाचे कुटुंबीय गोव्यात परतत असताना अख्या घराण्याचा बळी गेल्याचे

गावकरी बाबग्याकडून कांताला समजते. नारायणास खंडाच्या काजूबीया पोहोचवण्यास निघालेल्या कांताच्या हातून पिशवी खाली सांडते. कांता हादरतो. अनेक विचार विस्कटलेल्या काजूबियांपरी त्याच्या मनात विस्कळतात. कांताच्या मनोवृत्तीचा इथे विचार करणे गरजेचे ठरते. बाबाभट आपल्या सरणावर दाळण्यासाठी इतकी लाकडे आपल्याकडून फोडून घेत असतील असा रागाने मनोमनी बोलणारा कांता, काम करून घेत शेवटी कामाचा योग्य मोबदला देत माफी मागण्यास आलेला भाईभट नकळत एक शेवटची भेट देऊन गेला या सगळया विचारांच्या गर्तेत अडकलेल्या कांताच्या मनोवृत्तीचे चित्रण करण्याचा प्रयत्न लेखक करतात. पिढ्यान पिढ्या चाललेल्या अन्यायावर नियतीने सूड उगवला असे सूत्र या कथेतून व्यक्त होते.

गजानन देसाई यांच्या ‘दान दक्षिणा’ या कथेत ग्रामीण ब्राह्मणाच्या जगण्यातील संघर्षाचे चित्रण येते. जोशी भटांची एकुलती एक गाय चार – पाच वेळा व्याते पण पाडेच जन्माला येतात. घराण्याचा वारसा चालवायला घरात मात्र मुलगा हवा असतो पण गोठ्यासाठी मात्र वासरू हवे असते. त्यात पायात विशिष्ट दुखण्याची लागवण होते व तांबू आणि काजळगो हे दोनच पाडे शिल्लक राहतात. जोशी भटाची वीस वर्षाची मुलगीही आजारामुळे कुटत कुटत चालू लागते त्यामुळे गुणी असलेल्या आपल्या मुलीच्या लग्नाची चिंता त्याला सतावते. त्यात भर म्हणून हर्षद या जोशी भटाच्या मुलाचा खोकला सुरू असतो. डॉक्टराच्या औषधांनीही गुण येत नाही. जोशी भटाच्या माध्यमातून ग्रामीण जीवन जगणाऱ्या ब्राह्मण कुटुंबाचे दैन्य मांडण्याचा प्रयत्न लेखक करतात. पौरोहित्याचे काम करणारी जोशी भटाची तिसरी पिढी या कथेत येते. जोशी भटाची भावंडे शिकून चागल्या नोकऱ्या मिळवतात. जोशी भट मात्र देवस्थानाच्या अर्धा एकरच्या कुळागरात वीस पंचवीस कवाथे व पोफळीतून उत्पन्न मिळवतात. गावातील पुरोहित असल्याकारणाने हजार रुपयांच्या ऐवजी लोक शंभर रुपये दक्षिणा म्हणून देतात. कुडाळ या त्यांच्या मुळगावी असलेली मालमत्ता चुलत्यांनी बळकावलेली असते. कुळ कायद्याप्रमाणे कसणाऱ्या जमिनीची मालकी मिळावी म्हणून मामलेदाराकडे अर्ज केला जातो. पण देवस्थानच्या जमिनीला कुळ कायद्याशी देणे घेणे नसल्याने अर्जही फेटाळला जातो. जोशी भटाचा मुलगा तुटपुंज्या पैशांनी लोकांच्या छत्र्या, सायकल, मिक्सर अशा अनेक गोष्टी दुरुस्त करत असतो. अनंत बर्वे हा जोशी भटांचा मावसभाऊ हर्षलसाठी दोन स्थळ घेऊन येतो. त्यातील एका स्थळाकडून वीस तोळे सोन्याची अपेक्षा असते. तर दुसरीकडे मुलगा विधुर असतो व आठ वर्षांचा एक मुलगाही असतो. आपल्या लुळेपणामुळे व घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे हर्षल विधुर असलेल्या मुलाचे स्थळ स्वीकारते. अशापद्धतीने पौरोहित्य करणाऱ्या जोशीभटाच्या व कुटुंबाच्या ग्रामीण जीवनातील संघर्षाचे चित्रण कथेत येते.

गजानन देसाईंच्या 'पराब' या कथेत गावातील दलितांना दिली जाणारी वागणूक व ग्रामव्यवस्थेचे चित्रण येते. 'पराब' या कथेत हरिजन वाड्यावरील रहिवासी असलेला निवेदक बंडखोरी करतो. उभे आयुष्य दलित म्हणून हिणवले गेलेल्या निवेदकाच्या माध्यमातून दलित समाजाच्या संघर्षाचे चित्रण लेखक करतात. हरिजनवाड्यात चतुर्थी साजरी करण्यास विरोध असतो. चतुर्थीच्या दिवसात दारोदारी पिशवी घेऊन 'पराब' मागायला जाणे हे त्यांचे काम. चतुर्थीत कुणी तांदूळ, तर कुणी दिलेले नारळ मिळवून, वाड्यावर फिरून चतुर्थीच्या वाड्या आणायच्या व दोन दिवसांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटला म्हणून धन्यता मानायची. लोकांच्या घरी पुजलेल्या गणपतीचे उंबरठ्यावरून दर्शन घ्यायचे. लहान मुलांकडून भिकारी म्हणत हिणवले जायचे तर वयस्कांकडून महार समाज पद्धतीप्रमाणे 'पराब' मागून देवकार्य करत असल्याने, 'पराब' मागण्यास पुढे येणार ना? असा प्रश्न विचारत रूढी परंपरा म्हणून त्यांनी हेच काम करावे अशी अपेक्षा बाळगली जायची. शाळेत मास्तर व मुले त्यांना शिवत नसे, अस्पृश्यता पाळली जायची. अशा पद्धतीने एकूण परिस्थितीचे चित्रण येते. लहानपणी निवेदकाच्या आईने आणलेला कुणाचा जुना शर्ट आणि चड्डी आनंदाने त्याने आनंदाने स्वीकारलेली असते. दुसऱ्याच दिवशी लहानग्या निवेदकाने शिवाचे जुने कपडे घातल्याने शाळेतील सवंगडी शिवाकडून प्रचंड मनस्ताप सहन करावा लागतो. निवेदक लहानपणापासून समाजाची आपल्याप्रती असलेली हीन वागणुक अनुभवतो. या परिस्थितीविरुद्ध बंड पुकारणारा निवेदक 'पराब' मागण्यास जाण्यास नकार देतो. पण गावोगावी फिरून लोकांची बोलणी मुकाट्याने ऐकणाऱ्या आपल्या वडिलांची समजूत काढू शकत नाही. आपल्या आईवडिलांना या असमान वागणुकीची सवय झाल्याने ताठ मानेने जगावेसे वाटत नाही का? असा प्रश्न त्याला पडतो. गावात चालणारी अपमानास्पद परंपरा म्हणजे महार समाजाला दिला जाणारा मान असल्याचे त्याच्या वडिलांचे म्हणणे असते. निवेदक मात्र बदललेल्या जगानुसार सुधारण्याचा निर्णय घेतो, ब्राह्मण घरात येत नसल्याने स्वत: मूर्तीची पूजा करतो. बंडू बामणाकडून खडे बोल ऐकून घेतो. गणपती विसर्जनाच्या वेळी त्याच्या घरच्या गणपतीचे विसर्जन सर्वात शेवटी करण्याचे ठरेत. 'मोरया' म्हणतानाही महार वाड्यावरील लोक घाबरत दबकत म्हणतात. गणपती विसर्जनाच्या वेळी मूर्ती विसर्जित करत असताना स्पृश्य म्हणवणाऱ्या लोकांनी सोडलेली मूर्ती, फुलांचा हार, निवेदकाच्या हाती येतो. देवासाठी सर्व माणसे एकच असल्याचे तो आपल्या वडिलांना सांगतो. परंपरा म्हणून दारा दारात जाऊन भिक्षा म्हणून मिळविलेला 'परबे'पेक्षा गणपतीचे पूजन करणे व समाजाने स्वीकारले नसले तरी देवाने आपल्याला स्वीकारल्याची जाणीव असणे हे श्रेष्ठ असल्याचे त्यांना वाटते. वडीलही ते मान्य करतात व आपण मिळविलेली 'पराब' पाण्यात विसर्जित करतात. चतुर्थी साजरा करून

आज कुठेतरी अस्पृश्यतेचे वजन त्यांच्या डोक्यावरून उतरलेले असते. नारायण महाले यांच्या 'पट' या कथेतून एकूण पारंपरिक पार्श्वभूमी उभी करत गोमंतकातील ग्रामीण राजकारणाचे चित्रण करण्याचा प्रयत्न करतात. 'अस्तित्व' या संग्रहात ग्रामीण जीवनातील वास्तव चित्रण करत गोमंतकात मजुरी करणारे 'पाडेली', 'वावराडी' अशा वर्गाचे दाहक असे वास्तव चित्र मांडण्याचा प्रयत्न लेखक नारायण महाले करतात.

### 4.3.3 ग्रामीण समजुती व ग्रामजीवनातील लोकांच्या मानसिकतेचे चित्रण

'अवूर' या कथेत ग्रामीण भागातील दारिद्रयाचे चित्रण लेखक गजानन देसाई करतात. संतोष आपल्या बायको व चार लहानग्या मुलींसह एका जुन्या मातीच्या घरात राहतो. शेण सारवलेल्या जमिनी, बांबूचे 'कण्णे' असलेले छप्पर, गावठी कौल, 'बरड' म्हणजेच कीड लागून खराब झालेले 'कण्णे', 'लोळगे' वासे असे एकूण जुन्या पद्धतींच्या मातीच्या घरांचे चित्रण या कथेत येते. पाऊस सुरू झाल्याने संतोषचे घर गळू लागते, मुलांच्या ताटात पाणी जाते, गळक्या घरात रात्रीची झोप उडते. गावात 'अवूर' म्हणजेच 'पूर' येतो. दिवसभर ओरडणाऱ्या आपल्या बायकोवर संतोष हात उठवतो. लोकांच्या घरात पाणी साचते, दाजी देवजकरांच्या नारळाच्या बागायतीतही पाणी साचते. 'अवूरा'त वाहत येणारी झाडे देवजकरांच्या बागेत अडकत असल्याने अडकलेली झाडे दोरखंडाने वडाला बांधून ठेवण्याची शक्कल देवाजकर लढवतो. भरल्या 'अवूरा'त उडी घेत पट्टीचा पोहोणारा असलेला अनंता त्याला मदत करत असतो. पुराच्या अवाढव्यपणामुळे अनंता देवाजकरांची झाडे व माड बांधून ठेवण्यास नाकारतो. पण तरलो वाचलो तर आपणास चार माड व अर्ध्या झाडाचा वाटा मिळेल व आपले घर दुरुस्त करू या आशेने संतोष ही कामगिरी स्वीकारतो व स्वत:ला झोकून देतो. पाण्याची पातळी वाढत जाते व संतोष एका झाडावर अडकतो. दुसरीकडे संतोषचे घर कोसळून पडते. अनंता संतोषच्या बायको व मुलींना सावरतो. आपल्या अडकलेल्या पतीसाठी संतोषी आक्रोश करते, पाण्याची पातळी खाली येत नाही. शेवटी वयोवृद्ध असलेले दाजी देवसकरांचे वडील तिथे पोहोचतात, त्याच्या सांगण्याने इष्नुल्या भटजीला व लक्ष्मी महाराला गावात बोलाविण्यात येते. यथासांग गंगामाईची पूजा केली जाते व महार ढोल बडवत "गाव बुडलो रे ऽऽऽ बुडलो" अशी बोंब मारत आपले कर्तव्य पार पाडतो. भटजींच्या पूजेने व महाराच्या बोंबेमुळे भरती ओसरली असे गावकऱ्यांना वाटते. अनंता सुखरूप संतोषला परत आणतो. संतोष व संतोषीचे घर मात्र जमीनदोस्त झालेले असते. लक्ष्मी महार आपण बोंब मारून गावास वाचविल्याचे दारूच्या नशेत गावभर सांगत असतो. "संतोषचा घर पडला रे ऽऽऽ पडला ऽऽऽ" अशी बोंब लक्ष्मी महाराने मारल्यास आपले घर पूर्ववत होईल

अशी संतोषच्या मनात भाबडी समजूत निर्माण होते. या कथेत लेखक ग्रामीण भागातील दारिद्रयाचे चित्रण करतात त्याचप्रमाणे भाबड्या व अंधश्रद्धाळू ग्रामीण मानसिकतेचे चित्रण करतात.

दयाराम पाडलोस्करांची 'गुपित' ही कथा येते. गावात वायंगण शेतीसाठी नागरणीला सुरूवात केल्याने दमलेले गावकरी थकून भागून जमल्यानंतर गावात गप्पागोष्टीं रमत. गावतील शांताराम त्यांच्या चर्चेचा विषय असतो. नवसाने जन्माला आलेला शांताराम हा आईवडिलांचा लाडका असतो. शांतारामने खूप शिकावे अशी आईवडिलांची इच्छा असते. पण लाकडे तोडताना मधमाश्या दुखावल्या गेल्याने मधमाश्यांनी केलेल्या प्रहारात दोघांचे निधन होते व शांताराम पोरका होतो. शेतीत रमू लागतो. गावात येणाऱ्या एका प्राथमिक शिक्षिकेच्या प्रेमात पडतो व मानसिक चक्रव्यूहात अडकतो. शांतारामला कडाक्याचा ताप आल्याची बातमी हारीभाऊकडून केशवाला समजल्याने केशव त्याची विचारपूस करण्यास हॉस्पिटलमध्ये जातो. शांतारामला मूलबाळ नसल्याने, मूल न होण्याचे कारण तोच असल्याचे डॉक्टरांनी सांगितल्याने शांतारामला धक्का बसलेला असतो व त्यातच त्याला ताप आल्याचे केशवाला समजते. गावात आल्यानंतर केशव त्याला डॉक्टरांच्या औषधाला सोडून देवळातील उकड्या भाताच्या पोह्यांचा प्रसाद झोपण्यापूर्वी खाण्याचा सल्ला देतो अन् चमत्कारीतरित्या दोन महिन्यातच शांतारामची बायको गरोदर राहते. केशवाने सांगितलेल्या गुपिताचा फायदा झाल्याने तो केशवला देवाच्या स्थानी पुजतो. शांतारामच्या पुरुषार्थामागे उकड्या भाताच्या पोह्यांची ताकद होती का? हे गुपित मात्र अखेरपर्यंत गुपित राहिल्याचे सांगत, एक मिश्कील सूर कथेच्या शेवटी उमटताना दिसतो. शांतारामला पोह्यातून बेशुद्ध करत, केशवच शांतारामच्या पत्नीशी संबंध ठेवत गर्भधारणेस कारण ठरला का? असेही गुपित 'गुपित' या कथेत लेखक मांडू पाहतात. ग्रामजीवन जगणाऱ्या शांतारामच्या भाबड्या मानसिकतेचे चित्रण करत, ग्रामीण समाजजीवनातील मूल्यऱ्हासाचे चित्रण लेखक करतात. ग्रामीण समाजवास्तवावर भाष्य करताना नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेत प्रामुख्याने जातीव्यवस्था, दारिद्रय, ग्रामीण जीवनातील लोकांची भाबडी मानसिकता व त्यामुळे होणाऱ्या मूल्यऱ्हासाचे चित्रण कथेत येते.

'राखण' या कथेमध्ये लोकसमजुतीवर गजानन रायकर भाष्य करण्याचा प्रयत्न करतात. गरीबपासून श्रीमंतापर्यंत सगळे लोक जानू घाड्याच्या पदरी राखण मिळविण्यासाठी येतात. जानू घाडी बाधांचे निवारण करतो, भूतप्रेत, खेत्रींना पळवून लावतो, गावातील घावशीचा देवचारही लोकहितार्थ जानूने घातलेली आरोळी ऐकतो व निवारण करतो अशी जनमानसात समजूत असते. त्यासाठी जानूने तांदळाच्या रुपात दिलेले राखणेचे

'आशेचे तांदूळ' व जानूचा शब्द म्हणेज कौल यावर गावकऱ्यांची श्रद्धा असते. तापाने फडफडणाऱ्या आपल्या नवऱ्याची तब्येत सुधारावी म्हणून जने मावशी घाड्याकडे जाते. त्याला बाधलेला खेत्री अंग सोडून जात नसल्याने तब्येतीत सुधारणा होत नसल्याचे घाडी सांगतो व निवारणास 'आशेचे तांदूळ' राखण म्हणून देतो. घाड्याने आधी भूत बांधलेल्या स्त्रीची सुटका केलेली असते तसेच कस्टम अधिकाऱ्यांकडून बचाव होणार असा कौल एका मोठ्या प्रस्थाला दिलेला असतो. त्याने केलेल्या गोष्टींमुळे संकटाचे निवारण झाल्याने घाड्याला प्रसिद्धी मिळालेली असते. घाड्याने मंत्रून दिलेल्या तांदूळांनी आपल्या पतीच्या तब्येतीत सुधार होणार अशा भाबड्या आशेने, मावशी राखण घेऊन घरी जाते तर तिच्या पतीचे निधन झालेले असते. ती हंबरडा फोडते. तिची शुद्ध हरपते पण तिच्या पदरी मात्र राखणेचे 'आशे'(तांदूळ) राहतात असे सांगत लोकसमजुतींमधील ढोंगी प्रवृत्तीवर लेखक सौम्यपणे प्रहर करताना दिसून येतात. रायकरांची 'देवचार' ही कथा ग्रामीण समजुतींवर आधारलेली दिसून येते. काजूच्या रानात राबाणारा, कुळागरात खापणारा, अत्यंत निर्भय असलेल्या कावू गावड्याचे चित्रण या कथेत येते. कावूच्या माध्यमातून कुळागर संस्कृतीचे चित्रण लेखक करतात. पोफळी शिंपणारा, पाटाच्या पाण्यात शेण घोळवून आपल्या कुळागरात पाणी सोडणारा, माडाला आळी काढणे, केळीला सावळ घालणे इ. कामे करून केळीचे घड, विड्यांची पाने, तोरिंगे, मावळिंगे ही फळे विकणारा, डुक्कराची अगदी चपळाईने शिकार करून परंपरेनुसार अख्या गावास त्याचे वाटे मिळवून देण्यास प्रयत्नशील असलेला कावू या कथेत येतो. काळी कोंड येथे कावू आरामात मासे पकडण्यास जात असे. या कोंडीवर व घोडकाच्या झाडावर देवचार राहत असल्याचा लोकांचा समाज असतो. त्यानुसार देवचाराला प्रसन्न करण्यासाठी कोंबडा व दारू - रोटाचा नैवेद्य दाखविला जातो. ग्रामजीवनातील समजुती व परंपरेचे चित्रण या कथेत लेखक करतात. देवचार रात्री एका विशिष्ट वेळी फेरीस जातो अशी समजूत असते. देवचार पेटती चूड घेऊन भ्रमंती करत असताना कावू गावड्याला तो चोर असल्याचा गैरसमज होतो. देवचार व कावूमध्ये जुंपते. व देवचार अचानक अदृश्य होतो. दिवस होत आल्याने तू सुटलास असे देवचाराचे शब्द कावूच्या कानी पडताच आपण चोर समजून झटपट ज्याच्याशी केली तो देवचार असल्याचे समजताच कावू शहारतो. दुसऱ्या दिवशी तोंडात फेस येऊन कावू कुळागरात निपचित पडलेला असतो. जमलेल्यांना अडखळणाऱ्या शब्दांत आपली हकीकत सांगतो व मृत्यूमुखी पडतो. गोमंतकीय समजात हाती चूड घेऊन फिरणाऱ्या देवचाराच्या वाटेत व्यत्यय आणल्यास तो माणसाला लपवून ठेवतो, त्या माणसाचे निधन होते व देवचार सूड उगवतो अशी समजूत येते. राखणदार म्हणून निष्ठेने,

श्रद्धेने देवचारास गावातील लोक हाक घालतात, या समजुतीवर रायकरांची ‘देवचार’ ही कथा येते. रायकरांच्या ‘अवसर’ या कथेमध्ये बेताळाला सांकडे घालण्याचे चित्रण होताना दिसून येते.

उदा. ‘देवा म्हाराजा !

‘ ‘ह्य सायबा ! ‘

‘ तू बेतू बेताळ ! ‘

‘हय सायबा !’

‘तूं गौडी गुरखो !’

‘हय सायबा !’

सांतू गुरव मोठ मोठ्याने, आपल्या पद्धतीप्रमाणे देवाला गाऱ्हाणे घालत होता.

‘सतनीत एक कर!’

‘ बारांचे आनी पाचांचे गणित कर !’

‘ त्या राम पुर्साचो शब्द घे !’

‘ जल्म्याचो शब्द घे !’

‘ म्हारगणाचे बळगे, थानी-मानी भायले भितल्ले… ‘

सगल्याचे मत घे !

राव उबो !’[19]

ग्रामीण समाजव्यवस्थेचे चित्रण करत दसऱ्याच्या दिवशी कौल घेणाच्या पद्धतीचे चित्रण करत देवळात प्रत्येकाचा मान वेगळा असतो यावर लेखक भाष्य करतात. उदा. “गांवचा दसरा असल्याने देव वेताळाचा कौल घेण्यासाठी लांब- लांबचे लोक आपापली महत्वाची काम सोडून वेताळाच्या मंदिराजवळ गर्दी करून उभे होते. गांवाचे गांवकरी, पहिल्या मानाचे देसाई, मानाचे मानकरी, जलमी-गावडो, घाडी-गुरव, गाय गोसाय, म्हार-म्हारगण झाडून सारा गाव देवळाजवळ जमा झाला होता. वर्षपद्धतीप्रमाणे बेताळाचे तरंग सजवून एका रंगीत पाटावर कुणीतरी उभे करून धरले होते. तरंगाजवळ शाबी गुरव नवे कोरे धोतर नेसून उघड्या अंगाने उभा होता. त्याच्यावरच वेताळाचा अवसर येणार होता. शाबी गुरवाच्या डाव्या बाजूला जलमी गावडो पंचा गुंडाळून व कपाळावर, छातीवर, दंडावर गंधाचे भले मोठे पट्टे ओढून उभा होता. जवळच एक दणदण जळती मशाल घेऊन

देवळयाचा दुलबा व त्याच्यासमोर एका तबकात पंचारत घेऊन शांते भावीण गालात पानाचा विडा ठेवून सस्मित उभी होती. समोरच नानू शेणवी व बुकलो भट आपल्या गाठ मारलेल्या शेंडीशी हाताने चाळा करीत होता. सातू गुरवाचे गा-हाणे संपताच भक्तगणानी 'हर हर हर' म्हणत शाबी गुरवावर भराभरा तांदूळ शिपडले. वाजंत्र्यांनी 'ढम ढम ढमाक' करीत जोरजोराने ढोल वाजवायला सुरूवात केली. शाबी गुरवाचे अंग जरा शहारल्यासारखे झाले. अन् तो तसाच शांतपणाने लोकाकडे पहात राहिला." [20] अवसर प्रथेअंतर्गत देवास आपल्या कमाई धंद्याविषयी विचारणे, कुणाच्या अंगातील भुते काढणे अशी प्रथा कौलाच्या माध्यमातून केली जाते. या कथेत देवू गावड्यावर जलम्याचा भार येतो, शांतही होतो पण बेताळाचे झाड काही हलत नाही. गणू घाडी बेताळाच्या अवसराला बोलावण्याचा प्रयत्न करतो, पण अवसर येत नाही. भूत प्रेताने झपाटलेली माणसे खुदायला लागतात. गुरवाने गाऱ्हाणे घालताच 'हर-हर' म्हणत उभे राहणारा 'कित्या उलो माल्लो रे देसाया" असे म्हणत आपल्याला का हाक घालून बोलावल्याचे विचारणारा, वाद्यांच्या लयीन घुमणाऱ्या अवसारचे चित्रण येते. कित्येक वर्षे येणारा अवसर यावर्षी येत नाही. सर्वांच्या तोंडचे पाणी पळते. धर्तीवर पाप वाढल्याने देव येईनासा झाल्याचे नानू म्हाल्याचे मत असते. गुरवाच्या विधवेला मूल झाले, भटाची बायको राखण्यासोबत पळून गेली, जानू गुरवाने एका बाईला फितवले अशा अनेक पापांची यादी वाचली जाते. पुन्हा गाऱ्हाणे घालण्याचे ठरते. त्यात देवदासी असलेल्या शांते भाविणीच्या गळयात असलेली बेताळाच्या मूर्तीच्या गळयातील साखळी पाहून गोंधळ माजतो. गावातील गुरवांकडे देवालयाची जबाबदारी असल्याने गुरावांनीच भाविणीला साखळी दिल्याचा संशय घेत गुरवांना नावे ठेवली जातात. भावीण शांतेची मुलगी गुलाबी ही अत्यंत सुंदर असल्याने तिला मिळविण्यासाठी सर्वांमध्ये स्पर्धा सुरू असते. शाबी गुरव व तिचे निकटचे संबंध असतात तर दुसरीकडे शाणु शेणयही तिचा खर्च उठवत असतो. जिथे जास्त संपत्ती मिळते तिथे गुलाबी आपल्या शरीराला गहाण ठेवत असते. शाबी गुरवाने बेताळाची साखळी गुलाबीला दिली असेल हे शाणु हेरतो. पुढच्या तपासणीस गुलाबला बोलावण्याचा निर्णय घेतला जातो. आणि अनपेक्षितपणे शाबी गुरवाच्या अंगात बेताळाचा अवसर शिरतो. तो खुदू लागतो. 'अवसर' या रूढी समजुतींच्या आधारे ग्रामव्यवस्थेला फसवत शाबीने स्वत:च्या बचावार्थ अंगी 'अवसर' येण्याचा आव आणलेला असतो. 'अवसर' सारख्या समजुती या फक्त लोकसमजुती असल्याचा सूर रायकरांच्या कथेत व्यक्त होतो. विठ्ठल गांवसांची 'वहिवाट' ही 'अवसर' या परंपरेच्या पार्श्वभूमीवर अशाच आशयाची कथा आलेली दिसून येते. मिलिंद म्हामलांच्या कथेत आलकाणेश्वराला गाऱ्हाणे घालणारा, भरघोस पिकांसाठी नारळ फोडत, कोंबडा कापून सागोती खाऊन दुसऱ्यादिवसापासून नांगरणीची सुरूवात करणाऱ्या समाजतील परंपरेचे चित्रण

लेखक करतात. ग्रामीण समजुती, अंधश्रद्धा यांवर प्रकाश टाकत ग्रामजीवनातील वास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न दिसून येतो.

चंद्रकांत गावस यांच्या ‘इभाड’ या कथासंग्रहातील ‘डाव’, ‘इभाड’ या दोन कथांना ग्रामीण पार्श्वभूमी लाभलेली दिसून येते. तसेच गोमंतकातील ग्रामीण लोकजीवनातील समजुतींवर भाष्य करणारी ‘नारायण नावाची कथा’ महत्त्वाची ठरते. गावगाडा, गावात भूत देवचारांबद्दलच्या समजुती, दैवतांना आपल्या गाऱ्हाण्यातून हाक घालणारा ‘घाडी’(गोव्यातील अनेक देवळातील देवांना हाक घालणारा, गावातील दुखणी मांडणारा घाडी हा ‘घाडी’ नावाच्या बहुजन समाजातील असतो), गावात दवंडी पेटवणारा महार या कथेत दिसून येतो. गोव्यातील अनेक देवळात गावातील माणसांवर देवाचा अवसर येण्याची परंपरा दिसून येते. या पार्श्वभूमीवर ही कथा आकार घेते.

‘देव’ या कथेत सीमेराखण या ग्रामदैवतावर श्रद्धा असलेल्या चंद्रूचा बैल विजेचा झोत बसून गतप्राण होतो. त्यामुळे शेतातील अडलेली कामे पूर्ण करण्यासाठी नवीन बैलाच्या शोधात चंद्रू असतो. चांगला बैल मिळाल्यास सीमेराखण देवाच्या घुमटीला नवीन घंटा बांधण्याचे तो नवस करतो. बैल मिळाल्यानंतर लगेचच ‘जोत’ बांधत शेतीतील कामे करण्याची वेळीप समाजातील चंद्रूची तयारी सुरू होते. अशापद्धतीने ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर ही कथा येते. पावसाळयाचे दिवस असतात आणि चंद्रूच्या मुलाला कडाक्याचा ताप येतो. ताप वाढत जातो व मस्तकात उतरतो. शेवरू या चंद्रूच्या बायकोची व चंद्रूची भितीने गाळण उडते. काणकोण गावात डॉक्टरही उपलब्ध नसल्याने सीमेराखण देवाला मनोमन सांकडे घालत चंद्रू मुलाला हॉस्पिटलमध्ये नेतो. डॉक्टरच्या उपचारांनी स्थिरावलेली त्याच्या मुलाची स्थिती परत बिघडते, आणि शेवटी शेवरूच्या सांगण्यानुसार सीमेराखण देवाला सांगणे घालत मुलासाठी अंगारा आणण्याचा सल्ला चंद्रू स्वीकारतो. सीमेराखण देवाच्या घुमटीकडे गेला असता त्या मूर्तीचे तीन तुकडे झाल्याचे पाहून तो हादरतो. पण मुलाच्या काळजीने तेथून अंगारा घेत हॉस्पिटलमध्ये जातो. सीमेराखण देवामुळे आपल्या मुलाच्या तब्येतील चांगला फरक पडल्याचे शेवरू त्याला सांगते. मुलाला अंगारा लावते. ग्रामीण जीवनात ग्रामदैवतांना असलेले स्थान व समाजाची श्रद्धा याचे चित्र या कथेत लेखक उदय नाईक करतात. अनेकांचे संरक्षण करणारा सीमेराखणा देव मात्र स्वत:चे संरक्षण करण्यास असमर्थ ठरतो याचे वास्तव चित्र ‘देव’ या कथेत मांडलेले दिसून येते.

दयाराम पाडलोस्करांच्या कथेच्या केंद्रस्थानी ग्रामीण समजुती असल्याचे आपल्याला दिसून येते. त्यांच्या ‘काळोख’ या कथेत गावातील धालो मांडावर बसून गाव अनुभवणारा निवेदक येतो. धाला मांडावर भूतांचा चाळा असतो, या गोमंतकातील गावा गावात असलेल्या समजुतीच्या पार्श्वभूमीवर कथा आकार घेते. गावगाड्याचे चित्रण करताना श्रीभूतनाथ या ग्रामदैवतावर श्रद्धा असलेली माणसे, प्रसाद पाकळी लावत आपल्या दु:खांचा निवारण करू पाहणारी माणसे कथेत येतात. कथेतील नामदेवाच्या मुलीच्या माध्यमातून ग्रामीण लग्नपद्धती व गोव्यात हुंडा घेतला जात नसला तरी हुंडास्वरूपी सणउत्सवात ‘ओझे’ देण्याची प्रथा व आपल्या तो भार पेलत नसल्याने खचलेला नामदेव या गावातील सर्वसामान्य बापाचे व्यक्तिचित्रण येते. या कथेत काळोखाचे सौंदर्य न्याहाळणाऱ्या बाबग्यावर भूतपिशाच्या असल्याच्या समजातून ग्रामीण लोकांच्या मानसिकतेचे दर्शन लेखक घडवताना दिसून येतात. पाडलोस्कारांच्या ‘होलम’ या कथेत लग्नास नकार देणाऱ्या रामुमुळे लग्न जुळत नसल्याने अडीनडीची बाधा असल्याचा गावकऱ्यांचा समाज निर्माण होतो. त्यामुळे बाधा समजून घेण्यासाठी कुलदैवताला प्रसादपाकळी लावण्याची पद्धत, या ग्राम जीवनातील समजुतीचा उल्लेख ‘होलम’ या कथेत येतो.

गोव्यात ग्रामीण भागात तसेच अनेक जमातींमध्ये जातीबाह्य विवाह केल्यास गावातील घर ‘भायर’ ठेवले जाते. याचाच अर्थ सण समारंभ, जन्म, मृत्यू या कोणत्याही चांगल्या वाईट प्रसंगी गावकरी त्या वाळीत टाकलेल्या घरात जात नाही किंवा आपल्यात सामावून घेत नाहीत. या समजुतीच्या पार्श्वभूमीवर पाडलोस्करांची ‘बावळ’ ही कथा येते. तसेच गावात विवाहित स्त्री गरोदर असताना निधन झाल्यास तिला ‘अवगत’ मानण्यात येते. अशा स्त्रीचा मृतदेह गावाच्या सीमेवर पुरावा लागतो अशी प्रथा आहे. अशा स्त्रियांच्या मृतदेहाचे स्मशानात दहन केल्यास ती भूत पिशाच्य बनून गावकऱ्यांस त्रास देतात अशा गावातील समजुतीच्या पार्श्वभूमीवर आधारित ‘अवगत’ ही कथा आहे. लेखक दयाराम पाडलोस्कर ग्रामजीवनातील रूढी परंपरांचे चित्रण करत ग्रामजीवनातील लोकांच्या मानसिकतेवर भाष्य करतात. ‘काळोख’ या कथेत गावातील काळ्याकुट्ट काळोखाचे साम्राज्य अनुभवणारा, ग्रामजीवनाशी तिथल्या निसर्गाशी एकरूप झालेला बाबगा येतो. गावातील हरिकाकाने मुलांसाठी धाल्या मांडावर ठेवलेल्या पेट्रोमॅक्सच्या प्रकाशात अभ्यास करणारी गावातील मुले, श्रीभूतनाथ या दैवताची पूजा करणाऱ्या दिगंबर भटजींकडून भूतनाथाच्या चमत्काराच्या कथा ऐकत वाढणाऱ्या बाबग्याचे कुतूहल व गावाचे सौंदर्य न्याहाळण्याचा छंद वाढत जातो. धालांच्या मांडावर बसून सौंदर्य न्याहाळताना कोणी तरी ओहोळाच्या बाजूने जात असल्याचा भास त्याला होतो. श्री देव भूतनाथ असल्याचा समज निर्माण होतो.

गाव, लोक, निसर्गाशी नाळ जुळलेल्या बाबग्या, मुलीचे लग्नानंतर ओझे देण्यास आत्महत्या करण्याच्या प्रयत्नात असलेल्या नामदेवाला पाहतो व गावकऱ्यांच्या निदर्शनास आणत त्याला वाचवतो. गाव जगता जगता निसर्ग, माणसे यामध्ये रमणाऱ्या बाबग्याला भुताने झपाटल्याचे वडिलधाऱ्यांना वाटते. गावाच्या पद्धतीनुसार प्रसाद पाकळी लावत देवाकडे सांकडे घातले जाते पण बाबग्याच्या छंदात फरक पडत नाही. शेवटी बाबग्याचे वडील शिक्षकाकडे गळ घालतात. निसर्ग न्याहाळणाऱ्या बाबगा लेखक बनण्याच्या प्रक्रियेत असल्याचे शिक्षकास जाणवते व शिक्षक शाबासकीची थाप त्याला मिळते. बाबग्याच्या आई वडिलांचा समजही दूर करण्याचा ते प्रयत्न करतात. गावातील शिक्षकामुळे बाबग्याचे भविष्य तारले जाते व गावातील काळोख बाबग्यातील लेखकास घडवतो. ग्रामजीवनातील भिन्न समजुती, परंपरा व त्यामुळे निर्माण होणाऱ्या मानसिकतेचे चित्रण या कथेत येते.

ग्रामजीवनाचे प्रत्ययकारी चित्रण पाडलोस्कारांच्या ‘बवाळ’ या कथासंग्रहात येते. ग्रामीण जीवनातील समजुतींच्या पार्श्वभूमीवर, समूहभावनेचे चित्रण त्यांच्या या कथांमध्ये येते. ‘महादेवा तूच पाव रे...” या कथेत लागोपाठ सात मुलांना जन्म देऊन त्यांना दगावून बसलेली सीता या स्त्रीच्या दुःखाचे चित्रण लेखक करतात. अत्यंत समंजस असा नवरा लाभला तरी पदरी मूल नसल्याने खंतावलेली सीता पुन्हा गरोदर असते व उंबरठ्यावर बसून आपल्या पतीची रामाची वाट पाहत असते. तिन्हीसांजेच्या वेळी उंबरठ्यावर गरोदर अवस्थेत बसल्याने गावाच्या शेवंताकडून या परिस्थितीतही तिन्हीसांजेला बसल्याने तिला बोलणी ऐकावी लगावते. काही वेळाने तिला कळा येऊ लागतात. उमटलेल्या कळेमुळे ती स्वत:लाच दोष देऊ लागते. बाळ्या बैलाला माळ्यावरून घरी आणायला गेलेल्या तिच्या पतीपर्यंत सीतेला कळा आल्याची बातमी पोहोचवली जाते. वैजीणीला पाचारण करण्यात येते. सीतेची प्रसूती यावेळी चांगली पार पडावी म्हणून गावात बवाळ माजतो. रामाच्या ओसरीवर गर्दी जमते. भूता प्रेतांच्या, देवचारांच्या गोष्टी रंगतात. एकमेकांसाठी वेळप्रसंगी साथ देत धावत जाणाऱ्या ग्रामीण समाजाचे चित्र या कथेमध्ये लेखक चित्रित करतात. सीतेची गर्भारणातून सुटका होत नसल्याने गावकरी असलेला दाय महादेवाच्या देवळात जाऊन देवाच्या चरणाकडील विभूती शिंपडण्यास घेऊन येते. गाव वेळप्रसंगी आपल्यासाठी आल्याने ‘अवटान’ आपल्यावर उपकार केल्याची भाषा रामगा बोलू लागतो. जमलेल्या गर्दीत साप येतो. सापावर मारलेला दांडयाने साप दुखावला जातो. सापाला शोधण्यास एकच ‘बवाळ’ माजतो. काही वर्षांपूर्वी सापाच्या पिल्लाला आपणच पकडून दिल्याने गावकऱ्यांनी त्या पिल्लास मारल्याचे रामग्याला आठवते. एकीकडे पत्नी विव्हळत असताना रामगा या वेळी मात्र सापाचा बळी देताना अडवतो. हात जोडून

सापाला म्हणतो, “म्हादेवा तूच पाव”. साप मुकाट्याने चालत जातो तर दुसरीकडे सीता प्रसूत होऊन मुलगा जन्माला आल्याची बातमी मिळते. ग्रामीण जनमानसांमध्ये असलेल्या भाबड्या मानसिकतेचे व समजुतींचे अत्यंत नाट्यमय चित्रण या कथेत लेखक करतात.

गजानन देसाई यांच्या चकवा, डांक या कथांमध्ये ग्रामीण रूढी परंपरा, समजुती व त्यामधील अंधश्रद्धेवर सौम्यपणे प्रहार करण्याचा प्रयत्न करत ग्रामीण वास्तवाचे चित्र मांडण्याचा प्रयत्न लेखक करतात. गोमंतकातील विधी, परंपरा, समजुती हे कथेची बीजे होताना आपल्याला दिसून येतात, ‘देवचारा ऽऽ पा ऽ व !’ ही अशाच पद्धतीची कथा येते. (देवचार या संकल्पनेचे एखाद्या अभ्यासकाने केलेले विश्लेषण) ‘कोमलो’ म्हणजेच आपल्या कोंबड्याला जिवाभावाने जपणारा, प्रेम करणारा लहानग्या भिवाचे विश्व या कथेत येते. भिवा ‘नॉताक’ सापडल्याचे सांगत त्याची आई घाड्याकडे या संकटातून सोडवण्याची विनंती करते. घाडी ‘देवचारा’ची आळवणी करतो व त्यानेच भिवला संकटातून वाचविल्याचे सांगत त्याबदलात नारळ व कोंबडा अर्पण करण्यास सांगतो. दारिद्रयाने ग्रासलेले भिवाचे वडील शेवटी भिवाच्याच कोंबड्याचा बळी देण्याचे ठरवतात. आपल्या लाडक्या कोंबड्याच्या मानेवर कोयता फिरवून आपलेच मुंडके तोडल्याच्या अविर्भावात रडणाऱ्या भिवाची ही कथा येते.

‘चकवा’ या कथेत ग्रामजीवनाच्या पार्श्वभूमीवर निष्ठावानपणे आपल्या कुळागरांचे पालनपोषण करणारा झिला येतो. झिलाचे नारळांनी मोहरलेले भाटातील नारळ एका रात्रीत पडले जातात त्यामुळे गावकऱ्यांना आपल्या कार्मनी त्रास देणाऱ्या विश्राम, तुकाराम, हनुमंत या तीनच्या टोळक्यावर गावकरी आरोप करतात. यावेळी आपल्यावर बिनबुडीचा आरोप होत असल्याने झिलाला धडा शिकवण्याचे ठरवतात. पण शेवटी गाव सोडून लोकं शहरात कामाला जात असल्याने आपणही ‘बिझनेस’ करावा अशी ते योजना आखतात. ‘बार ॲन्ड रेस्टरंट’ चा व्यवसाय करण्यासाठी दीड लाख रुपयांची गरज असल्याने झिलालाच लुटायचे ठरवतात. आपले कार्य योग्य पद्धतीने पार पाडले जावे म्हणून देवचाराला तिघे गाऱ्हाणे घालतात. ऐन गावाची जत्रा येते व जत्रेत हौशी कलाकारांचे नाटक पाहण्यास झिला बाहेर पडताच तिघे घरात घुसतात. पण जत्रेतून लगेच परत आलेल्या झिलाला चोरांची चाहूल लागते. लोक घराला वेढा देतात. इतक्यात मशाली पेटवून देवचार खेळत असल्याचे दृश्य गावकऱ्यांना दिसते. वेढा मोडून लोक देवचारास बघण्यास जाताच चोरी करण्यास गेलेले दोघे मागल्यादारातून निसटतात. तिघांपैकी चोरी करण्यास गेलेल्या सवंगड्यांस शिटकावणी देण्यास घराबाहेर

थांबलेल्या तुकारामचे हे कर्तुत असते. चोरी करणाऱ्यांना देवचाराने अडवल्याचे बोलणे गावकऱ्यांमध्ये होते तर दुसरीकडे आपली चोरी पकडली जाऊ नये म्हणून वेढा तोडण्यास देवचार मदतीस आल्याचे विश्राम व हनुमंताला वाटते. पण मशाल पेटवून नाचणारा देवचार नसून गावकऱ्यांना चकवणारा आपल्यातलाच तुकाराम होता हे समजताच तिघांमध्ये हशा पिकतो. ग्रामव्यवस्थेत प्रबळ झालेल्या समजुतींना सौम्यपणे धक्का देण्याचा प्रयत्न त्यांची ही कथा करते. ग्रामीण समाजव्यवस्थेतील 'डांक' या पद्धतीवर सौम्यपणे लेखक प्रहार करताना दिसून येतात. 'डांक' या ग्रामीण पद्धतीवर आधारलेली ही कथा येते. तुकाराम गावसची बायको दहा वर्षांपूर्वी बाळंतपणातच वारली होती. तुकारामाची बायकोचे भूत गावातील लोकांना त्रास देते असा समाज गावभर पसरलेला. गोमंतकात गावात स्त्री गरोदर असताना वारली की ती 'अवगत' किंवा 'आलवातीण' अशी संबोधली जाते. तिच्या मृतात्म्यास शांती न लाभल्याने ती गावकऱ्यांना पदोपदी त्रास देते असा समाज पसरतो. या कथेत लेखक लिहितात की, "डोंगरावर तांब्या घेऊन गेलेली एखादी बाई ठोऽऽ ठोऽ बोंबा मारीत यायची, ती तुक्यांच्या बायकोच्या नावाने. शेजारची 'हुसकेची' झाडी खसखसली तरी ती तुक्याच्या अवघतीने. भरडावरच्या माळावर खेळणाऱ्या पोरांवर कुणी 'शकरी' भिरकावली, तरी ती तुक्याच्या बायकोनेच, घरावरची कौलं सरकली, तरी ती तुक्याच्या बायकोनेच. डोक्यावर लाकडाचा भारा घेऊन येणाऱ्या पोरीची मान मुरगळली तरी ती तुक्याच्या बायकोनेच. कुणाच्या परसातल्या शेगलाची फांदी शेंगासकट काऽऽ डकन मोडली तरी ती तुकाच्या बायकोनेच. शेजारच्या बामणाचा तरणाबांड पोरगा दोन दिवसांच्या दुखण्याने गेला आणि लोकांच्या नजरा वळल्या त्या तुकाच्या घराकडे त्या रात्री म्हणे मसुंड्यांतून कुणीतरी बाई ठोऽऽ ठोऽऽ बोंब मारीत ओरडली, म्हणाली, 'सांदलंयरेऽऽऽ सादलय'. देवळात भजन करणाऱ्या कितीतरी पोरांनी म्हणे हा आवाज ऐकलाय." [21] तुकारामाच्या भावजयीकडे गावातील बाई लग्नसमारंभास जाण्यास वाटेतच बांगड्यांची मागणी करते. दुसऱ्या दिवशी बांगड्या नीट हातात आल्या ना? असा प्रश्न विचारताच ती बाई आपण घेतल्याच नसल्याचे सांगते. तुकारामाच्या भूत बनून फिरणाऱ्या बायकोने तिच्या रुपात येऊन बांगड्या मागून घेतल्याचा समज पसरतो. तुकारामाची भावजयीला कावळा शिवलेला असतो. मासिक पाळी विषयी गावात बोलणे वर्ज्य मानले जाते अशावेळी पाळी आलेल्या स्त्रीस कावळा शिवला असल्याचे म्हटले जाते. या ग्रामीण मनोवृत्तीचे चित्रण या कथेत येते. या घटनेनंतर तुकारामाचा भाऊ गाव सोडतो. लोकांच्या कुत्सित बोलण्याने कंटाळलेला तुकाराम 'डांके'च्या माध्यमातून आपल्या पत्नीच्या मृतात्म्यास सोडण्याचा म्हणजेच मुक्ती मिळवून देण्याचा प्रयत्न करतो, आठ – दहा हजारांचा खर्च करतो पण कोणावरही त्याच्या बायकोचा अवसर येत नाही. माणसावर मृतात्म्याचा अवसर आणत

मृतात्म्यास बोलते करून तिच्या इच्छा पूर्ण करत गाव सोडण्याची विनवणी ‘डांक’ या प्रथेअंतर्गत केली जाते. तुकाराम आपल्या पत्नीचा भार काढण्यासाठी आपल्या मुलीलाही त्यात अडकवतो. आपली गुणी पत्नी निधनानंतर इतकी वाईट कशी झाली हा प्रश्नही त्याला सतावतो. तुकारामाचा मित्र विश्राम ही अंधश्रद्धा असल्याने तुकारामाच्या मुलीचा कोंडमारा यात होत असल्याचे त्याला बजावतो. घाडी मुलीवर अवसर आणण्यास अत्याचार करत असतो. याचे चित्रण करताना लेखक लिहितात, “इले कायरे सगळे ? करूया सुरू?’ तुक्याच्या मुलीच्या भांगावर घाड्याने मुठभर पिंजर फासली आणि गा-हाण्याला सुरूवात केली. ‘गे माये मसाणदेवते, भुताबाई, सिमेचो सिमघडो’ ‘हय सायबा,’ म्हणत उपस्थितांनी साथ दिली. म्हारानी ढोल बडवायला सुरूवात केली आणि डाकेला सुरूवात झाली. घाडी पाटावर उभा राहिला. समोर तुक्याची मुलगी बसलेली. केस सोडलेले, भांग भरलेला, गळयात कलावतीच्या फुलांची माळ. बाजूला घुमट घेऊन कुंभार बसलेला. घाड्याने मुठभर उडीद उचलले आणि बाजूला बसलेल्या एका इसमावर मारले. तसा तो इसम घुमू लागला. कुंभाराने घुमटावर थाप मारली आणि तो एका विशिष्ट चालीत आळवणी करू लागला. ‘गावसा गेल्या येशोदे तूं अवदीसा कशी जालयगे... मायेन तू, सातेरी, धर्मान तृ, सवायशीण कैदाशिण तू, नसलय... जाल्लय तेन्ना मरची आसलंय, इतक्या गरूक पावची नसलंय...’ आजूबाजूला सर्वत्र शांतता पसरली होती. आवाज येत होता. तो बुभणाऱ्या म्हारिंगणाचा, आळवणाऱ्या कुंभाराचा, त्याच्या घुमटाचा आणि शिव्या देऊन तुक्याच्या पोरीवर उडीद मारणाऱ्या घाड्याचा.” [22]

वरील विधी पार पडून तिला बोलाविण्यात येते. पण मृतात्मा काही फिरकत नाही. हा अवसर मात्र मुलीवर न येत तुकारामावर येतो. तुकाराम घुमू लागतो. तुकारामाच्या अंगात असलेला मृतात्मा आपण यशोदा म्हणजेच तुकारामाची बायको असल्याचे कबूल करते. आपणच गावकऱ्यांना छळल्याचे कबूल करते. कोणालाही यापुढे त्रास देणार नसल्याचे सांगते व आपल्या शेवटच्या इच्छेनुसार गावकऱ्यांना आपल्या हातातील चणे खाण्यास सांगते. तुकारामाची खणा नारळाने ओटी भरली जाते. दुसरीकडे कोल्हे ओरडू लागतात. मृतात्मा शरीर सोडून गेल्याचे जाहीर करण्यात येते. तुकारामास भान येते. लोकं घाबरतच झुडूपातून वाट काढत घरी जातात. तितक्यात एक शिळा नदीत कोसळते. आपण केलेल्या नाटक व्यर्थ जाणार व पुन्हा ती शिळा नदीत आपल्या बायकोने टाकल्याची भीती निर्माण होणार या विचाराने तुकाराम अस्वस्थ होतो. पण बाजूला पाळणाऱ्या डुकरांच्या कळपाला पाहून गावकऱ्यांची भीती नष्ट होते. तुकारामाला हसू येते. या सर्व कामत त्याच्या आधारस असलेला विश्राम त्याच्या सोबत असतो. ग्रामीण अंधश्रद्धाळू समाजमनाचे चित्रण या कथेत येते.

गजानन देसाईंच्या 'बोकडकथा' या कथेत गावात एका बोकडाचे आगमन होते. अंगाने भला मोठा, वीतभर लांब शिंगे असलेला, अतिशय भेदक डोळ्यांचा, धुष्टपुष्ट असा बोकड आल्या दिवसापासून गावात धुडगूस घालू लागतो. लोकांच्या घरात घुसतो, स्कूटर चालकांना धक्का मारून उडवतो, कुंपणातून घुसून फुलझाडे खातो, एका भांडीवाल्याला रक्तबंबाळ करतो. अशापद्धतीने बोकड्याने माजवलेल्या उपदव्यापाचे चित्रण कथेत येते. अंधश्रद्धाळू ग्रामस्थामध्ये बोकडाच्या माध्यमातून 'खेत्री', 'म्हारू', 'ब्रह्मसंमंध' फिरत असल्याचा समज निर्माण होतो. बोकडाला आटोक्यात आणण्यासाठी प्रसाद पाकळी लावत देवाकडे कौल मागला जातो. पण देवाचा कौलही मिळत नाही. गावात सुरू झालेल्या दारूच्या दुकानामुळे हा देवाचा कौल मिळत नसल्याचे गावकऱ्यांना वाटते. याचा फटका गिऱ्हाईकामध्ये बसत असल्याने बोकडाला पकडणाऱ्यास पंधरा दिवस फुकट दारू देण्याचे बार मालक जाहीर करतो. त्यामुळे गावातील अनंता व विठू बोकडास पकडण्याचा बेत आखतात. अनंता बोकडाच्या गळ्याला मिठी मारून एका हाताने शिंग पकडतो व विठू दोरा घालत बोकडास जेरबंद करतो. व अनमोडच्या घाटात सोडून देतो. आपण बोकडावर नव्हे तर संमंध, खेत्रींवर मात केल्याचा विचार अनंताच्या मनी येतो. अनंताला त्यादिवसापासून साप - नाग आपल्याभोवती वेढा घालू लागल्याची स्वप्ने झोपेत पडू लागतात. एकीकडे अनंताने जिकीरीचे काम करून बोकडाला जेरबंद करून सोडल्याने गावकऱ्यांमार्फत सत्कार समारंभ आखले जातात. तर दुसरीकडे त्याच्या स्वप्नात साप डंख मारतात असल्याने त्याची झोप उडते. घाड्याकडून अनंताला समजते की बोकडात असलेल्या संमंधाने त्याच्या घरात प्रवेश केल्याने बोकडास परत आणल्याशिवाय सुटका नाही. त्यासाठी दीड हजार खर्चून नवीन बोकड गावात आणले जाते. नव्या बोकडाचा नवा ताप सुरू होतो अशी एकूण कथा येते. गावातील चालीरीती व अंधश्रद्धेवर भाष्य करण्याचा प्रयत्न या कथेत होतो. भूत खेत्रींवर अंधविश्वास ठेवणारे गावकरी या कथेत येतात.

### 4.3.4 ग्रामजीवनातील बदलांचे चित्रण

ग्रामजीवनात निर्माण झालेल्या बदलांचे पडसाद विठ्ठल गांवसांच्या कथेतून दिसून येतात. खाण व्यवसायामुळे ग्रामजीवनाचा झालेला विध्वंस, संपुष्टात आलेला शेतीव्यवसाय व हरवलेल्या ग्रामजीवनाचे चित्रण 'देऊळ' या कथेत लेखक चित्रित करतात. एकेकाळी शेती व्यवसाय, गुराढोरांनी, नारळी पोफळींच्या बागांनी समृध्द असलेल्या गावात खाण व्यवसाय सुरू झाल्याने गाव लाल रंगाने माखला जातो. डोंगराला मोठमोठी भोके पाडली जातात. गावात आलेला शेट गावच्या देवळाची एक लाखाने बांधणीच्या बदल्यात

गावातील डोंगरावरील माती नेण्याचा प्रस्ताव मांडतो. जपानमध्ये मालाची निर्यात करून शेट कोट्याने पैसे मिळवत असल्याचे समजताच लोक शेतीव्यवसाय सोडून खाणीवर कामास जातात. डोंगर व गावातील माती पोखरून पोखरून गाव उद्ध्वस्त होतो. शेवटी शेटजी विरुद्ध जंग छेडली जाते. कामगारांच्या चळवळी सुरू होतात. पिस्तुलांच्या फैऱ्या झाडल्या जातात. माणसांच्या रक्तानी तांबडी माती अधिकच लाल होते, गावात दारूची दुकाने सुरू होतात. एके काळी नंदनवन असलेल्या गावात जो तो एकमेकाला शिव्या देतो. शेवटी मातीतील सोने एक दिवशी संपते व चैनीची सवय झाल्याने पोट भरण्यासाठी लोक गाव सोडून जातात. देवळातील भटजीही पोटापाण्यासाठी गाव सोडून जातात. हातातून निसटलेल्या शेती व्यवसायाला पुनरुज्जीवीत करणे अशक्यप्राय होते. गावात एकटा फिरणारा तो या सगळया बदलांना समोरे जातो. ज्या मातीने आपला देह पोसला त्याच मातीत अंतिम श्वास आपणास घेता यावा या हेतून तो गाव सोडून जाणाऱ्या आपल्या मुला सुनेसोबत न जाता गावात राहतो. देवळाच्या आवारात फिरत, लालेलाल वातावरणात तो गुदमरतो. देवाची लालेलाल झालेली मूर्ती घासून घासून त्याचे हात दुखू लागतात. मूर्तीला काळी चकचकीत करण्यासाठी तो देवळाच्या तळयातील पाणी आणण्यास तळयात उतरतो व तोल जात तळयात कोसळतो. तांबड्यालाल पाण्यावर गोलाकार तरंग उमटतात व सगळीकडे शांतता पसरते असे एकूण चित्रण करत उद्ध्वस्त गावातील बदलांना सामोरे गेलेल्या गृहस्थाची शोकांतिका लेखक मांडण्याचा प्रयत्न करतात. खाण व्यवसायामुळे उद्ध्वस्त होऊ पाहणाऱ्या ग्रामीण जीवनाचा संदर्भ ‘गोष्ट आजोबांची या कथेमध्ये आलेली दिसतो. वेळप्रसंगी आपण सावध झालो नाही तर आपल्या शेतजमिनी व शेकडो कुटुंबे उद्ध्वस्त होणार हा गोमंतकीय ग्रामीण जीवनासंदर्भातील प्रश्न लेखक मांडतात.

ग्रामीण समाजजीवनात झपाट्याने झालेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर ‘गाभ’ ही कथा आलेली आहे. मोठमोठे कारखाने बांधण्यासाठी शेटजी या मोठ्या प्रस्थाकडून मागणी असल्याने आपली शेतजमीन शेड्ड्यू नाईलाजाने विकतो. जमीन विकल्यानंतर कारखाना गावात आल्याने ग्रामीण लोकजीवनात प्रश्न उपस्थित होतात. दूषित हवा पाण्यामुळे, शेड्ड्यूने विकत घेतलेली म्हैस गाभ सांडू लागते. शेतजमिनी विकून मिळालेल्या पैशातून व कर्ज काढून शेड्ड्यूचा मुलगा ट्रक घेतो. पण हाती आलेल्या बक्कळ पैशांमुळे दारूच्या आहारी जात स्वत:चा व्यवसाय बुडवतो. शेड्ड्यूला मारहाण करतो. आधुनिक जगण्यातील स्थित्यंतरांमुळे ग्रामीण जीवनातील वाताहतीचे चित्रण लेखक करतात. विठ्ठल गावस यांच्या बहुतांशी कथांना ग्रामीण पार्श्वभूमी लाभली आहे. या ग्रामीण पार्श्वभूमीवर गोमंतकातील ग्रामीण भागातील ख्रिस्ती जीवनचित्र मांडलेले दिसून येते.

आधुनिकीकरणामुळे ग्रामीण संस्कृतीला बसणाऱ्या झळीचे चित्रण लेखक करतात. 'कॅथरीन' या कथासंग्रहातील 'लिब्रूची इच्छा' या कथेमध्ये नवीन बांधलेल्या बंगल्यापुढूयात पारंपारिक पद्धतीने डुक्कर पाळण्यासाठी उभारलेला 'घुड' मोडणारी लिब्रूची सून दिसून येते. मद्यसंस्कृतीमुळे ग्रामीण जीवनाची झालेली वाताहत लेखक 'कॅथरीन' या कथेत चित्रित करतात. ते लिहितात, "गावातील सारी पोरं कंबरेला तांबड्या रंगाची काष्टी लावून जाळी खांद्यावर टाकून समुद्रावर जायची. मासे विकायची आणि ते विकून मिळणाऱ्या पैशांत रात्रीची दारू पिऊन गावभर धुडगूस घालायची." पतीच्या दारूच्या व्यसनाने उद्ध्वस्त झालेला संसार व संसाराचा गाडा चालवण्यासाठी दारू विक्रीचा व्यवसाय स्वीकारणारी कॅथरीन, 'कॅथरीन' या कथेमध्ये आलेली आहे.

'बांध' या कथेमध्ये शेती भाटांच्या पार्श्वभूमीवर आलेल्या कथेत कुळ कायद्याचा उल्लेख होताना दिसतो. 'बांध' या कथेत आलेला भाटकार नाना दिसून येतो. गोवा मुक्तीपुर्वी गावाची बहुतेक जमीन नानाच्या मालकीची असल्याचे लेखक सांगतात. गोवा मुक्तीनंतरच्या काळात कुळ – मुंडकार कायदा गोव्यात आल्याने शेती भाती कुळाच्या मालकीची झाली. भाटकार असण्याच्या समाधानासाठी नानाने एक कुळागर सांभाळून ठेवले. अशापद्धतीने मुक्तिपूर्व व मुक्तीनंतरच्या गोव्यातील ग्रामीण समाजव्यवस्थेतील बदलांचे चित्रण लेखक करतात. विठ्ठल गांवसांच्या बहुतांशी कथांमध्ये भाटकार, नारळाच्या बागायती, नारळ पडण्यास होणारा 'पाडा' इत्यादींचे चित्रण आढळते. गोमंतकातील ग्रामीण भागात भाटकाराच्या भाटात वावरणारा कष्टकरी समाज, रीतीभातीच्या नावाखाली भरडणाऱ्या कष्टकरी समाजाची व्यथा 'ओझे' या कथेतून आलेली आहे. ग्रामीण जीवनातील कष्टकरी समाजाच्या दारिद्र्याचे चित्रण लेखक करतात. गोमंतकातील उच्चभ्रू समाजात 'ओझे' देण्याची पद्धतीवर आधारलेली ही कथा आहे. उच्चभ्रू समाजात मुलीच्या सासरी 'ओझे' पाठवण्याची प्रथा आज बहुजनांमध्ये रूढ होत बापाच्या डोक्यावरचे 'ओझे' ठरते याचे चित्रण या कथेमध्ये येते. भाटकारांच्या भाटात राबणारा कष्टकरी समाजातील जानू सरकारी नोकर जावई मिळतो म्हणून मोठ्या थाटात स्वत: कर्जबाजारी होत आपल्या मुलीचे लग्न लाऊन देतो. सरकारी नोकर असलेल्या जावयास दर सण समारंभास ओझे पाठवायचे म्हणून अनेकांकडून पैसे घेतो. चतुर्थीचे ओझे पाठवण्याची जेव्हा वेळ येते तेव्हा हतबल झालेला जानू भाटकाराच्या मुलीचे त्याच्याकडे अगदी विश्वासाने पोहोचवायला दिलेले 'ओझे' स्वत:च्या मुलीच्या सासरी घेऊन जातो आणि शेवटी आपल्या गावाच्या वाटेने न परतता आपल्या गावाच्या विरुद्ध दिशेने जातो. कुळवाडी समाजातील परंपरागत लोकजीवनाचे व भाटकरशाहीचे चित्रण लेखक करतात. कुळवाड्यांनी उगवलेले, राखून ठेवलेली फळे, भाज्या लुटणारे भाटकारांचे मुलगे, घाम गाळणारे कुळवाडी व खाणारे भाटकर, कुळांवर

आपलाही अधिकार असावा भाटकराचा माज उतरावा म्हणून कायदे बदलास थांबलेले मुंडकार या एकूण ग्रामव्यवस्थेचे व ग्रामीण प्रश्नांची उकल लेखक विठ्ठल गांवस करतात. मिलिंद म्हामल यांच्या कथेला ग्रामीण समाज व सांस्कृतिक जीवनातील बदलांची किनार लाभलेली दिसून येते. ग्रामीण जीवनातील कुळ मुंडकार व्यवस्था. आणि मुंडकारांना विचारात न घेता आपल्या जमिनी परदेशी नागरिकांना विकणारे भाटकार आणि निर्माण झालेल्या प्रश्नांवर त्यांची कथा भाष्य करते.

गजानन देसाई यांच्या ‘कुळागर’ या कथेत ग्रामीण पातळीवरील राजकारणाचा, सरपंचाचा आधार घेत मालमत्ता व जमीन जागा हिसकावण्याची बळावलेली प्रवृत्ती याचेही चित्र पुढे आणत बदलत्या ग्रामीण वास्तवाचे चित्र अधोरेखित करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या ‘पानवळ’ या कथेत रात्रपाळींवर काम करणारा खुशाली घरातील मुलांच्या गोंगाटामुळे झोपण्यास आसरा शोधत असतो. घरातील गोंगाटामुळे गावातील देवळातील ओसरीवर तो आपली स्वारी वळवतो. पण तेही सुख त्याला जास्त दिवस भोगता येत नाही. भाविणीच्या खोपीत पत्त्यांचे बंगले बांधणाऱ्या गावकार मंडळींपैकी बायकापोरे असलेल्या विष्णू या गावकऱ्याने भाविणीच्या चंद्रा नावाच्या पंधरा – सोळा वर्षांच्या मुलीवर हात घातल्याने भाविणीच्या घरची दारे बंद होतात. पत्ते खेळणाऱ्यांचा मुक्काम गावातील देवाच्या ओसरीवर जातो. खुशालीची झोप उडते. गावातील लहान मुलांनाही पत्ते खेळण्याची सवय जडल्याने गावातील अनैतिक व्यवहारांमुळे खुशाली अस्वस्थ होतो. गावाच्या बिघडणाऱ्या परिस्थितीची जाणीव असल्याने खुशाली बिघडणाऱ्या गावाबद्दलची भिती गावातील मास्तर वसंत बर्वेशी व्यक्त करतो. गावात दहशत माजवणाऱ्या गावकऱ्यांना पोलीस स्टेशनवर दिवसभर ठेवून अद्दल घडविण्याचा विचार मास्तर व्यक्त करतो. त्यानुसार पोलिसांकडून ही कामगिरी पार पाडली जाते. एक दोन पोलिसांच्या हाती लागतात बाकी पलायन करतात. गावातील भाविणीच्या मुलीवर अतिप्रसंग करणारे, पत्ते खेळून गावात अनैतिक अशी संस्कृती रुजवणाऱ्या गावकऱ्यांना पकडले गेल्याने मास्तर आनंदात लॉकअपकडे जातात तर पकडलेल्या दोघांमधला एक खुशालीच असतो व तो अत्यंत गाढ झोपलेला पाहून मास्तरांना आश्चर्याचा धक्का बसतो. गाव सुधारू पाहणारा खुशाली स्वत:च अडकतो पण झोपेसाठी तळमळणाऱ्या खुशालीला लॉकअपमध्ये मात्र गाढ झोप लागते.

ग्रामीण समजुती व लोकजीवनाच्या पार्श्वभूमीवर उदय नाईक यांची ‘चवथ’ ही कथा येते. भाटकाराच्या जागेवर घर संसार थाटलेल्या पूर्वजांनी भाटकाराच्या घरी त्याबदलात माटोळी बांधण्याची पद्धत स्वीकारली

असल्याने घराण्याच्या परंपरेनुसार पंढरबाब भाटकाराच्या घरी माटोळीचे समान पोहोचविण्याची शाणू आपल्या अबो या आजोबांसह माटोळीचे सामान आणण्यास जातो. ग्रामीण वातावरण चित्रित करताना गणा आणि बुचू या बैलांच्या गळ्यातील दावं सोडून त्यांना चरायला माळावर सोडण्यास लिंबोड्याच्या काठीने फडके देत हाकलणारा शाणू, ओहोळातील लहान पांढरे खेकडे म्हणजेच 'बेले' पकडू पाहणारा शाणू, रानफळे काढताना आबोंना चावलेले हुराणें म्हणजेच चावणाऱ्या मुंग्या, 'कामत' म्हणजेच पावसाळ्यात रानात केलेली फळभाजीची लागवण तिथून फळभाजी आणण्यास जाणारे आबा व शाणू असे एकूण वातावरण येते. डोंगरमाथ्यावर कांगोणे, कात्रे, खुळखुळे अशी चतुर्थीत माटोळीस बांधली जाणारी रानफळे गोळा करणारे शाणू व अबोंचे चित्रण या कथेत येते. ग्रामीण समाजजीवनातील रूढी पद्धतींच्या पार्श्वभूमीवर ग्रामजीवनातील बदलांचे पडसाद 'चवथ' या कथेमध्ये उमटतात.

दयाराम पाडलोस्कर यांची 'उलो' ही कथा ग्रामीणजीवनाच्या पार्श्वभूमीवर येताना दिसते. गावातील मुलांचा पारंपारिक 'लगोरी' हा खेळ खेळणाऱ्या गोतावळ्याचे चित्रण येते. कोणाचे जावळ काढा किंवा केस कापून दाढी काढा अशा कामाचा मोबदला म्हणून धाकूच्या वडिलांना गावकऱ्यांकडून पैशांबरोबर कपडेही मिळतात म्हणत दिगू धाकूला चिडवतो. रागाने लालेलाल होत धाकू खेळ सोडून निघतो. दिगू शिवाय मजा येत नसल्याने व धाकू उद्यापर्यंत परतणारच असल्याने खेळ सोडून मुले रानमाळावर खेळायला निघतात. बैलांना हाकणारा दाजी मुलांना तिन्हीसांज झाल्याने घरी परतण्यास सांगतो. परतत असताना दिगूने केलेल्या मास्कारीमुळे दिगू व निवेदक रामग्यात वादही होतात. मुलांच्या आया 'उलो' म्हणजेच हाका मारत असल्याने मुले आपआपल्या घरी निघतात. परतीच्या वाटेत रामग्या म्हणजेच श्रीरामच्या आईला धाकूची कळ काढल्याचे समजल्याने मुलांनी कसे वागावे याबद्दल त्याला उपदेश देते. या गावातील लहानपणाच्या आठवणीत श्रीराम रमतो. श्रीराम कित्येक वर्षांनी गावात परततो. वडीलधारी मंडळी त्याची अपुलाकेने चौकशी करतात. रामग्या आता अत्यंत यशस्वी होत आईवडिलांचे नाव मोठे केल्याचे गावात बोलणे सुरू होते. कित्येक वर्षांनी त्याला दिगू भेटतो. रामग्याच्या वडिलांच्या निधनानंतर आईच्या बिकट परिस्थितीची दिगू रामग्याला जाणीव करून देतो. वेड्यांचे झटके येणाऱ्या आईला हॉस्पिटलमध्ये ठेवण्याचा प्रयत्न श्रीरामाने केलेला असतो. पण तिथे ती इतरांना त्रास देत असल्याने तिला तिथे ठेवणे कठीण जाते. श्रीरामची अमेरिकेत गेलेली बहिण आईची विचारपूस करत असते, पण मुलांचे संसार यशस्वी चालले असल्याचे बघणे तिच्या नशिबी नसल्याची खंत श्रीरामाला वाटते. आज दिगू त्याच्या दु:खाशी समरस होत गहिवरतो. श्रीराम घरी जातो पण आई नसल्याने भांबावतो. दिगू त्याला

आई तळ्यावर कपडे धुवायला गेल्याचे सांगतो. पण तळ्यावर गेल्यानंतर आईने धुतलेले कपडे असतात पण आई नसल्याने श्रीराम हंबरडा फोडतो. दिगू त्याला आईला 'उलो' म्हणजेच हाक घालण्यास धीर देत सांगतो अशी कथा येते. घरात नसलेली मूले शोधण्यासाठी एके काळी 'उलो' घालणारी आईच आज एकाकी पडल्याने मुलावर तिला 'उलो' घालण्याची पाळी येते. ग्रामजीवनापासून निर्माण होणारा दुरावा व आधुनिक जगण्यात आईवडिलांपासून दुरावलेली पिढी व आईवडिलांच्या उतारावयातील आयुष्यातील ओढताण या कथेत लेखक चित्रित करतात. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेत ग्रामजीवनात झपाट्याने होणाऱ्या बदलांमुळे निर्माण झालेल्या सर्वसामान्य माणसांच्या शोकांतिका तसेच ग्रामजीवनातील बदलांमुळे निर्माण होणाऱ्या मूल्यऱ्हासांचे चित्रण येते.

### 4.3.5 ग्रामीण स्त्रीजीवनाचे चित्रण

ग्रामजीवनातील अबला स्त्री भिन्न प्रवृत्तींच्या, वासनेच्या भाकीस पडते, कधी स्वसंरक्षणार्थ असमर्थ ठरते याचे वास्तववादी असे चित्र नव्वदोत्तरी कथांमधून दिसून येते. विठ्ठल गांवस यांची 'मद' ही ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर असलेली कथा. परंपरागत सांभाळत आलेली भाटकाराची भाटे सांभाळणारा धाकू, भाटकराच्या सेवेस अत्यंत तत्पर असतो. भाटकाराच्या भाटाची काळजी घेत शेवटी आपल्या बायकोलाही कोणताच विरोध न करता भाटकाराच्या स्वाधीन करतो. स्वत:च्या बायकोचा उपभोग घेणाऱ्या भाटकारास दुर्लक्षित करतो. भाटकाराशी असलेल्या संबंधातून धाकुची बायको मुलीला जन्म देते. मुलगी १७ वर्षांची झाल्यानंतर त्या कोवळया मुलीवर भाटकाराची नजर पडते व तो तिला आपल्या वासनेच्या भक्षी पडण्याचा प्रयत्न करतो त्यावेळी इतक्या वर्षात मुकाट्याने सहन करणारी धाकुची बायको भाटकाराचा मद जिरवत त्याची हत्या करते. अशा आशयाची कथा ग्रामीण जीवनातील अनैतिकतेचे चित्रण करताना दिसून येते. गोमंतकातील कष्टकरी कुळवाडी समाज व भाटकारशाहीचे चित्रण 'माज' या कथेमध्येही आलेले दिसून येते. पुरुषोत्तम भाटकारची वासनामय अशी कुदृष्टी आपल्या बायकोवर असल्याने प्रसंगावधान राखून आपल्या बायकोच्या अब्रूवर हात घालण्याच्या प्रयत्नात असलेल्या भाटकाराच्या मुलाच्या कमरेखालच्या भागावर आघात करून कुळवाडी असलेला कुष्टा त्याचा माज जिरवतो अशा आशयाची कथा गांवसांच्या 'माज' या कथेमध्ये आलेली आहे. परंपरागत चालत आलेली भाटकारशाही व त्यात कुळांच्या स्त्रियांच्या कुचंबणेचे चित्रण विठ्ठल गांवस यांच्या कथा करतात. गजानन रायकरांच्या 'परिवर्तन' या कथेत 'भागेली' म्हणजेच कुळवाडी स्त्रीची व्यथा

मांडण्याचा प्रयत्न लेखक करतात. भाटकारी प्रवृत्तीचे चित्रण कथेत येते. कुळवाडी बाबनीची बायको येसू शंकरबाब या भाटकराच्या वासनेचे शमन करते. भाटकारांना कुळवाड्यांच्या बायकांचा भोग हवा असतो पण कुळवाड्यांची मुले शिकून मोठी यशस्वी झालेली त्यांना पाहवत नाही या वास्तवाची जाणीव येसूला होते. बाबनी भाटकाराच्या जाचाला कंटाळून गाव सोडण्याचा विचार करतो. शंकरबाबाचे लक्ष मात्र आता वयात आलेल्या येसूच्या यमुना या मुलीवर असते. तिच्या अब्रूवर तो हात घालण्याचा प्रयत्न करताच, यमुना ही शंकरबाबाचीच मुलगी असल्याची जाणीव येसू करून देते. ती रणरागिणी बनून शंकरबाबाला हाकलून देते. आपली परिस्थिती बदलावी म्हणून आपण केलेल्या चुकीची जाणीव येसूला होते अशी कथा येते.

ग्रामीण स्त्रीची विवंचना ‘चंवर’ या कथेमध्ये लेखक मांडण्याचा प्रयत्न करतात. गबाळ, वेंधळा असलेल्या तिच्या नवऱ्यापासून लग्नाच्या दोन महिन्यांत तिला दिवस जातात. दोन मुलांच्या जन्मानंतर पुढे मूल होऊ न देण्याचा ती निर्णय घेते. आपला नवरा जबाबदारी घेत नसल्याने ती संसाराची जबाबदारी स्वीकारते. मुलांचे पालन पोषणाची मोठी जबाबदारी असल्याच्या जाणीवेने दोन मुलानंतर पुढे मुले होऊ न देण्याचा निर्णय घेणारी व कमलच्या सांगण्याने गर्भपाताच्या गोळया घेणारी एक ग्रामीण स्त्री शेवतूच्या माध्यमातून लेखक साकारतात. अधून मधून गोळया न घेतल्याने तिची पळी चुकते. तिसऱ्या मुलाच्या संगोपनाचे प्रश्न तिला पडतात. कोणतीच जबाबदरी न घेता फक्त आपला भोग घेण्यास येणाऱ्या आपल्या बावळट नवऱ्याची मानहानी करते. व तो घर सोडून जातो. सहा वर्षांपूर्वी घर सोडून नाहिसा झालेला आपला नवरा या जगात नसल्याचे शेवतूचे मन स्वीकारायला तयार नसते. अन् सहा वर्षांनी तो परततो. शेतात राबण्यासाठी जाणारी शेवतू दादा राण्याच्या शेतात तरवा लावण्यास जाते व तिथे कामासाठी जमलेल्या बायका कुजबुजतात. पतीच्या येण्याने तिच्या मनातील प्रणय भावना जागृत होतात. तिला आत - बाहेर चंवर फुटतो व नकळत ती नवऱ्याशी ओढली जाते. नवऱ्याशी संबंध ठेवून दुसऱ्या दिवशी तृप्त भावनेने ती जागी होते पण तिला पोटात मळमळते, उलट्या होऊ लागतात, तिच्या गर्भारपणाची ती सुरूवात असते. तिचा नवरा परत आपली जबाबदारी झिडकारून नाहिसा होतो. मानवी मनातील वासनावृत्तीचे चित्रण करत. एका ग्रामीण स्त्रीच्या माथी आलेली संसाराची दु:खे ‘चंवर’ या कथेतून व्यक्त होते. विठ्ठल गांवस यांची ग्रामीण पार्श्वभूमीवर असलेली ‘जुळं’ या कथेतही पतीच्या निधनानंतर पुरुष स्पर्शाला आसुसलेली स्त्री, गावातील एका कष्टकरी पुरुषाशी ओढली जाते. काजूच्या रानात बोंडू गोळा करायला जाणारी आपली सून रोज कमी बोंडू घेऊन येत असल्याने रानात नेमकी काय करत असेल या प्रश्नांनी सासू सासऱ्यांचा बळावलेला संशय, तिचा आपल्या प्रियकरासोबत पळून जाण्याचा प्रयत्न पण गावकऱ्यांच्या भितीने तो न

आल्याने आपल्याला शोधण्यासाठी गावकरी व घरचे येत असल्याच्या चाहुलीने लोकलज्जेने आपला जीव संपवण्याच्या हेतूने विहिरीकडे धाव घेणारी अशी स्त्री कथेत येते. आपली अब्रू आपल्या जीवापेक्षा महत्त्वाची मानणारी अशी ग्रामीण स्त्री त्यांच्या कथेत दिसते. पतीचा जाच सोसूनही पातिव्रत्य पाळणाऱ्या ग्रामीण स्त्री जीवनाचे चित्रण करत, ग्रामीण संस्कारांशी जोडलेल्या ग्रामीण स्त्रीचे चित्रण 'आवडू मावशी' या गजानन रायकर यांच्या कथेत येते.

दयाराम पाडलोस्कर 'खपली निघाल्या नंतर' या कथासंग्रहात कृषिजीवनाची पार्श्वभूमी मांडत ग्रामीण स्त्री जीवनाच्या वास्तवाचे चित्र मांडण्याचा लेखक प्रयत्न करतात. 'मळणी' या कथेत अफाट वायंगण शेती करणारा बाबुश गावकर येतो. चार मुलींची लग्ने झाल्यानंतर नवसाने झालेला मुलगा संतोष मात्र वडिलांच्या संपत्तीची उधळपट्टी करणारा ठरतो. बाबुशा मात्र आज ना उद्या आपला मुलगा सुधारेल या आशेने जगणारा, असे एकूण चित्रण येते. काजूच्या रानाची जबाबदारी सांभाळण्यासाठी बाहेरगावहून म्हणजे महाराष्ट्रातून मानायगडी आणतो. त्यांना काय हवे नको ते अगदी तत्परतेने पाहतो. आपल्यासाठी काम करणाऱ्या मानाय कामेरी यांप्रती कृतज्ञ असलेला बाबुशा महारवाड्यावरील भाद्ग्या महाराची पत्नी सकूस मळणीसाठी शेतात बोलावतो. सकूस तो आपल्या पोटच्या पोरीसारखा जपत असतो. सकू नवऱ्याच्या संशयी वृत्तीमुळे नवऱ्याची मारझोड सहन करते. भाद्ग्या तिचा नवरा तिचा उपभोग घेत, दारू पिऊन मारझोड करत व वांझोटी म्हणून शिव्या हसडतो. अपघाती भाद्ग्याचा मृत्यू होतो. सकूने पुनर्विवाह करावा अशी बाबुशाची इच्छा असते. मळणीचा दिवस उगवतो. तब्येत खालावल्याने बाबुशा मळणीस जात नाही. त्यामुळे संतोष या बाबुशाच्या मुलासमवेत जाणे तिला भाग पडते. सकूवर कुदृष्टी असलेला संतोष काम करताना तिच्या झालेल्या नाजूक स्पर्शाने वासनाग्रस्त होत तिच्यावर बलात्कार करतो. मळणी चाललेल्या शेतात मृतावस्थेत सापडलेला सकूचा मृतदेह पाहून बाबुशा कोलमडतो. सकूच्या मृत्यूमुळे मारेकरी बाबुशाला ठरवले जाते. बाबुश मात्र हे कृत्य आपल्या मुलाने केले असल्याचे ओळखतो. ग्रामव्यवस्थेत अस्पृश्य जातीतील स्त्रीच्या होणाऱ्या पिळवणूकीचे चित्र या कथेत लेखक मांडतात. तसेच अत्यंत संवेदनशील पण पुत्रमोहात फसलेल्या बाबुशाचीही ही कथा ठरेत. ग्रामजीवनाच्या पार्श्वभूमीवर दयाराम पाडलोस्कर यांची 'सुदामाचे गरे' ही कथा येते. सुदामा आणि त्याच्या बायकोमध्ये उडणारे रोज रोजचे खटके अनुभवून आपण लग्न करूच नये असे निवेदकाला वाटते. सुदाम्याला मुलबाळं झाली तरच त्यांच्या संसारातील वादविवाद कमी होतील असे निवेदकास वाटते पण सुदाम्याची पत्नी ऐकणाऱ्यांपैकी नसते. गरिबीत मुलाला जन्मच देऊ नये अशा विचारांची ती असते. सुदाम्याची पत्नी त्याला मामाच्या गावातील तिच्या जुन्या

मित्रापुढे हात पसरून आर्थिक मदत मागण्याचे सुचवते. मामाच्या गावी असलेल्या मित्राची सुदाम्याच्या बायकोबर नजर असते. गावात आल्यानंतर आपल्यासाठी कापे फणसाचे गरे घेऊन बायकोसोबत यायचे आमंत्रण सुदाम्यास मित्राकडून मिळते. पण आपल्या पत्नीवर असलेली त्याची कुदृष्टी सुदामा ओळखतो. आपली पत्नीही त्याला पाहून चंचल हसत असल्याचे त्याला वाटते. दुसरीकडे निवेदकाने लग्न करावे ही त्याच्या आईची मागणी सुरूच असते. बायकोच्या म्हणण्यानुसार मित्राकडे जात आर्थिक मदत मिळवून शेताच्या माथ्यावर चहाचा गाडा घालण्याचा सल्ला निवेदक त्याला देतो. निवेदक काप्या फणसाचे घरे घेऊन घराला कुलूप ठोकून बायकोसह मित्राकडे जातो. आठवडा लोटतो तरी परतत नाही. सुदामाची मठी आहे की नाही हे पाहण्यास त्याचा मामा येतो व सुदामाची विचारपूस करताच सुदामाच्या मित्राने फणसाचे गरे खाऊन आठळया बाहेर न फेकल्याचे प्रतिकात्मक पद्धतीने सांगत खंती होतो. निवेदकाला त्यातील लक्षार्थ समजतो. आर्थिक मदतीस गेलेल्या सुदामाच्या पत्नीला त्याचा मित्र आपल्या भाकीस पडतो. ते गोड गोमटे गरे चाखतो. त्याच्या बायकोला आपली रखेली बनवतो व सुदामास आपला नोकर. बायकोच्या स्वभावामुळे फसलेल्या गरीब गावकऱ्याची ही कथा येते. ग्रामीण स्त्री व मानसिकतेचे चित्रण ‘सुदाम्याचे गरे’ या कथेत लेखक करतात.

पाडलोस्करांच्या ‘कमळी’ या कथेतून ग्रामीण स्त्री जीवनाचे चित्रण येते. ‘कमळी’ या स्त्रीच्या जीवनाची करुण कहाणी लेखक कथन करतात. सात आठ वर्षे अर्धांगवायूचा झटका आल्याने अंथरुणात खिळून असलेला तिचा नवरा केशव छोट्याछोट्या गोष्टींमुळे आकांडतांडव करतो. नवऱ्याची सर्वतोपरी सेवा करत स्वत:च्या पोटाच्या भुकेला मारत ती जगते. सासू सासरे हयात असताना वांझोटी म्हणून हिणवली जाते. पतीची सुश्रुषा करूनही फक्त कढी अळणी झाल्याने आपल्याशी नवऱ्याने वाद घातल्याने ती दुखावते. त्यात रुग्ण असलेला तिचा पती केशव दारू पितो. कमळीने माहेरीही कष्ट सोसलेले असतात. कमळी जन्मताच तिच्या मोठ्या भावाला ताप येऊन त्याचे निधन झाल्याने, तिच्या जन्माने भावाला मृत्यू आल्याने ‘भावाक खायारी’ म्हणून हिणवली जाते. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी वयाने मोठ्या असलेल्या मुलाशी लग्न लावले जाते. शिक्षणापासून वंचित ठेवले जाते. कधीच माहेरच्यांकडून विचारपूस होत नसल्याने सुकलेल्या भातकुट्यासारखी ती जीवन जगते. दोन म्हशींच्या जीवावर जगते. तारामती या शेजारणीशिवाय अख्या गावात तिचा कोणी नसतो. भात चटणीत कालवून पतीस जेवण भरवताना पुरुषार्थ गाजवणारा पती तिच्यावर थप्पड हाणतो. आपल्याला होत नाही त्या परिस्थितीत कमळीला मारहाण करतो. जमिनीवर लोळणारी कमळी याचना करत ओक्साबोक्शी रडते. व शेवटी जीव वाचवण्यासाठी ओसरीवर धावा घेते. तारामतीने कमळीला दिलेल्या हाकांना होकार मिळत नसल्याने केशववर

गावकऱ्यांना कमळीला मारल्याचा संशय येतो. पूर्ण गाव त्याच्या दारात जमतो. गावकऱ्यांना सडेतोड उत्तरे देत गावकऱ्यांना तो परतवतो. कित्येक वर्षांनी रामगा गावात जातो. केशवाला भेटायला गेला असता त्याला त्याच्या दारिद्र्याची जाणीव होते. लोकांनी टाकलेल्या घासांवर कमळीच्या आठवणीत झुरत तो आज जगत असतो. स्त्रीचे पुरुषाच्या जीवनात असलेले स्थान ही कथा अधोरेखित करत जन्मापासून ग्रामीण स्त्रीच्या माथी आलेले दुख ही कथा मांडते. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेत ग्रामीण स्त्रीच्या भिन्न प्रवृत्तींचे चित्रण होताना दिसते तसेच ग्रामीण स्त्री जीवनाची विवंचना ही कथा मांडताना दिसून येते.

## 4.4 नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतून आविष्कृत होणारी प्रादेशिकता

डॉ. मदन कुलकर्णी प्रादेशिक जीवनासंदर्भात लिहितात, "प्रादेशिक जीवन हे शतकानुशतके चालत आलेले सांस्कृतिक जीवन असते. ते नैसर्गिक व स्वाभाविक असते. प्रगत जीवनाचा त्या जीवनावर प्रभाव जेव्हा होतो तेव्हा तर प्रदेश संस्कृतीचे प्राचीनत्व अधिकच उजळून निघते. प्रगतीतही आपले स्वरूप जपण्याचा प्रयत्न ग्रामीण जीवन करीत असते. त्यात भूतप्रेत, ईर्षा प्रति – हिंसा, न्याय – अन्याय, पाप दुःख व वेदना इत्यादी गोष्टी असतात. पण त्याबरोबर त्यात गोडवाही असतो. सणवार, उत्सव करण्याच्या विशिष्ट पद्धती असतात. त्यावेळी लोकगीते गायली जातात. लोकसंगीताच्या तालावर नृत्ये केली जातात. या सर्वांचे चित्रण प्रादेशिक कथाकादंबऱ्यांमधून येते, जे नागर जीवनाच्या तुलनेत वेगळे असते." [23] गोमंतकीय प्रदेशनिष्ठ स्वरूपाच्या चालीरीतींचे चित्रण नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेत दिसून येते.

विठ्ठल गांवस यांच्या 'कॅथरीन' या कथासंग्रहातील 'कॅथरीन' या कथेत गोमंतकीय ग्रामीण मद्यसंस्कृतीचे चित्रण आलेले आहे. मद्यालयांना गोमंतकात 'ताव्हेर्न' संबोधिले जाते. 'फेणी – हुर्राक' या गोमंतकीय पारंपारिक मद्यपेयांची विक्री 'कॅथरीन' या कथेतील नायिका 'कॅथरीन' करत असते. पारंपारिक मद्यसंस्कृतीशी बांधील असलेल्या 'कॅथरीन'चे चित्रण संवादाच्या माध्यमातून करताना लेखक लिहितात, "केथ्रू सगळो संसार सुधारलो पुण तुझो हो ताव्हेर्न सुधारलो ना. बाकीच्या ताव्हेर्नानी बियर आयली, व्हिस्की, रम, जीन फॉरीन ड्रींक आयले. खावपाक तातया, मटन, चणे बिकण दिवपाक लागले आणि तू आजून खारातले तोर दिता? असेच चलले जाल्यार एक दिस तुका हो ताव्हेर्न बंद करपाक पडतालो."[24] गोमंतकात सांस्कृतिक दृष्ट्या अनेक बदल होत असल्याने, पारंपारिक पद्धतीने मद्यविक्रीच व्यवसाय पुढे नेणाऱ्या 'कॅथरीन'चा व्यवसाय बंद पडण्याची भीती व्यक्त झालेली आहे. 'कॅथरीन' या कथेमध्ये गोमंतकीय ख्रिस्ती समाजाचे चित्रण लेखक

करण्याचा प्रयत्न करतात. गोमंतकीय ग्रामीण ख्रिस्ती समाज जीवनातील अनेक संदर्भ या कथेत आलेले दिसतात. चर्च मधील 'मास' म्हणजेच ख्रिस्ती धर्मात होणारी रविवारची प्रार्थना संपवून 'ताव्हेर्नात' येणारे ख्रिस्ती लोक, डुक्कराचे मास व 'रसांव' खाणारे ख्रिस्ती लोक, डुक्कर पाळणारी ख्रिस्ती कॅथरीन अशीही कॅथरीनची ओळख या कथेमध्ये होते. गोमंतकीय ख्रिस्ती मध्ये असलेल्या चालीरीतींचा उल्लेख करत असताना लेखकांनी जॉकी आणि कॅथरीनच्या विवाह निश्चितीसाठी घेतलेल्या शांतादुर्गेच्या प्रसादाचाही उल्लेख आढळतो. बाटाबाटीमुळे हिंदूंचे ख्रिस्तीत रुपांतर झाल्यानंतरही आजही अनेक हिंदू धर्मातील रूढी परंपरांचे पालन ख्रिस्ती धर्मियांमध्ये होतो ज्याच्या संदर्भ या कथेमध्ये येतो. गोमंतकात ख्रिस्ती मध्ये सुपरिचित असलेला नाट्यप्रकार 'तियात्र' याचा उल्लेख या कथेमध्ये होतो. तसेच डुक्करांना पाळणाऱ्या ख्रिस्ती धर्मियांमध्ये गोमंतकात असलेल्या पद्धतीचा उल्लेख 'कॅथरीन' कथेत होतो. डुक्करांना पाजण्यासाठी गेलेल्या 'कॅथरीन'चे लेखक चित्रण करताना लिहितात, "नेहमीप्रमाणे 'धोंड' घेऊन डुकरांना पाजण्यासाठी ती 'घुडा' कडे गेली. तिने ते 'धोंड'तिथे असलेल्या नेहमीच्या भांड्यात ओतले. पच...पच आवाज करीत, एकमेकांना डूसके देत डुकरं ते पिऊ लागली."[25] डुकरं पाळून उदरनिर्वाह करणाऱ्या ख्रिस्ती समाजाचे चित्रण 'लिब्रूची इच्छा' या कथेमध्ये आलेले आहे.

विठ्ठल गांवस यांची गोमंतकीय ग्रामीण भरडल्या जाणाऱ्या समाजाचे चित्रण करणारी, गोमंतकातील चालीरीतींवर आधारलेली 'ओझे' ही कथा महत्त्वपूर्ण ठरते. गोमंतकातील उच्चभ्रू समाजात 'ओझे' देण्याची पद्धतीवर आधारलेली ही कथा आहे. गोमंतकात नवीन लग्न झालेल्या नवरीच्या सासरी सण उत्सवाला फळ, भाज्या व अन्य जिन्नस पाठविण्याची प्रथा उच्चभ्रू समाजात आहे. 'ओझे' पाठवण्याची प्रथा आज बहुजनांमध्ये रूढ होत बापाच्या डोक्यावरचे 'ओझे' ठरते याचे चित्रण या कथेमध्ये येते. गोव्यातील देवाचा अवसर लोकांच्या अंगी येण्याच्या प्रथेवर आधारित 'वहिवाट' ही विठ्ठल गांवस यांची कथा महत्त्वाची ठरते. वडिलांच्या पश्चात गावातील चालीरीतीनुसार बाबल्यावर अवसराची परंपरा सांभाळण्याची जबाबदारी येते. देवाचा अवसर बाबल्याच्या अंगात येऊन आपली राखण होते अशी लोकांमध्ये समजूत असते. या समजुतीमुळे गावकऱ्यांकडून बाबल्याला शेती भाटे मिळाल्याने घराण्याच्या पोटापाण्याची व्यवस्था होते. प्रेमात असलेल्या बाबल्याल अवसर अंगात येण्याऐवजी प्रेयसीचा चेहरा दिसू लागतो व मन विचलित होत असल्याने गावकऱ्यांना कौल मिळत नाही. बाबल्याला अंगात अवसर न आल्यास शेती भाटे दुसऱ्या गावकऱ्यास देऊन रीत चालवण्याचा मानही दुसऱ्या गावकऱ्यास देण्यास येईल अशी सक्त ताकीद दिली जाते. शेवटी बाबलच्या अंगांत अवसर येताच तो थंडावण्याच्या वाटेत असतानाच वडिलांचे बोल त्याला आठवतात, "एक अदृश्य शक्ती आंगात संचारत

असल्याचा भास जाता, पूण तो फक्त काय क्षणापुरताच...नंतर सगळां सोंग करुचा पडतां."[26] आणि त्यानुसार पोटापाण्याच्या प्रश्नामुळे त्याला अवसर अंगात खेळवणे भाग पडते. 'गोमंतकातील ग्रामीण समजुतीचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे अवसर येण्याची पद्धत. 'वहिवाट' या कथेत या परंपरेचे चित्रण लेखक खालीलप्रमाणे करतात. "गेली किती पिढ्या आपल्या घराण्यातील पुरुषावर 'रवळनाथाचा' भार येतो आहे... त्याला काहीच माहित नव्हतं. त्याचे आजोबा मात्र खुदत होते हे त्याला माहित होतं. त्याच्या आजोबाच्या खुद्ण्याविषयीच्या आठवणी गावातले लोक अजूनही काढताहेत. त्यांचा सोवळं नेसलेला उंच बलदंड देह...घुमट-समेळाच्या तालावर पावलं मारणं, लोकांच्या गाऱ्हाण्यांना उत्तर देण्याची तऱ्हा... सगळंच अलौकिक होतं." [27]

गोमंतकातील ग्रामीण भागातील गडे उत्सवावर आधारित 'फोण' ही विठ्ठल गांवसांची कथा वैशिष्ट्यपूर्ण ठरते. या कथेची पार्श्वभूमी सांगताना लेखक लिहितात, "गोव्यातील काही भागात 'गडे' नावाचा लोकखेळ शिमग्याच्या दिवसात खेळला जातो. होळीच्या दिवशी हे 'गडे' (गावातील तरुण) तालावर होळीभोवती नाचतात. थोड्या वेळाने त्यांच्या अंगात अवसर येतो व ते होळीबाहेर पडतात व गावातील जंगलात पुरलेल्या माणसांचे खड्डे खणून माणसाच्या शरीराचे कुजलेले भाग, हाडे (मसणां) घेऊन होळीभोवती नाचतात. त्यांनी फक्त गावातील खड्डे खणायचे असतात. दुसऱ्या गावात जाण्यास त्यांना परवानगी नसते. दुसऱ्या गावातील सीमेवरील देवचार त्यांना गावात घेत नाही, असा गावातील लोकांचा समज असतो." [28] या गोमंतकीय 'गडोत्सावाच्या' पार्श्वभूमीवर आवड्या म्हारणीचा 'फोण' आपण उपसूनही देवाच्या कोपाच्या भितीने आपण न उपसल्याचे म्हणणारा पुरसो भाबड्या अशा ग्रामीण मनोवृत्तीचे चित्रण करतो. गोव्यात देवापुढ्यात गाऱ्हाणे (सांकडे) घालण्याची वैशिष्ट्यपूर्ण पद्धत या कथेमध्ये आलेली दिसून येते.

उदा. "हे माझ्या देवा समर्थाऽऽ''...

"होय सायबा" देऊळभरातील लोकांनी घाड्याच्या गाऱ्हाण्याला होकार दिला.

"आयज तुझी ही लेकरां तुझ्या पायाकडे शरण येवन गाऱ्हाणे मागता समर्थाऽऽ''

"होय सायबा."

"तू गाव धनी, गाव राखाणो, घडाना ते घडौन, वठाना ते वाठोन खुटी मारून मुठी जोडपी असो सर्व समर्थ देवा"...

"होय सायबा"...

"आयजपासून ह्या गावात नाना अरीष्टां आयली, संकटा आयली, प्रकोप झाले; त्या त्या वेळार तू एका दिलान, एके निष्ठेन गावाच्या पाठल्यान उभो रावलो समर्थ."...

"आयज तुझ्या या स्थळान असे कधीच घडोक नाय ते घडला. ह्या वायट कामात तुझ्या गावातल्या माणसाची साथ आसा झाल्यावर एका वर्षात त्याका शिक्षा करून तुझे सामर्थ्य दाखोन दी माझ्या समर्था."...

"होय सायबा."...

"तसेच गावातल्या भुरग्या बाळाकडे, गोरवा – वासराकडे, पिकपाण्याकडे लक्ष देवन सगळ्याक अन्न, वस्त्र, आरोग्य दिवन सुखी कर माझ्या समर्था."...

"होय सायबा."...[29]

***'फोण'*** या कथेमध्ये 'गडे' या गोमंतकीय पारंपारिक लोकपद्धतीवर लेखक भाष्य करतात. आमेगावच्या गड्यांनी आपल्या गावच्या आवड्या म्हारणीला दफन केलेला फोंड कोणी उपसला ? या प्रश्नात गावकरी असतात. शेजारच्या गावातील गड्यांविरुद्ध काही तरी निर्णय घेण्यासाठी सभा बोलावली जाते. देवाचा भार कडून देवालाच विचारायचे, आपल्या गावातलाच कोणीतरी फितूर असल्याशिवाय शेजारच्या गावातील गड्यांना हे जाणार नाही हे लक्षात येताच दवंडी पेटवली जाते की सगळ्या पुरुषांनी देवळात जमायचे व फितूर असलेल्या गावकऱ्यास शिक्षा द्यावी अशी  गाऱ्हाणी घालायची. फितूर असलेल्या गरीब गावकरी पुरसो याला जेव्हा ही बातमी समजते तेव्हा तो विचलित होतो. शेवटी आपल्यावर संशय येऊ नये म्हणून तोही जातो. कबुली देण्याचा प्रयत्न करतो पण गावकऱ्यांच्या संतापापुढे त्याला ते जमत नाही. शेवटी तो ही गाऱ्हाणे घालत असताना सहभागी होतो. आणि देव कोपाच्या भीतीने आपण दफन केलेले आवडू म्हारीणीचे प्रेत उपसले नसल्याची कबुली देतो. गोमंतकीय चालीरीती व भाबड्या मानसिकतेचे चित्रण लेखक करतात.

गोमंतकीय खारवी समाज व संस्कृतीचे चित्रण विठ्ठल गांवस 'दर्याचो पूत' या कथेत करतात. मासे विकण्याचा परंपरागत व्यवसायात असलेला किनारपट्टीवरील गोमंतकीय खारवी समाज, नारळी पौर्णिमा म्हणजेच 'पुनवेच्या' दिवशी होडीस डिंक लाऊन समुद्रात मासेमारीस उतरणाऱ्या खारवी समाजातील चालिरीतीचे चित्रण या कथेत येते. गुरांची काळजी घेणारा, बैल माजल्यास त्यांच्याकडून शेतातील काम व्हावे म्हणून त्यांना चेचवणारा कुळवाडी समाज, परंपरेने हे काम आपल्याला दिले असल्याने निष्ठेने परंपरा निभावणारा समाज, भाबडा, रूढी परंपरा समजुती मानणारा कुळवाडी समाज, अडले नडल्यास दृष्ट लागली नसेल ना? भूता-

खेताची बाधा जडली नसेल ना? भगताला सांगून प्रसाद पाकळी करणारा, पेडाच्या देवचाराला कोंबडा कापायला हवा अशा विचारांचा कुळवाडी समाज गांवस ‘माज’ या कथेतून मांडतात.

गावाच्या उत्सवाच्या धर्तीवर उदय नाईकांची ‘अवसर’ ही कथा येते. मालची पुनवेला होणाऱ्या बीएच्या जत्रेला रंजांगणात शेवटचा अवसर आल्यानंतर देवाचे खांब पुन्हा आपल्या घरवईंवर मठात ठेवले जातात. पावटूच्या घराण्यातील माणसांवर अवसर येण्याची परंपरा असल्याने देवाचे खांब पकडण्याचा मान पावटूकडे असतो. पावटूनंतर तो मान त्याच्या मुलाला देणे अपेक्षित असते. पण पावटूला आलेला अधूपणा व मुलालाही वेडाचे झटके येत असल्याने सदाशिव हा पावटूचा चुलता गावातील महाजन व इतर वांगड्यांना फितवून पावटूला मिळणारा अवसराचा मान आपल्याकडे हिसकावून घेतो. पण आपण इतकी वर्षे श्रद्धेने कार्य केल्याने शेवटच्या अवसराच्या वेळी देव नक्कीच आपल्या बाजूने कौल देईल अशी पावटूची श्रद्धा असते. उत्सवाचे चित्रण कथेत येते. “वाजत गाजत भोवर तोरणात शिरली. डोक्यावर दिवज घेऊन बायका रांगेत निघाल्या होत्या. तोरणात शिरताच गुळेकार वेळीप भारानं उसळू लागला, ढोल- जघांटीचा विलक्षण आवाज येऊ लागला. पावटूचं अंग शिरशिरू लागलं, धावत गडे राजांगणात अवतारासाठी गेले. ही शेवटची भोवर होती. ह्याच्यानंतर मोठा अवतार घेऊन जत्रा संपणार होती..”[30] आधाराशिवाय उभी असलेली तरंगे व उत्सवातील चमत्काराचे चित्रण करताना लेखक लिहितात, “राजांगणात तुडुंब गर्दी होती. पाय टाकायलाही जागा नव्हती. पावटू वरच थांबला. तासाभरातच सारे गडे आंघोळ करून राजांगणात येणार होते. पावटूनं खाली डोकावून बघितलं. सहा गड्यांची सहा तरंगे कुणाच्याही आधाराशिवाय उभी होती. देवाचा तो चमत्कार मानला जायचा. आज असाच काहीतरी चमत्कार होऊन आपल्या घराण्याचा खांबाचा मान आपणाला परत मिळणार ह्याची पावटूला आशा वाटत होती. ढोलांचा, जघांटीचा आवाज घुमला. अठरा गडे रांगेत राजांगणात आले. सहा गड्यांनी आपापली तरंगे धरली. गुळेकार वेळपानं आपला तोका पकडला.”[31] सदाशिव घराण्याचा मुख्य खांब धरून उभा असतो. सदाशिवावर अवसर येतो तो खरा की खोटा, पावटूला प्रश्न पडतो. पण अवतारपुरषाच्या तरंगांना कुणीही पकडलं तरी त्याच्यावर अवसर येणार हे पावटूला माहीत असतं. पण त्याचं मन मानत नाही. घराण्याचा मान ह्या वेळी तो आपणालाच देणार अशी त्याला आशा वाटते. पण पावटूची शेवटची अशाही फोल ठरते. सदाशिवच्या अंगात अवसर येतो व पावटूच्या हातात अवसराचा मान पुन्हा जात नाही. निष्ठेने श्रद्धेने सेवा करण्याचे फलित म्हणून आपल्याला अधूपणा आला व आपल्या मुलाला वेडा ठरला अशा विचारांनी तो खंतावतो. त्याचे डोळे पाणावतात व तो तरातरा निघून जातो. ग्रामीण समजुती परंपरेशी निष्ठेने जुळलेले ग्रामीण मनाच्या झालेल्या

उपेक्षेचे चित्रण ‘अवसर’ या कथेत येते. गोमंतकातील काणकोण ताकुल्यातील लोकसंस्कृती, लोकसमजुती, परंपरा यांचे सांगोपांग चित्रण आपल्या कथेतून घडवणारे महत्त्वाचे कथाकार म्हणून उदय नाईक यांचा विचार करावा लागतो. उदय नाईक हे स्वत: काणकोण गावचे रहिवासी असल्याने तेथील ग्रामसंस्कृतीचे ज्वलंत असे चित्र त्यांच्या कथेतून साकारताना आपल्याला दिसून येते. ‘घुमट’ हे गोव्याचे पारंपारिक लोकवाद्य अपघाताने कोयता हातावर पडल्याने जखमी झालेल्या माधूला उत्सवप्रसंगी ‘घुमट’ वाजवणे शक्य नसल्याने त्याची झालेली मानसिक घालमेल या कथेत लेखक चित्रित करतात. या कथेत अनेक पारंपारिक लोकगीतांचा अविष्कार कथाकार घडवताना दिसून येतात. शिगमोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ‘सुवारी’चे गायले जाणारे गीत येते.

उदा. “येदेशें वानर, चढले वृक्षार

सरसूर सरसूर पडले भूमीवर” पुढे गोलाकारात म्हटली जाणारी ‘चौरंग’ येते

“असे माघ महिनो आलो दादा

शिगमो परतलबा...

माघ महिनो आलो दादा

शिगमो परतला”

“होळीये सी खांब घातिला देवांनी ।।

होळीये सी खांब घातिला मूं ।।”[32]

चार आंग्राचे खालील गाणे येते.

उदा. “असे रिठे रे रिठे अंतराळ रिठे

खेळतील गडे आम्ही चोहीकडे..।।” [33]

‘तालगडी’ या लोकनृत्य प्रकारचा उल्लेख करून अंगणात खेळविल्या जाणाऱ्या ‘गोफ’ गुंफताना गायिले जाणारे गीतही खालीलप्रमाणे येते.

“कोणाली छोकरी, भुलली म्हाका रोकडी

नाव तिचे मोगरी, रावताली ती डोंगरी...।।

खंयसर तू भोवता, म्हाका दिसत गे हासता

सोबीत दिसता, घागरोच नेसता,

डोळ्यांचेर हाडता पिसारो...।।”[34]

गोमंतकातील काणकोण गावातील शिगमा हा ग्रामसंस्कृतीचा भाग असलेला अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असा उत्सव ठरतो कारण गावातील लोकांतर्फे अनेक पद्धतीची लोकगीते व लोकनृत्यांचा अविष्कार यात केला जातो. 'घुमटगाज' या कथेत हाच आविष्कार लेखक घडवताना माधू या व्यक्तिरेखेची कथा सांगतात. 'घुमट' या वाद्यासंदर्भात लेखक या कथेत माहिती देताना दिसतात. लहानपणापासून वडिलांसोबत 'घुमट' सांधण्यासाठी घोरपडीचे चांबडे रूमडीच्या झाडाचे चीक वापरून मडक्याला बांधणारा माधू व त्यावर उदरनिर्वाह करणारे त्यांचे कुटूंब याचेही वर्णन लेखक करतात. अपघात झाल्याने वादन शक्य नसल्याने खंतावलेला पण परशा घुमटाचा मोड धरताना त्याचे चुकीचे वाजविणे असह्य झाल्याने स्वत: घुमट हाती घेत तुटक्या मनगटाने देहभान विसरत लुबाड नाद वाजवणारा माधुच्या माध्यमातून ग्रामीण संस्कृतीशी जोडलेल्या ग्राम मनाचे चित्रण या कथेत येते.

ग्रामजीवनात विशिष्ट समाजामध्ये प्रामुख्याने 'वेळीप' समाजात असलेल्या 'भोवंडी' या चालीरीतीवर भाष्य करणारी 'भोवंडी' ही उदय नाईक यांची कथा महत्त्वाची ठरते. 'भोवंडी'तील प्रखर असे वास्तव लेखक मांडण्याचा प्रयत्न करतात. 'गोरवा म्हातन' ही देवाला जेवण घालण्याची विधी संपल्यानंतर जल्म्यांच्या ('जल्मी' ही देवपूजा, गाऱ्हाणे घालणारी जात) माळावर जमत खुंटेभोवणीला सुरूवात होते अशी पार्श्वभूमी लेखक मांडतात. खुंटेभोवणी ही गावाच्या मूळ पुरसाक रक्ताचा मान देण्यास केली जाते. या भोवंडीचे विस्तृत वर्णन करताना लेखक लिहितात, "जवळ जवळ शंभर – सव्वाशे माणसांचा पंगड. त्यात दहा-बारा आरमेली आपापली आर्म घेऊन सज्ज. बाकीचे आरवडे. रान उठवणारे. सकाळी बाहेर पडायचं. कुठल्याही एका जंगलाचा भाग बुधवंत नक्की करायचा. आरमेल्यांना आपापल्या जागा माहित. त्याप्रमाण आर्म घेऊन बसायचं. बाकी आरवडी रान उठवत यायचे. रानडुक्करांच्या येण्याजाण्याच्या वाटा सर्वांना ठाऊक. डुक्कर बरोबर कचाट्यात सापडला की आरमेली फार मारायचा. डुक्कर पडला की बोंब ठोकायचा. नंतर त्या डुक्कराला काठीवर बांधून उलटं लटकावून डुक्कर कापण्याच्या ठराविक जागी आणायचं. विणलेल्या ताज्या मल्लावर त्याला ठेवायचं. डुकराला सुरी लावण्याचा मान गावच्या मुख्य वेळपाचा. वेळीप धारदार सुरी मानेला लावायचा. चुन्नीच्या पाच पानांवर गरमागरम लाल रक्त ठेवून त्याचे 'वाडे' मूळपुरषासहित बाकी देवांना ठेवायचा. सांगणी व्हायची. सांगणी झाल्यावर 'आकेस' मारायचे. त्यानंतर वेळीप सुरीनं मान, कान, शेपटी, मांस व काळीज ह्यांचे तुकडे कापून घ्यायचा. पाचही तऱ्हेच्या तुकड्यांना वीरामध्ये गुंतून गावच्या पाच मानेल्यांना ह्या 'सुळयाचा' मान द्यायचा. डुक्कर मारणाऱ्याला डोके व मानेकडचा भाग मिळायचा. डुक्कराचं थोडं मांस तुकडे करून निखाऱ्यावर भाजलं जायचं. हे भाजलेले 'आब' लोकांना वाटायचं. नंतर मांसाचे समान वाटे व्हायचे. गावात ऐंशी चुली. प्रत्येक

चुलीला एक वाटा. कुंभ्याच्या पानांत गुंडाळून मांस वाटलं जायचं...''[35] 'भोवंडी' या पद्धतीमुळे डुक्कर समजून रोघलो या गृहस्थावर गोळी झाडली जाते व तो मृत्युमुखी पडतो. गावातील ही पद्धत बंद पडू नये म्हणून बुधवंत भागडू या अपघाताची वाच्यता न करण्यास सुचवतो. या 'भोवणे'त सहभगी असलेला व त्या भयानक अपघाताचा साक्षीदार असलेला वसंता, 'भोवंडी'चे वास्तव समजल्यानंतर कायद्याने 'भोवंडे'ला मान्यता नसल्याने विरोध करतो. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत ढवळ्या या गृहस्थाला निवडून यायचे असल्याने रोघल्याला मारल्याचा समजही पसरतो. प्रथांचा अनिष्ठ फायदा घेत घात पात घडू नये म्हणून वसंता प्रथेला विरोध करतो अशी कथा येते.

'रोट' ही अशाच पद्धतीची कथा येते. गोमंतकातील अनेक ग्रामदैवतांना 'रोट' घालण्याची प्रथा येते. 'रोट' म्हणजे तांदळाच्या पिठात गूळ घालून भाजलेली भाकरी देवाला दिली जाते. त्यासोबत दारू, विडी व काही ठिकाणी सुकलेल्या माशाचा तुकडा देण्याची पद्धत दिसून येते. तळयानास हे दैवत म्हणजे राखणा असल्याने गावात तळयावरून, पेडावरून कर्पा या गावापर्यंत त्याची फेरी चालू असते. अशा या ग्रामीण समजुती परंपरेबद्दलचे एकूण चित्रण या कथेत येते. गोव्यातील अनेक गावात ग्रामदैवत म्हणजेच 'राखणे' गावाची राखण करतात अशी समजून दिसून येते. ग्रामजीवनातील या पद्धती पाळण्याचा अट्टहास बदलत्या समाजजीवनात घात पाताचे कारण ठरू शकते याचे चित्रण या कथेत येते. म्हाळू या आपल्या म्हाताऱ्या वडिलांच्या बोलावण्याने विठू गावात येतो, डॉक्टरांनी पार्वती या आपल्या गर्भवती पत्नीला दिलेली तारीख जवळ आल्याने तिच्या काळजीतच खुंटीवर टांगलेले ढोल घेत घराण्याच्या परंपरेनुसार तो आपल्या वडिलांसोबत बाहेर पडतो. लोकांकडून 'रोटा'साठी समान गोळा करून 'तळयानास' या ग्रामदेवतेला वर्षातून एकदा 'रोट' घालून गावातल्या लोकांसाठी सुख समृद्धी मिळविण्यासाठी चाललेली ही प्रथा असते. गावाच्या सुख समृद्धीसाठी गावभर फिरता भरपूर उशीर होतो. विठूला आपल्या पत्नीची काळजी सतावत असते पण आपल्या वडिलांच्या हट्टापायी त्याला सगळा गाव भटकणे भाग पडते. पत्नीच्या काळजीने अंगणात पोहोचलेल्या विठूला, प्रसुतीवेळी पत्नीच्या पोटात दुखून ती घरात अडकल्याने बाळाला जन्म देताच तिचे निधन झाल्याचे कळते. संतापलेला विठू म्हाताऱ्या वडिलांना दोषी ठरवत भिंतीला टांगलेला ढोल घेत ढोल तळयात बुडवत प्रथा संपविण्यास निघतो अशी कथा येते.

'पाडवा' या कथेत पाडव्याच्या पार्श्वभूमीवर गावात होळी पेटवून सुरू होणाऱ्या उत्सवाचे चित्रण लेखक उदय नाईक करतात. ''माय मावाली सून एकटी रे

फुलां माळून मान चेपटी रे SSS SS S

शाबो SS S शाबो SS S

विठूच्या चेड्यानं गाणं म्हटलं. ढोलावर बडी पडली. ढम ढम ढोल वाजू लागला. जघांट खणखणू लागली. ताशावर बड्या फरफरल्या. होळी धाडधाड पेटत होती. होळी भोवती जमलेली माणसं फेर धरून नाचू लागली. बंगाली खेळाला सुरूवात झाली. पावले तालावर पडू लागली. खेळता खेळता पावटू नाल्ल्या आगीत टाकू लागला. आग फोफावू लागली. ज्वाला जिभा लपकावू लागल्या. दूर राहून भिकू बघत होता. शेवणीच्या झाडाखाली तो उभा होता. आजूबाजूला गर्द काळोख. काळोखातच तो पुरता मिसळून गेलेला. होळीची गंमत बघायला लोकं जमली होती. दोन वाडे मिळून वर्षो न वर्षे होळी पेटवायचे. संवत्सर पाडव्याच्या दिवशी होळी पेटवली जायची. दोन्ही वाड्यांच्या मध्यभागी एका शेतात माडाचा दीड मीटर लांबीचा ओंडका मधोमध पुरला जायचा. त्याच्या सभोवताली करवंट्याची रास. ओंडक्यावर फुटलेलं मडकं ठेवलं जायचं. वयल्या वाड्यावरचे लोक ही तयारी करायचे. वयल्या वाड्यावरून भोवर तरंगे घेऊन खाली यायची. खालचे वाडेकार त्यांची वाट बघायचे. वयल्या वाड्यावरचे भोवरीचे लोक चुडतांच्या चुडी पेटवून वाजतगाजत यायचे. मग खालचे वाडेकार पण चुडी पेटवायचे. दोन्हीं भोवरी एक व्हायच्या. जवळच्या पेडाकडे यायच्या. जळत्या चुडी गोल गोल फिरवत खेळणारे गडे धावायचे. ढोल गतीनं वाजायचा. वीस-पंचवीस मीटरवर असलेल्या पेंढरेबांयला वळसा घालून गडे माघारी पेडाकडे यायचे. तीन फेऱ्या घातल्या जायच्या. तिथून 'शाबो' चा गजर करीत भोवर होळीच्या खांबाकडे यायची. तिथल्या नाल्ल्या पेटवल्या जायच्या. दोन-तीन जळक्या नाल्ल्या फुटक्या मडक्यात ठेवल्या जायच्या. होळी भोवती फेर धरून बंगाली खेळ खेळला जायच्या.”[36] अशा पद्धतीने होळीचे वर्णन येते. गावातल्या सण उत्सवात रीति भातीतला मनपान हा चर्चेचा विषय असतो. शिगम्याच्या मेळाची सुरूवात भिकुच्या घरून व्हावी, व पाडव्याचा पहिला मान भिकूला मिळावा म्हणून गावकऱ्यांमध्ये चर्चा सुरू होते. आणि तो न मिळाल्यास होळीत सहभागी व्हायचे नसल्याचे नागेशबाब, हरीमाम व अन्य ग्रामस्थ भिकुच्या साक्षीत ठरवतात. वरच्या वाड्यावरील लोक खालच्या वाड्यात येऊन तो मान आधी भिकुच्या वडिलांना देत असे. त्यांच्या मृत्यूपश्चात हा मान भिकुचा मोठा भाऊ रत्नाकरला मिळालेला असतो. पण रत्नाकरने सर्व चालीरीती सोडल्याने हा मान भिकूला मिळावा अशी मागणी बैठकीत केली जाते. अन्यथा भोवर खाली आणण्यासाठी वरच्या वाड्यावरील लोकांना खालच्या वाड्यावरील लोकांकडून गाऊन आवाहन केले जाणारा नसल्याचे सांगितले जाते. शेवटी मात्र पूर्वजांची परंपरा आणि ती चुकविल्यास पाप ठरेल या भितीने भिकू सोडून सर्व गावकरी सहभागी होतात. ढोल,

कांसाळे, जाघांटीच्या आवाजाने भिकूला अवसर येत असे, पण उत्सवावर बहिष्कार घालू पाहणारे सर्व गावकरी तरंगा बांधत उत्सवाची तयारी करत असलेले पाहून भिकू संतापतो. मांडावर शिर्षारान्नीचा उत्सव सुरू असतो. शिर्षारान्नी हा काणकोण मध्ये होणारा उत्सव याचे संपूर्ण चित्रण कथात लेखक करतात, “ ’चला रे चला. शिर्षारान्नी करया. चला अवताराक उभे रावात...’ बुधवंत पुरसो ओरडला. ह्या वर्षी शिर्षारान्नीचा उत्सव होता. तीन गडे डोकी एकमेकांना टेकवून तीन दिशेनं धुळीतच आडवे झाले. त्यांच्या डोक्यावर मडकं ठेवण्यात आलं. जळकी नाल्ली डोक्यांच्या मधल्या भागात ठेवण्यात आली. एका गड्याला गुडघ्यावर बसवण्यात आलं. भगत बनलेल्या गड्यानं तलवारीचा लुटुपुटीचा वार त्याच्या डोक्यावर केला. लुटुपुटीचं रक्त मडक्यात टाकण्यात आलं. बाकीचे गडे अवताराला उभे राहिले. भिकू टकमक बघत होता. हे सारं शास्त्र मल्लिकार्जुन देवाच्या बियेच्या जत्रे दिवशी करतात. एका वर्षी ‘वीरामेळ’ व ‘दुसऱ्या वर्षी’ ‘शिर्षारान्नी उत्सव’ इथं सवंत्सर पाडव्याला शिर्षारान्नी करण्याचा प्रघात. तो ही लुटुपुटीचा. ढोल जघांट नेटानं वाजत होती. गडे आपापली तरंगे घेऊन उभे राहिले होते. अवतारास सुरूवात झाली होती. तीन भगत तीन तलवारी घेऊन उभे राहिले. वादनाची लय वाढू लागली. भगत आळीपाळीने तलवारी वेळावू लागले. लुटुपुटीचा भार गड्यांच्या अंगात संचारला. वादनाची लय शिगेला पोहचताच गड्यांनी जिन्याच्या बड्यांची तरंगे काढदिशी पायांनी मोडून टाकली. देसायांचा पुरसो भलेमोठे तरंग घेऊन खाली बसला. हाऊसा, हाऊसा... करून तो भार आल्यागत घुमू लागला.”[37] नागेशबाब, हरीमाम या आपल्या गावकऱ्यांना कौल घ्यायला जाताना पाहून भिकूही जाऊ इच्छितो पण अडतो. कौल संपतो. आपण आपल्या पूर्वजांची रीत मोडली, पाडवो म्हणजे आपलं ‘दायज’, आपल्या मुलाबाळांना तर ते बधणार नाही ना? या प्रश्नाने तो वेड्यागत होतो. मांडावर येत पायानेचे करवंट्या होळीत फेकतो व जोमाने ‘माई मावली सून एकटी रे’ हे मांडावरील गीत गात आपला सहभाग दर्शवतो. ग्रामीण पार्श्वभूमीवर आलेल्या उदय नाईकांच्या कथांना ग्रामीण लोकजीवन, रूढी परंपरा, पद्धती, समजुती यांचा आधार लाभलेला दिसून येतो. ग्रामसंस्कृतीशी बांधील असलेल्या व्यक्तींच्या जीवनचित्रणातून ‘घुमटगाज’, ‘देव’, ‘रोट’, ‘भोवंडी’, ‘रोट’, ‘पाडवा’ या कथा आकार घेतना दिसून येतात. त्यामुळे गोव्यातील भिन्न भागातील रूढी परंपरांना केंद्रस्थानी ठेवत प्रदेशनिष्ठा जपणारे नव्वदोत्तरी कालखंडातील एक महत्त्वाचे प्रादेशिक कथाकार म्हणून उदय नाईक यांच्या कथांचा विचार करणे योग्य वाटते. उदय नाईक यांच्या कथेतील प्रादेशिकतेत अंतर्भूत असलेले ग्रामीणतेचे स्वरूपही दिसून येते. गजानन रायकरांची डोंगरी गाव व गावातील सुवारी वादन व इंत्रूज उत्सवाच्या पार्श्वभूमीवर ‘तीन शेवती आमाड्या भोवती’ ही कथा आकार घेते. गोमंतकातील कालोत्सावाच्या पार्श्वभूमीवर ‘पांडुरंग परोब’ ही कथा येते.

ग्रामजीवनातील सण उत्सवांचे चित्रण ‘आवडू मावशी’ या कथेत येते. धालोत्सवात घातली जाणारा पिंगळीचा नाच, अवसर येणाऱ्या रंभा. इ उल्लेख कथेत येतो. विठ्ठल गांवस, गजानन रायकर, चंद्रकांत गावस, उदय नाईक, दयाराम पाडलोस्कर, गजानन देसाई अशा नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथाकारांच्या लेखनातून गोमंतकीय संस्कृती, रूढी, परंपरा, समजुती, गोमंतकीय सण, उत्सव यांचे चित्रण होताना दिसून येते.

ग्रामीणता ही प्रादेशिकतेच्या पोटात सामावणारी संकल्पना असल्याने नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील ग्रामजीवनाचे अनुभवविश्व हे गोमंतक या प्रदेशाच्या कक्षेत वावरताना दिसून येते. गोव्यातील भिन्न समजुती, उत्सव, परंपरा, चालीरीती, राहणीमान यांच्या धर्तीवर कथानकाला आकार प्राप्त होताना आपल्याला दिसून येतो. मूळ कथानकातील कथाबीजे ही बऱ्याच प्रमाणात प्रादेशिक स्वरूपाच्या चालीरीती व समजुतींवर आधारित असलेल्या आपल्याला दिसून येतात. उदा. उदय नाईक यांच्या ‘भोवणी’, ‘अवसर’, ‘रोट’ या कथा, विठ्ठल गांवसांची ‘ओझे’, गजानन देसाईंची ‘डांक’ या कथांचा विचार करावा लागेल. त्यामुळे नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील प्रादेशिकता हा या कथालेखनाचा एक वैशिष्ट्यपूर्ण पैलू म्हणावा लागेल.

प्रा. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या मते, “प्रादेशिकतेचे ग्रामीणत्वाशी, निश्चितच काही बाबतीत साम्य असते, परंतु या दोन्ही संज्ञा एकच आहेत असे मात्र नाही. तसेच या दोन्ही संज्ञांनी निर्देशित होणारा अर्थही सारखाच असतो असेही नाही. ते अर्थ परस्पर समांतर आहेत परंतु एक नव्हेत. कारण प्रादेशिक साहित्य ग्रामजीवनाला ग्रामसंस्कृतीला फारसे महत्त्व देत नाही तर ते महत्त्व देते ते एका विशिष्ट प्रदेशाच्या समग्र टप्प्याला. कधी ग्रामजीवन आलेच तर ते स्वतंत्रपणे येत नाही. ते येते ते त्या प्रदेशातील समग्र संस्कृतीचा भाग म्हणून ! येथे ग्राम संस्कृतीपेक्षा त्या प्रदेशाचा टापू अधिक महत्त्वाचा असतो. त्यादृष्टीने प्रादेशिक साहित्यातून व्यक्तिकेंद्रितता दिसत नाही तर समूहकेंद्रितता हे या साहित्याचे वैशिष्ट्य असते. या साहित्यातून एखादी व्यक्ती प्रमुख असली तरी तिच्यातून ध्वनीत होत असताना ती व्यक्ती स्वतंत्रपणे नजरेत भरेलही, परंतु शेवटी ती त्या प्रदेशाशीच बांधलेली आहे, हेच अधिक नजरेत भरते. एक सबंध प्रदेशाचा प्रदेश लेखकाच्या व्यक्तिमत्त्वात मुरून गेलेला असतो. प्रदेशाचे स्वत:चे असे एक व्यक्तिमत्त्व असते.” [38] व्यक्तिकेंद्रीताततेून गोव्यातील समूहजीवनाचे आविष्करण या कथेतून होताना दिसते. गोमंतकीय कथा अभ्यासक डॉ. बाळकृष्ण कानोळकर प्रादेशिकता ही सौंदर्यवादी प्रवृत्तींच्या अनुषंगाने निसर्गपूजनातून निर्माण झाली. या मताचा विरोध करत प्रादेशिकतेची व्यापकता स्पष्ट करतान ते म्हणतात, “प्रादेशिकता म्हणजे केवळ निसर्गचित्रण नव्हे वा निसर्गाच्या प्रभावातून निर्माण आलेल्या

अनुभूतीचे प्रकटीकरणही नव्हे. प्रादेशिक कथा वा कोणतेही वाङ्मय हा केवळ निसर्गाचा आस्वाद वा संस्कार नसतो तर भूमी आणि माणूस यांच्या संबंधाच्या वास्तवाचे ते संशोधन असते. प्रादेशिक साहित्याचा अवतार मराठीत झाल्यास अनेकविध प्रदेशांचे वास्तव - प्रादेशिक वास्तव - रुपबद्ध होईल.''[39] डॉ. कानोळकर यांनी मांडलेल्या प्रादेशिकतेच्या व्यापकतेचा विचार केल्यास आपल्याला गोमंतकीय कथा वाङ्मयच्या परंपरेकडे कटाक्ष टाकणे गरजेचे ठरते. वि. स. सुखटणकरांनी लिहिलेला 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' हा मराठीतील पहिला प्रादेशिक कथासंग्रह मानला जातो. या कथासंग्रहातील 'जाई – जुई' या पहिल्या कथेत, गोमंतकीय प्रदेशातील देवदासी परंपरेचे चित्रण करत प्रादेशिक प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला. गोमंतकीय मुक्तिपूर्व काळात लिहिलेला हा कथासंग्रह गोमंतकातील तत्कालीन रूढी – परंपरांमुळे निर्माण झालेल्या समाजवास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न दिसतो. १९९० नंतरची गोमंतकीय मराठी कथाही गोमंतकीय प्रदेश जीवनातील बदलांच्या पार्श्वभूमीवर आलेली दिसून येते. त्यामुळे गोमंतकीय कथाकार विठ्ठल गांवस, मिलिंद म्हामल, नारायण महाले हे कथाकार गोव्यातील प्रदेशनिष्ठ स्वरूपाच्या प्रश्नांना वाचा फोडताना दिसून येतात. तसेच या कथेत ग्रामीण जीवनाचे चित्रण करत असताना अनेक प्रादेशिक संदर्भ मांडलेले दिसून येतात. उदा. गोमंत प्रदेशातील हिरवाई व कौलारू घरांचे चित्रण लेखक विठ्ठल गांवस 'पेजेला देईल त्याला...' या कथेत करतात लिहितात, ''त्यांनी सभोवार नजर टाकली. चारी बाजूंनी गाव डोंगरांनी वेढलेला होता. नवरात्रीचे दिवस असल्याने सगळीकडे हिरवेगार दिसत होतं. समोर छोटी छोटी कौलारू घरे दिसत होती. तिन्हीसांजा होत आल्या होत्या. चोहोबाजूंनी अंधारून येत होतं. माळरानातून गुरे गोठ्याकडे परतत होती. त्यांच्या गळयातल्या घुंगराचा आवाज कानी पडत होता. मधूनच एखादी गाय 'हम्मा' करीत आपल्या वासराचा मागोवा घेत होती. तर वासरू तसाच प्रतिसाद देऊन आपलं अस्तित्व दाखवत होते. त्याच्या मागून गुराखी चालताना दिसत होते. बाजूच्या छोट्याशा हॉटेलात चार-पाच जण चहाचे घुटके घेत चकाट्या मारत होते. 'गोष्ट आजोबांची या कथेमध्ये गोमंतकीय प्रदेश व प्रादेशिक जीवनातील स्थित्यंतराचे चित्रण लेखक करतात. '' आपल्या बालपणात त्यानं पाहिलेली ती गावे त्याच्या डोळयांसमोर दिसू लागली. त्याच्या मामाचा गाव त्या परिसरात होता. त्यामुळे लहानपणी त्याने तो सारा परिसर पायी चालून पहिला होता. हिरवीगार विस्तीर्ण पसरलेली वायंगण भात शेती...सकाळच्या थंडीत कुडकुडत गुडघाभर चिखलात नांगर हाकणारे शेतकरी...त्याच्या मागून राबणारी बायकापोरं...काम करत असताना गाणी म्हणणाऱ्या बायकांचे मंजुळ स्वर... त्यांच्या आजूबाजूला चिखलातले किडे टिपण्यासाठी ध्यानमग्न असलेले पांढरेशुभ्र बगळे... ओहोळातून झुळझुळ वाहणारे निर्मळ स्वच्छ पाणी. शेताच्या माथ्यावरच्या बांधावर आकाशाला भिडणारे माड... पण आता

तिथं लालबुंद मातीचे ढिगारे आणि धुळीशिवाय काहीच नव्हतं...आणि गावागावांत छोट्या-मोठ्या कौलारू घरातून वस्ती करून असणारी माणसं तर दिसतच नव्हती."[40]

उदय नाईक यांच्या कथेतही प्रदेशनिष्ठा जाणवते, काणकोण या प्रदेशातील चालीरीती, समजुती, परंपरा, बोली, लोकगीते या अनेक गोष्टी त्यांच्या कथेतून दिसून येतात, या कथेत गोमंतकीय निसर्गतत्त्वाशी असलेली बांधिलकी, समूहमनाचा अविष्कारही कथेतून दिसून येतो. उदा. 'भोवंडी' या चालीरीतीवर आधारित 'भोवंडी' ही कथा तसेच गोमंतकीय समूहजीवनाचा, चालीरीती, मानसिकता इत्यादींचा परामर्श घेणारी उदय नाईक यांची 'अवसर', 'घुमटगाज' इत्यादी कथांचा विचार करावा लागतो. १९९० पूर्व गोमंतकीय कथेत निसर्गचित्रण, प्रदेशचित्रण इ. माध्यमातून व्यक्त होणाऱ्या प्रादेशिकतेच्या तुलनेत नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा प्रभावी होताना दिसत नाही. गोवा या प्रदेशाचा टापू साकारात प्रदेशाचे एक वेगळे व्यक्तिमत्व नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेत सांगोपांग भिनल्याचे जाणवत नाही तर नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा ही प्रदेशनिष्ठ स्वरूपाच्या बदलांचा वेध घेण्याचा प्रयत्न करते, प्रदेशनिष्ठ स्वरूपाच्या चालीरीती व प्रादेशिक प्रश्नांना वाचा फोडत प्रदेशनिष्ठा व्यक्त करते. प्रादेशिक साहित्याच्या स्वरूपावर विवेचन करताना, साहित्यकृतीतून अवतरलेला प्रदेश हा केवळ पार्श्वभूमी म्हणून न येता साहित्यानुभवांशी हा प्रदेश एकरूप होणे गरजेचे ठरते. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतही प्रदेशनिष्ठेचे स्वरूप हे प्रादेशिक बांधिलकीच्या स्वरूपात असल्याचे जाणवते. गोव्यातील प्रश्न हे कथेतील अनुभवविश्वाशी जुळत एका प्रदेशाचे चित्र पुढे आणताना दिसून येतात. त्यामुळे उदय नाईक, नारायण महाले, मिलिंद म्हामल या कथाकारांना प्रादेशिक कथाकार म्हणणे रास्त ठरते. 'ग्रामीण कथा व प्रादेशिक कथा, यात म्हटले तर व्याप्तीचाच फरक आहे.'[41] या इंदुमती शेवडे यांच्या मताचा विचार केल्यास नव्वदोत्तरी गोमंतकीय कथाकार गजानन रायकर, विठ्ठल गांवस, चंद्रकांत गांवस, दयाराम पडलोस्कर, गजानन देसाई यांच्या कथालेखानातून ग्रामीणतेची व्याप्ती अधिक जाणवते तर उदय नाईक, नारायण महाले, मिलिंद म्हामल या कथाकारांच्या कथालेखनात प्रादेशिकतेची व्याप्ती अधिक जाणवते. तसेच ग्रामीण जीवनानुभवाची व्यापकता अधिक असणाऱ्या विठ्ठल गांवससारख्या लेखकाच्या लेखनात प्रदेशनिष्ठ स्वरुपाची वर्णने, चालीरीती इत्यादीचे पडसाद दिसून येतात तर उदय नाईक, नारायण महाले, मिलिंद म्हामल यांच्या कथांना ग्रामजीवनाची पार्श्वभूमी लाभालेलीही दिसून येते. त्यामुळे ग्रामीणता व प्रादेशिकतेचे संकल्पनांमधील सीमारेखा आखून पूर्णपणे या दोन्ही जीवनानुभावांचा एकमेकांशी असलेला संबंध नाकारणे अयोग्य ठरते.

### 4.5 समारोप

गोमंतकीय साहित्याची काही वैशिष्ट्ये येथील आधुनिक साहित्याला शंभर वर्षे होता होता नोंदवता येणे शक्य आहेत. त्यापैकी पहिले वैशिष्ट्य म्हणजे येथील कथा वाङ्मय हे लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या काळात प्रादेशिकतेच्या निकषावर पुढे येत गेले. १९७० ते १९८० च्या दरम्यान झालेल्या कथालेखनात प्रादेशिकतेचे निकष धूसर होऊन त्यावर ग्रामीण वाङ्मयाचा साज चढू लागला. आज बहुतांशी गोमंतकीय कथा ही ग्रामीण आणि प्रादेशिक कथेची मधली म्हणावी अशी अवस्था आहे. काही ठिकाणी तिचे पारडे ग्रामीणतेकडे झुकते तर क्वचित ठिकाणी ती प्रादेशिक वळणाचेही समर्थन करते. परंतु संशोधक म्हणून यासंदर्भात गोमंतकीय कथेच्या शंभरीच्या उंबरठ्यावर तिला प्रादेशिक किंवा ग्रामीण ही संबोधने न देता गोमंतकीय कथा हा संकल्पनिक संबोध सुयोग्य ठरतो.

### संदर्भ

[1] जगनाळे, रेखा, *प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा*, विजय प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. २५.

[2] कुलकर्णी गो. म., *मराठी ग्रामीण साहित्य : परिसर आणि प्रवाह*, मेहता पब्लिकेशन हाउस, पुणे, १९९९, पृ. १९.

[3] जगनाळे, रेखा, *प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा*, विजय प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. २६.

[4] मंचरकर, रत्नाकर बापू, *एकोणिसशे साठ नंतरची ग्रामीण कादंबरी*, 'ग्रामीण साहित्य विशेषांक', म.सा.प. (सं. डॉ. आनंद यादव), १९८०, पृ.५८.

[5] जगनाळे, रेखा, *प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा*, विजय प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. २६.

[6] तोरो. अ. रा., *आधुनिक मराठी ललित वाङ्मयातील प्रादेशिकता, उद्गम आणि विकास* (मराठी कादंबरीतील प्रादेशिकता मधून उद्धृत), १९८२, पृ. १४.

[7] जगनाळे, रेखा, *प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा*, विजय प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. क्र. १०.

[8] जगनाळे, रेखा, *प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा*, विजय प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. क्र. ६.

[9] जगनाळे, रेखा, *प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा*, विजय प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. क्र. १३.

[10] जगनाळे, रेखा, *प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा*, विजय प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. क्र. १४.

[11] जगनाळे, रेखा, *प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा*, विजय प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. १५.

[12] जगनाळे, रेखा, *प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा*, विजय प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. १५.

[13] जगनाळे, रेखा, *प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा*, विजय प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. १६.

[14] जगनाळे, रेखा, *प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा*, विजय प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. १८.

[15] जगनाळे, रेखा, *प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा*, विजय प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. क्र. १९.

[16] जगनाळे, रेखा, *प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा*, विजय प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. क्र.

[17] रायकर गजानन, *नातालीन*, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००५, पृ. क्र. ६३.

[18] रायकर गजानन, *नातालीन*, ‘शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००५, पृ. क्र. ६५.

[19] रायकर गजानन, *नातालीन*, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००५, पृ. क्र. ७३.

[20] रायकर गजानन, *नातालीन*, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००५, पृ. क्र. ७४.

[21] देसाई, गजानन, *नियोग*, यशअमृत प्रकाशन, साखळी – गोवा, २०१७, पृ. क्र. ५३.

[22] देसाई, गजानन, *नियोग*, यशअमृत प्रकाशन, साखळी – गोवा, २०१७, पृ. क्र. ५८.

[23] जगनाळे, रेखा, *प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा*, विजय प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. १५.

[24] गांवस, विठ्ठल, *कॅथरीन*, गमभन प्रकाशन, पृ. क्र. ३

[25] गांवस, विठ्ठल, *कॅथरीन*, गमभन प्रकाशन, पृ. क्र. ७.

[26] गांवस, विठ्ठल, *ओझे*, गोमंतक मराठी अकादमी, पणजी – गोवा, २०१०, पृ. क्र. ७६.

[27] गांवस, विठ्ठल, *ओझे*, गोमंतक मराठी अकादमी, पणजी – गोवा, २०१०, पृ. क्र.

[28] गांवस, विठ्ठल, *कॅथरीन*, गमभन प्रकाशन, पृ. क्र. ९८

[29] गांवस, विठ्ठल, *कॅथरीन*, गमभन प्रकाशन, पृ. क्र. १०५

[30] नाईक, उदय, *अवसर*, गोमंतक मराठी अकादमी, २०११, पृ. ४.

[31] नाईक, उदय, *अवसर*, गोमंतक मराठी अकादमी, २०११, पृ. ४.

[32] नाईक, उदय, *घुमटगाज*, अन्वय प्रकाशन, २०१८, पृ. २.

[33] नाईक, उदय, *घुमटगाज*, अन्वय प्रकाशन, २०१८, पृ. ४.

[34] नाईक, उदय, *घुमटगाज*, अन्वय प्रकाशन, २०१८, पृ. ५.

[35] नाईक, उदय, *घुमटगाज*, अन्वय प्रकाशन, २०१८, पृ. ७०.

[36] नाईक, उदय, घुमटगाज, अन्वय प्रकाशन, २०१८, पृ. ८६.

[37] नाईक, उदय, *घुमटगाज*, अन्वय प्रकाशन, २०१८, पृ. ९१.

[38] कोत्तापल्ले, नागनाथ, *ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध*, पृ. क्र. १२.

[39] कानोळकर, बाळकृष्ण, *प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांची कथा: एक शोध*

[40] गांवस, विठ्ठल. *फिंगर बाऊल*. कैलाश पब्लिकेशन्स्, औरंगाबाद, २०१९, पृ. क्र ९२.

[41] शेवडे, इंदुमती, *मराठी कथा : उगम आणि विकास,* सोमय्या पब्लिशिंग हाउस, मुंबई, पृ. क्र. २८३